**नागपूर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक २३/०६/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशिमबाग येथे भरलेल्या स्थगित सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्त.**

## उपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | **३७** | **क** | **संदीप दिवाकर जोशी** | **महापौर** | |
| २. | **२०** | **ड** | **मनिषा सुनिल कोठे** | **उपमहापौर** | |
| ३. | १ | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य | C१८ |
| ४. | १ | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या | A७ |
| ५. | १ | ड | विरेन्द्र उर्फ विक्की धनश्यामदास कुकरेजा | सदस्य | C१९ |
| ६. | २ | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या | D५ |
| ७. | २ | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य | D२३ |
| ८. | २ | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य | C५ |
| ९. | ३ | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य | D२२ |
| १०. | ३ | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य | B१३ |
| ११. | ३ | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या | A८ |
| १२. | ३ | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या | C१७ |
| १३. | ४ | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या | C२१ |
| १४. | ४ | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य | B१९ |
| १५. | ४ | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या | C२२ |
| १६. | ४ | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य | C१३ |
| १७. | ५ | क | अभिरुची अनिल राजगिरे | सदस्या | C२४ |
| १८. | ५ | ड | संजय अरुणराव चावरे | सदस्य | C१४ |
| १९. | ६ | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य | D२८ |
| २०. | ६ | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या | D३० |
| २१. | ६ | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या | D३१ |
| २२. | ६ | ड | मो. इब्राहिम तॉफीक अहमद | सदस्य | D२९ |
| २३. | ७ | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या | D३२ |
| २४. | ७ | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या | D३३ |
| २५. | ७ | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य | C६ |
| २६. | ८ | अ | आशा नेहरु उईके (आयेशा) | सदस्या | D८ |
| २७. | ८ | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या | D१० |
| २८. | ८ | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य | C७ |
| २९. | ९ | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या | D७ |
| ३०. | ९ | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य | D३५ |
| ३१. | ९ | क | ममता महेश सहारे | सदस्या | D३४ |
| ३२. | १० | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या | D१३ |
| ३३. | १० | क | नितिश गंगाप्रसादर ग्वालबंशी | सदस्य | D२१ |
| ३४. | १० | ड | गार्गी प्रशांत चोपरा | सदस्या | D१४ |
| ३५. | ११ | अ | संदीप चंद्रभान जाधव | सदस्य | B१ |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ३६. | ११ | ब | संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या | A६ |
| ३७. | ११ | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या | C३० |
| ३८. | ११ | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य | B९ |
| ३९. | १२ | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या | D१५ |
| ४०. | १२ | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या | A४ |
| ४१. | १२ | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य | D२० |
| ४२. | १२ | ड | विक्रम जगदीश ग्वालबंशी | सदस्य | B८ |
| ४३. | १३ | अ | अमर हरीश बागडे | सदस्य | C१५ |
| ४४. | १३ | ब | रुतिका योगेश मसराम | सदस्या | C२७ |
| ४५. | १३ | क | परिणिता परिणय फुके | सदस्या | C२८ |
| ४६. | १३ | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या | A५ |
| ४७. | १४ | अ | शिल्पा इशांत धोटे | सदस्या | C२९ |
| ४८. | १४ | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य | B४० |
| ४९. | १४ | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य | D१७ |
| ५०. | १४ | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या | A१ |
| ५१. | १५ | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य | B३९ |
| ५२. | १५ | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या | C२६ |
| ५३. | १५ | क | रुपा शेखर राय | सदस्या | A१८ |
| ५४. | १५ | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य | B११ |
| ५५. | १६ | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य | C२० |
| ५६. | १६ | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या | A२१ |
| ५७. | १६ | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या | A२० |
| ५८. | १७ | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य | B२० |
| ५९. | १७ | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या | A१९ |
| ६०. | १७ | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या | D२ |
| ६१. | १७ | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य | B२१ |
| ६२. | १८ | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य | B२ |
| ६३. | १८ | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या | A२२ |
| ६४. | १८ | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या | A२३ |
| ६५. | १८ | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य | D२६ |
| ६६. | १९ | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य | B१४ |
| ६७. | १९ | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या | A९ |
| ६८. | १९ | ड | दयाशंकर चंद्रशेखर तिवारी | सदस्य | B३ |
| ६९. | २० | अ | शंकुतला वामन पारवे | सदस्या | A२५ |
| ७०. | २० | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या | A१० |
| ७१. | २० | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य | D१८ |
| ७२. | २० | ड | दिपराज भैय्याजी पार्डीकर | सदस्य | A१२ |
| ७३. | २१ | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य | D२४ |
| ७४. | २१ | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य | B२२ |
| ७५. | २२ | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य | B१५ |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ७६. | २२ | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या | A२७ |
| ७७. | २२ | क | श्रध्दा विजय पाठक | सदस्या | A२८ |
| ७८. | २२ | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य | B२३ |
| ७९. | २३ | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या | A११ |
| ८०. | २३ | ब | मनिषा आशिष धावडे | सदस्या | A२९ |
| ८१. | २३ | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य | B५ |
| ८२. | २३ | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य | C३ |
| ८३. | २४ | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य | B२४ |
| ८४. | २४ | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या | A१३ |
| ८५. | २४ | क | चेतना राजू टांक | सदस्या | A३ |
| ८६. | २४ | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य | B१६ |
| ८७. | २५ | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्य | A३० |
| ८८. | २५ | ब | पुरुषोत्तम नागोराव हजारे | सदस्य | D१९ |
| ८९. | २५ | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या | A३१ |
| ९०. | २५ | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य | B२५ |
| ९१. | २६ | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य | B२६ |
| ९२. | २६ | ब | समिता राजेन्द्र चकोले | सदस्या | A३२ |
| ९३. | २६ | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्या | B२७ |
| ९४. | २७ | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य | C८ |
| ९५. | २७ | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या | A२ |
| ९६. | २७ | क | वंदना राजेश भुरे | सदस्या | A३३ |
| ९७. | २७ | ड | हरीश  सिताराम दिकोंडवार | सदस्य | B१७ |
| ९८. | २८ | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य | D४ |
| ९९. | २८ | क | रेखा राजू साकोरे | सदस्या | A३४ |
| १००. | २८ | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य | B२८ |
| १०१. | २९ | अ | लिला अजय हाथीबेड | सदस्य | A३५ |
| १०२. | २९ | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या | A३६ |
| १०३. | २९ | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य | B२९ |
| १०४. | २९ | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या | A१४ |
| १०५. | ३० | अ | नागेश गोविंदराव सहारे | सदस्या | B३० |
| १०६. | ३० | ब | रिता अशोक मुळे | सदस्या | A१५ |
| १०७. | ३० | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य | C१ |
| १०८. | ३१ | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या | A३८ |
| १०९. | ३१ | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या | A३९ |
| ११०. | ३१ | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य | B७ |
| १११. | ३२ | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य | B३१ |
| ११२. | ३२ | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या | C३६ |
| ११३. | ३२ | क | रुपाली प्रशांतसिंह ठाकूर | सदस्या | C३७ |
| ११४. | ३२ | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य | B१८ |
| ११५. | ३३ | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या | C३८ |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ११६. | ३३ | ब | भारती विकास बुंडे | सदस्या | C३९ |
| ११७. | ३३ | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या | C४० |
| ११८. | ३३ | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य | D२५ |
| ११९. | ३४ | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य | B३२ |
| १२०. | ३४ | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य | B३३ |
| १२१. | ३४ | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या | C३२ |
| १२२. | ३५ | अ | संदीप रमेश गवई | सदस्य | B३४ |
| १२३. | ३५ | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या | A१६ |
| १२४. | ३५ | क | विशाख प्रकाश मोहोड | सदस्या | C३३ |
| १२५. | ३५ | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य | B१२ |
| १२६. | ३६ | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या | C३४ |
| १२७. | ३६ | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या | A१७ |
| १२८. | ३६ | क | लहुकुमार दत्तुजी बेहते | सदस्य | B३५ |
| १२९. | ३६ | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य | B३६ |
| १३०. | ३७ | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य | B३७ |
| १३१. | ३७ | ब | सोनाली शालीक कडू | सदस्या | C३५ |
| १३२. | ३७ | क | नंदा शरद जिचकार | सदस्य | B१ |
| १३३. | ३७ | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य | B३८ |
| १३४. | ३८ | अ | उज्जवला वसंतराव बनकर | सदस्या | D६ |
| १३५. | ३८ | ब | प्रफुल्ल विनोंदराव गुडधे | सदस्य | C४ |
| १३६. | ३८ | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या | D१६ |
| १३७. | ना.स. | | सुनिल जिवराज अग्रवाल | सदस्य | C९ |
| १३८. | ना.स. | | गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य | C१० |
| १३९. | ना.स. | | किशोर रामकृष्ण वानखेडे | सदस्य | C११ |
| १४०. | ना.स. | | निशांत गिरीश गांधी | सदस्य | C१२ |
| १४१. | ना.स. | | किशोर दामोदर जिचकार | सदस्य | D९ |

**अनुपस्थित सदस्य**

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | १ | क | प्रमिला प्रितम मथरानी | सदस्या | C२५ |
| २. | २ | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या | D११ |
| ३. | ५ | अ | | | |
| ४. | ५ | ब | प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य | B१० |
| ५. | ७ | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहिम | सदस्य | C२ |
| ६. | ८ | ब | | | |
| ७. | ९ | ड | नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्य् | D३६ |
| ८. | १० | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या | D१२ |
| ९. | १९ | क | सरला कमलेश नायक | सदस्या | A२४ |
| १०. | २१ | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या | A२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११. | २१ | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या | D१ |
| १२. | २८ | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या | D३ |
| १३. | ३० | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या | A३७ |
| १४. | ३१ | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य | B६ |
| १५. | ३४ | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या | C३१ |

**उपस्थित अधिकारी**

**श्री. तुकाराम मुंढे** — **निगम आयुक्त**
**डॉ. रंजना लाडे** — **निगम सचिव**

**मा. महापौर यांनी सभेची कार्यवाही सुरु केली.**

महापौर:- या ठिकाणी सभागृहाला सुरुवात करण्यात येते त्यापूर्वी फक्त माझ्या मनातील एक प्रश्न आहे. मा.निगम सचिवांनी याचे उत्तर दयावे. पाईंट ऑफ इन्फोमेशन केव्हा घेतला पाहिजे. त्याबद्दल कायद्यामध्ये काय लिहिले आहे ते फक्त वाचून दाखवावे.

निगम सचिव:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. (वाचले)

श्री.हरीश ग्वालबंशी:- मा.महापौरजी, पुरे राज्य मे मेरे वक्तव्य से मा.आयुक्त को बुरा लगा और वह सभागृह छोडके चले गये, इसमे कही ना कही मेरी खुद की बेइज्जती हो रही है l जब मा. आयुक्त जी २० फेब्रुवारी के सभागृह मे पहली बार आये थे, तब मैने यह वाक्य का उच्चारण उनके सत्कार मे किया था l यह मै पढके बताता हूँ, पेज नंबर २८ पर है l मा.महापौरजी, एक संत महाराष्ट्र मे हो चुके है वह संत तुकाराम थे, और इनका भी नाम तुकाराम है, यह भी शिस्तबध्द काम करेगें, तुकाराम का नाम खराब नही करेंगें , यानी विपक्ष को भी न्याय देगें और सत्तापक्ष को भी न्याय देगें यही वाक्य मै उस दिन बोला और इनके सत्कार मे बोला l उसी दिन मा.आयुक्त बोल देते की व्यक्तिगत मेरा सत्कार भी मत करो और टिपण्णी भी मत करो l तो मैं यह नही बोलता, उस दिन मैने मा. आयुक्तजी के सत्कार मे यह वाक्य कहां तो मा.आयुक्त साहब को बुरा नही लगा, उस समय बोल दिये रहते कि कोई भी सदस्य मा.आयुक्त को आयुक्त करके ही संबोधीत करे, कोई नाम न ले l तो मैं नाम न लेता ।

महापौर:- या ठिकाणी दोन स्थगण मागच्या परवाच्या सभागृहात स्विकृत केले होते त्याचे वाचन याठिकाणी पुन्हा करावे . सभागृहात त्या दिवशी पटलावर घेतले होते त्याचे पुन्हा एकदा वाचन करावे.

निगम सचिव:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. स्थगण प्रस्ताव (वाचले)

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, नियमानुसार एका वेळी किती प्रस्ताव ठेवता येतात.

महापौर:- या ठिकाणी एक पत्र आलेले आहे. निगम सचिवांनी याचे देखील वाचन करावे.

निगम सचिव:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. स्थगण प्रस्ताव मागे घेण्याबाबतचे मा.सदस्या श्रीमती मंगला गवरे यांचे पत्र आहे.(वाचले)

श्री. प्रविण दटके:- मा.महापौरजी, असा कोणताही स्थगण प्रस्ताव नियमानुसार मागे घेता येतो काय ? ते सांगावे

महापौर:- स्थगण प्रस्ताव मागे घेता येतो काय? सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी प्रश्न विचारला आहे त्याचे देखील उत्तर देण्यात यावे.

निगम सचिव:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. प्रस्ताव मागे घेण्याबाबत तशी तरतूद दिसत नाही. एकदा मागे घेण्यात आलेला प्रस्ताव पुन्हा सभेत सादर करता येणार नाही.

श्री. कमलेश चौधरी:-मा.महापौरजी, याआधी असे सदनात करण्यात आले नाही काय? सदनामध्ये असे काही स्थगण प्रस्ताव आजपर्यंत मागे घेण्यात आले नाही काय?

महापौर:- दिलेले प्रस्ताव सभागृहाच्या पटलावर आल्यानंतर वापस घेण्यात आलेला आहे काय?

निगम सचिव:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. सदर नेमकी माहिती विभागाला विचारली असता विभागाकडून नाही असे उत्तर आले आहे. व्हेरीफिकेशन केल्यानंतर क्लिअरकट ही माहिती सांगता येईल.

श्री. कमलेश चौधरी:-मा.महापौरजी, तोपर्यंत ही कार्यवाही थांबविण्यात यावी.

महापौर:- दुस-या प्रश्नाचे उत्तर दयावे.

निगम सचिव:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन.(वाचले)

श्री.विजय झलके(स्थायी समिती अध्यक्ष):- मा. महापौरजी, मंगलाताई गवरे यांनी जो स्थगण प्रस्ताव दिला त्या माझ्या प्रभागातील सहकारी नगरसेविका आहेत. त्या जरी शिवसेन्याच्या नेत्या असतील तरी त्यांनी जो स्थगण प्रस्तावात चार भागातील विकास कामाच्या संदर्भात विषय मांडला. त्यानंतर त्यांनी एक पत्र दिले की माझ्या प्रभागातील प्रलंबित कामे होतील असा विश्वास दिला असल्यामुळे , नेमका हा विश्वास कुणी दिला. विकास कामाच्या संदर्भात स्थगण प्रस्ताव आले असल्यामुळे आणि दोन्ही स्थगण प्रस्ताव विकास कामाच्या संदर्भातील असल्यामुळे क्लब करुन घेतले पाहिजे. त्यांना विश्वास कुणी दिला त्याबद्दल माहिती सांगण्यात यावी.

श्री. कमलेश चौधरी:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, जेव्हा मा.सदस्य उपस्थित नाही तर त्यांच्या विषयावर चर्चा करणे योग्य नाही.

श्री. प्रविण दटके:- मा.महापौरजी, याच्या मागच्या सभेत विशेष अधिकार देवून दोन्ही स्थगण प्रस्ताव क्लब केले होते. तसाच या दोन्ही स्थगण प्रस्तावाचा मानस एकच आहे त्यामुळे दोन्ही क्लब करुन याच्यावर एकत्रित चर्चा करावी.

श्री. कमलेश चौधरी:- म.महापौरजी, दोन्ही क्लब कसे करता येईल, त्याचे क्षेत्र वेगळे आहे. यांचे क्षेत्र वेगळे आहे. हे दोन्ही वेगवेगळया ठिकाणाहून निवडून आले आहे. दोन्ही विषय क्लब कसे करता येतील.

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा.महापोरजी, स्थगण प्रस्तावाची जी तरतूद आहे ती स्पष्ट आहे. स्थगण प्रस्ताव सभागृहात आल्यानंतर तो नाकारावा किंवा स्विकारावा हा अधिकार मा.महापौरजी यांना आहे. नाकारला तर त्याचे कारणे द्यावी लागतील की कोणत्या कारणाने तो नाकारत आहे. आणि स्विकारला असेल आणि सभागृहाची सहमती असेल तर तो स्विकारावा. आणि नाकारत असेल आणि सभागृहाचे असम्मती असेल तर तो मतदानासाठी टाकावा लागेल. यामध्ये स्पष्ट तरतूद आहे. सभागृहामध्ये एकाच विषयाच्या अनुषंगाने

एकच स्थगण प्रस्ताव असला पाहिजे. एका बैठकीत एका पेक्षा अधिक प्रस्ताव असता कामा नये. मा.महापौरजी , जर तो प्रस्ताव एकाच विषयाच्या संबंधित असेल तर मागच्या वेळेस जी घटना झाली आणि दटके साहेब म्हणत आहे.

श्री. प्रविण दटके:- मा.महापौरजी, मागच्या सभागृहात दोन स्थगण प्रस्ताव स्विकारले की नाही.

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, कुठल्या संदर्भात होते ते सांगितले पाहिजे.

महापौर:- मागच्या सभागृहात कुठले दोन स्थगण प्रस्ताव स्विकारले ते वाचून दाखवावे.

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, जो स्थगण प्रस्ताव देतो त्याची प्रस्तावना सुध्दा मा.सदस्यांच्या त्याच्या भाषणाने सुरवात करण्यात येते. त्याच्या मागची पार्श्वभुमी काय ? त्या स्थगण प्रस्तावाच्या चर्चेची सुरुवात स्थगण प्रस्ताव देणा-या मा.सदस्यांनी करावी असे या ठिकाणी नोंद आहे. तो सदस्य अनुपस्थित नसतील आणि तो प्रस्ताव या ठिकाणी दिला आणि आता मला चर्चा करावयाची नाही. त्या स्थितीमध्ये सभागृहात असा निर्णय घेतला पाहिजे. तो स्थगण प्रस्ताव वापस घेतला तो मंजूर करुन दुसरा जो स्थगण प्रस्ताव आहे त्यावर चर्चा करावी.

श्री. प्रविण दटके:- मा.महापौरजी, सभागृहाला काय निर्णय घ्यावयाचा आहे तो निर्णय घेईल. मागच्या सभागृहात मा.महापौरजी यांना विशेष अधिकार मा. प्रफुल्ल गुडधे यांनी दिला होता. त्या स्थगण प्रस्तावाचे वाचन करावे त्यानंतर निर्णय घेवू.

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, मा.दटके साहेब म्हणतात मी मा.महापौरजी यांना विशेष अधिकार दिला होता. मी दिला होता त्याला सभागृहाने संमती दिली होती. सभागृहाने संमती दिल्याखेरीज कुठल्याही मा.सदस्याचे म्हणणे मान्य होत नाही.

श्री. प्रविण दटके:- मा.महापौरजी, मा. प्रफुल्ल गुडधे यांच्या मताशी मी सहमत आहे.

महापौर:- निगम सचिवांनी वाचन करावे.

निगम सचिव:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन.(वाचले) चार स्थगण प्रस्ताव प्राप्त झाले.

१) श्री.दयाशंकर तिवारी २) तानाजी वनवे ३) श्री. प्रफुल्ल गुडधे ४) ॲड्धर्मपाल मेश्राम

निगम सचिव:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. प्रस्तावापैकी २ आणि ३ हे जवळपास सारखे असल्यामुळे आपले सोडून वनवे साहेबांचा स्थगण प्रस्ताव स्विकारता येतो.

श्री. प्रविण दटके:- मा.महापौरजी, सभागृहाने कोणते दोन प्रस्ताव स्विकारले होते.

निगम सचिव:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. मा. तानाजी वनवे आणि प्रस्ताव क्र. ३ स्विकारले होते.

श्री.कमलेश चौधरी:- मा.महापौरजी, यावरुन कोणत्याही प्रकारचे प्रस्ताव स्विकारले नव्हते असे कळत आहे. सध्या जे मा.सदस्य उपस्थित नाही त्यांचा प्रस्ताव थांबवून दया. याच्या नंतर जे सदस्य उपस्थित आहेत त्यांच्या स्थगण प्रस्तावर चर्चा करु.

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, दटके साहेबांनी ज्या पध्दतीने सांगितले त्या पध्दतीने आपण दोन प्रस्ताव

स्विकारले आहे. दोन प्रस्ताव क्लब केले होते. कारण दोघांचे प्रारुप एक होते. त्यामध्ये दुसरा स्थगण प्रस्ताव हा मा. दयाशंकर तिवारी यांचा विषय वेगळा होता परंतु तोही स्विकारला होता. मला एक गोष्ट आठवत नाही, मी विशेष विनंती सभागृहाला केली होती. आणि आपण विशेष बाब म्हणून दोन्ही प्रस्ताव स्विकारा या संदर्भात मला कृतीत आठवत नाही म्हणून सभागृहाच्या पटलावर त्याचे वाचन करावे.

श्री. प्रविण दटके:- पाईंट ऑफ इन्फोमेशन मा.महापौरजी, माझे म्हणणे आहे त्या दिवशी विशेष अधिकार दिले होते आणि हेही सांगितले होते वेळोवेळी हा विशेष अधिकार देणार नाही. हे त्या सभागृहापुरते मर्यादित असावे.

महापौर:- वाचन करावे

निगम सचिव:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. (वाचले)

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, त्या सभेपुरते अधिकार दिले होते. या सभेमध्ये एका पेक्षा जास्त स्थगण प्रस्ताव स्विकारण्याच्या संदर्भात आपली भुमिका असेल तर तसा प्रस्ताव दयावा. मा. विरोधी पक्ष नेते आपले मत व्यक्त करतील. सभागृहात एक मत होत नसेल तर ते मतदानाला ठेवले पाहिजे. मतदानाअंती मा.महापौर निर्णय घेतील.

श्री. प्रविण दटके:- मा.महापौरजी, या सभागृहाच्या माध्यमातून त्या दिवशी आशय वेगळा होता आणि आजच्या आशय एक आहे.

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, आजचा आशय एक असला तरी तो व्यक्ति उपस्थित नाही आणि त्याने नोटीसद्वारे परत घेतला आहे.

श्री. प्रविण दटके:- मा.महापौरजी, त्यामध्ये ही प्रापर्टी या सभागृहाची आहे त्यावर सभागृह निर्णय घेईल. हे सभागृह आपल्याला एका पेक्षा जास्त स्थगण प्रस्ताव स्विकारण्याचा विशेष अधिकार त्या दिवशी २० तारखेच्या सभागृहात जसा दिला होता तसाच देत आहे अशी मी विनंती करतो.

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, दटके साहेबांनी अधिकार या ठिकाणी प्रदान केला आहे. त्या अधिकाराच्या बाबतीत मी अधिक क्लिअर करतो. ज्या मा.सदस्यांनी आपला प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केली. कोणत्या पार्श्वभुमीवर त्यांनी तो प्रस्ताव दिला त्याची पार्श्वभुमी येणार नाही. त्यांचे मत चर्चेच्या सुरुवातीला घेता येणार नाही तर त्यावर काय चर्चा करणारआहे कारण तो प्रस्ताव मागे घेतला आहे. तो वापस घेतलेला प्रस्ताव नामंजुर करावा. त्याच्या विपरीत दटके साहेबांचे मत असेल तर हा प्रस्ताव स्विकारण्यासाठी हया प्रस्तावावर मतदान टाकावे अशी विनंती आहे.

महापौर:- निगम सचिवांनी सांगावे, जे मा.सदस्य उपस्थित नाहीत. त्यांनी जो प्रस्ताव मांडला आहे आणि आज अनुपस्थित राहिल्या आहेत. त्या दिवशी त्या प्रस्तावाचे वाचन झाले परंतु आज त्यावर चर्चा करतांना त्या अनुपस्थित आहेत त्याबाबत काय नियम आहे काय? किंवा नसलेल्या व्यक्तिचा प्रस्ताव स्विकारता येणार नाही असे काही स्पेसिफिक नियम आहेत काय ?

निगम सचिव:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. स्थगण प्रस्ताव ज्या मा.सदस्यांनी सादर केला आहे. त्यांनी त्या चर्चेत सहभागी होण्याविषयी नमुद आहे परंतु तेअनुपस्थित असल्यामुळे याबाबतीत......

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, याबद्दल काही नियमावली आहे काय? की उपस्थितच राहावे लागते.

नियमाचे वाचन करण्यात यावे.

महापौर:- ते जर उपस्थित नसतील तर ते प्रस्ताव स्विकारता येते काय ?

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, मा.महापौरजी, आपण मागच्या सभेला दोन प्रस्ताव आले ते वाचन केले होते मात्र ते स्विकारले नव्हते. स्विकारण्याची आपण वेळ ही आजची निश्चित केली होती. या संदर्भात या सभेला आज चर्चा करु. मा.सदस्यांनी स्थगण प्रस्ताव परत घेतला नाही ते या सभागृहात अनुपस्थित आहेत.

श्री.अविनाश ठाकरे:- पाईंट ऑफ इनर्फोमेशन, सभागृह नव्याने आहे कां मा.महापौरजी. ज्या सभागृहामध्ये वाचन झाले तेच सभागृह कंटीन्यू मध्ये सुरु आहे. सर्वात महत्वाचा मुदद्दा आहे.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, नियमावली मध्ये लिहिले असेल तर वाचन करावे.

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, बरोबर म्हटले, त्याच दिवशी सभा तीच कायम आहे. प्रस्ताव दिल्यानंतर ताबडतोब ते पत्र दिले आहे मधले दोन दिवस काढून टाका. स्थगित सभा कंटीन्यू झाली आहे.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, नियमावली मध्ये काय लिहिले आहे ते वाचून दाखवावे.

श्री.अविनाश ठाकरे:-मा.महापौरजी, ही जी पध्दत आहे. एक सदस्यांने स्थगण प्रस्ताव दिला. स्थगण प्रस्तावाचे एक महत्व आहे. एक विशेषाधिकार दिला आहे. वापस घेतांना काय म्हटले आहे, मला आश्वासन मिळाले आहे म्हणून मी वापस घेत आहे. ते सांगण्यासाठी मा.सदस्य सभागृहात उपस्थित नाही. हे संसदीय आयुध आहेत त्याचा गैरवापर नाही आहे काय ? मला आता आश्वासन मिळाले आहे म्हणून मी वापस घेत आहे हे बरोबर आहे . ही प्रथा पडता कामा नये. त्यामुळे हे सभागृह कंटीन्युएशनमध्ये आहे.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, मा.अविनाशजी यांनी म्हटले, हा मुद्दा अगदी योग्य आहे. आज जर त्याचा निषेध होत नसेल तर चेअर म्हणून आपली ती जबाबदारी आहे. ते उपस्थित असले पाहिजे असा काही नियम आहे काय ? ते असलेच पाहिजे. असा काही नियम आहे काय? असेल तर त्याचे वाचन करावे.

निगम सचिव:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. याच्यामध्ये प्रस्तावित सुधारणा परवानी मागे घेणे. सभागृहाची परवानगी असेल त्याशिवाय घेता येणार नाही.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, मतदानाला प्रस्ताव टाकावा.

श्री. दयाशंकर तिवारी:- मा.महापौरजी, फक्त मी सभागृहाच्या सुचनेसाठी माहिती ठेवतो. संसदीय परंपरामध्ये आपल्याला मिळालेल्या संधीचा दुरुपयोग करुन अनेक लोकांनी आपले हित साधलेले आहे. लोकसभेमध्ये प्रश्न टाकला तर प्रश्नाच्या वेळी अनुपस्थित राहून पैसे घेण्याचे सुध्दा प्रकार झालेले आहेत. लोकसभेचे मा.सदस्यांचे सदस्यत्व रद्द झालेले आहे. महापालिकेमध्ये त्या प्रकारच्या कार्यक्रमाची सुरुवात तर झालेली नाही ? हा प्रश्नचिन्ह यामध्ये उपस्थित राहतो. हे पत्र देण्यात आले आहे त्याच्यामध्ये म्हटले आहे.

श्री.तानाजी वनवे:- पाईंट ऑफ आर्डर, जेष्ठ सदस्यांनी या ठिकाणी पैश्याचा उल्लेख केला आहे. यांच्याजवळ ज्या मा.सदस्यांनी प्रस्ताव मागे घेतला त्याच्या संबंधित काही पुरावे आहेत काय? असतील तर सादर करावे.

श्री.दयाशंकर तिवारी:- मा.महापौरजी, मी संसदेच्या प्रस्तावाच्या संदर्भात सांगितले. महापालिकेत अशी सुरुवात तर झालेली नाही काय ? माझ्या भाषणात मी प्रश्नचिन्ह उभा केला.पैसा म्हणजे काय, पैसा म्हणजे

हाताने दिलेला पैसा नाही आहे. माझे काही काम होत असेल, माझा काही स्वार्थ साधत असेल, माझे झालेल्या कामामुळे मला राजकीय फायदा होत असेल हे हे सगळे घुसचेच प्रकार आहेत. और सन्माननीय सदस्यने अपने पत्र मे नमुद किया है की मुझे आश्वासन मिल गया है। तुम्हारे काम हो जाएगे इसलिए मै वापस लेता हूॅ ये आक्षेपार्ह बाब है।

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, मा.सदस्य श्री.दयाशंकर तिवारी यांनी या सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले ही अत्यंत गंभीर बाब आहे. संसदीय आयुधाचे कोणत्याही मा.सदस्य गैरवापर करीत असेल आणि सभागृह त्याबाबत कन्व्हेन्स असेल तर त्या सदस्याचे सदस्यत्व रद्द करण्याची शिफारस हे सभागृह करणार आहे काय? जर आपला समज पक्का झाला तर या मा. सदस्यांकडून लोकसभेच्या धर्तीवर जशापध्दतीने संसदीय आयुधाचा गैरवापर झाला. प्रश्नोत्तर करणे आणि अनुपस्थित राहणे आणि भ्रष्टाचार करणे या निर्णयाअंती हे सभागृह आले असेल तर त्या मा.सदस्याचे सदस्यत्व रद्द करण्याची कार्यवाही आपण प्रस्तावित करणार आहे काय ? हा माझा प्रश्न आहे.

श्री.प्रविण दटके:-मा.महापौरजी, प्रस्ताव क्लब करुन आपल्याला विशेषधिकार देतो. आपण मतदानासाठी प्रस्ताव टाकावा.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, असा गंभीर आरोप जर एखाद्या मा.सदस्यांवर त्या मंगलाताई गवरे वर होत असेल तर.. (बेल)

श्री.दयाशंकर तिवारी:- मा.महापौरजी, मैने किसी पर आरोप नही किया, मैने सिर्फ आगाह किया है। (बेल)

श्रीमती दर्शनी धवड:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, या सभागृहात मा.सदस्य उपस्थित नसतांना त्यांच्यावर चक्क संशय घेवून , पैसे घेवून, भष्ट्राचार वगैरे असे आरोप लावणे हा मी एका महिला नगरसेविकेचा अपमान समजते. त्या महिला नगरसेविकेला माझा सपोर्ट आहे. ती सभागृहात उपस्थित नसतांना तिच्याबद्दल असे मत मांडायला नको. ती जर उपस्थित असती तर ती उत्तर देवू शकली असती.

महापौर:- असा कोणताही आरोप केलेला नाही. याच्यामध्ये फार चर्चा न करता स्थगण प्रस्तावावरती चर्चा करावी.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, ही संशयाची सुई त्यांच्या बाजूने आलेली आहे. जर असा संशय जर एका महिला मा.सदस्यांच्या बाबतीत व्यक्त करतो आहे. मा. मंगलाताई गवरे या सभागृहाच्या तिस-यांदा सदस्य झालेल्या आहेत. त्यांची कार्यपध्दती आपण पाहिलेली आहे. त्यांनी जे पत्र लिहिले, त्यांनी जो स्थगण प्रस्ताव दिला त्याच्या मागे कुठली शक्ती होती काय? कोणत्या कारणाने हा स्थगण प्रस्ताव दिला, मला असे वाटते या खोलात न जाता हा स्थगण प्रस्ताव नाकारला पाहिजे. जे मा.सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत. कोणत्या धारणेवर त्यांनी हा स्थगण प्रस्ताव दिला या संदर्भात त्यांचे वक्तव्य या सभागृहात होवू शकत नाही. या उलट त्यांनी पत्र दिले की हा स्थगण प्रस्ताव मी परत घेते. ही त्यांची विनंती सर्व सभागृहाने मान्य केली पाहिजे. दुसरा स्थगण प्रस्ताव आहे त्यावर चर्चा करण्यात यावी.

श्री.प्रविण दटके:-मा.महापौरजी, हा प्रस्ताव आपण मतदानाला टाकावा.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, स्थगण प्रस्ताव मतदानाला टाकण्याच्या आधी मा.सदस्यांनी जर अधिकाराचा गैरवापर असेल तर काय निर्णय घेणार आहे . असा मा.सदस्यांनी जर आपल्या अधिकाराचा जर

गैर वापर केला असेल तर सभागृह काय निर्णय करणार आहे ही सुध्दा निश्चिती झाली पाहिजे अन्यथा मा.सदस्या श्रीमती मंगलाताई गवरे यांनी स्थगण प्रस्ताव टाकला. उद्या आमच्या सारखा मा.सदस्य स्थगण प्रस्ताव टाकेल आणि परत घेवून टाकेल तर त्याच्यामागचे इंटेन्शन काय? त्याचा मागचे इंटेन्शन करप्ट प्रॅक्टिसींग आहे काय? मा.महापौरजी, कोणत्या परिस्थितीमध्ये, काही गोष्टी त्यांच्या लक्षात आले असेल आणि त्यामुळे त्यांनी परत घेतला असेल. हया दोन गोष्टी वेगवेगळया राहू शकतात. त्यामुळे सरसकट त्यांच्या अनुपस्थित चर्चा करुन राहिलो हे बरोबर होणार नाही. ते योग्य होणार नाही. जसा प्रस्ताव वापस घेणे योग्य होणार नाही त्यापध्दतीने त्यांच्या अनुपस्थितीत मा. सदस्यांना कलम ४४ अंतर्गत प्रश्न उपस्थित केला आणि ते सभेत अनुपस्थित असेल तर आपण त्यांचा प्रश्न पुकारत नाही असा या सभागृहाचा पायंडा झालेला आहे. त्यामुळे हा प्रस्ताव आपण नामंजुर करावा.

श्री.प्रविण दटके:-मा.महापौरजी, ही नियमावली आपल्या तीन जेष्ठ मा.सदस्यांनी तयार केली. याच्यानंतर जर असे होत असेल तर या सभागृहात दोन जेष्ठ सदस्य उपस्थित आहेत. याही संदर्भात काय नियम, नियमावलीत अॅड करु शकतो ते करुन सरकारककडून मंजूर करुन घ्यावे. याचे नंतर कुणावर आरोप प्रत्यारोप करण्याची पाळी येणार नाही. कुणी मा.नगरसेवकाला आपल्या अधिकाराचा गैरवापर करता येणार नाही. माझी सभागृहाला विनंती आहे, या समितीमध्ये तीन जेष्ठ मा.सदस्य आहेत त्यांनी याबाबतीत नियम तयार करुन घेतले पाहिजे.

श्री. प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, आम्ही आमच्या त्या वेळच्या परिस्थितीत अनुरुप त्या त्या स्थिती निर्माण होवू शकतात त्याप्रमाणे नियमावली तयार केली.आणि राज्य सरकारकडून मंजूर केले. आता हे प्रसंग नव्याने येवून राहिले, हा पहिल्यांदा घडलेला प्रसंग आहे.

महापौर:- असे प्रसंग येणारच आहेत. नियमावलीत वेळोवेळी बदल करण्याच्या दृष्टीने ही समिती कायम ठेवावी. या समितीने वेळोवेळी येणा-या प्रसंगाबाबत नियम तयार करण्याबाबत समितीला सजेस्ट करावे. स्थगण प्रस्ताव मतदानाला टाकावयाचा आहे. दोन्ही प्रस्ताव क्लब करुन या ठिकाणी चर्चा करावयाची आहे. जे प्रस्तावाच्या बाजूने आहेत कृपया त्यांनी हात वर करावे.(मा.सदस्यांनी हात वर केले) अणि जे प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी सुध्दा हाथ वर करावे. (मा.सदस्यांनी हात वर केले) प्रस्ताव बहुमताने मंजूर झालेला आहे. चर्चेला सुरवात करण्यात येते. जे मा.सदस्य नितीन साठवणे उपस्थित आहेत त्यांनी चर्चेला सुरुवात करावी. त्या पूर्वी सर्व गटनेत्यांना सुचित करतो की स्थगण प्रस्तावावर ज्यांना चर्चा करावयाची आहे ते नावे फक्त आणि फक्त मा.गटनेत्यांच्या माध्यमातून मी स्विकारणार आहे. ज्यांना चर्चा करावयाची आहे त्यांनी मा.गट नेत्यांना पत्र किंवा त्यांच्यातर्फे नाव या ठिकाणी माझ्यापर्यंत पोहचवावे. मा.नितीन साठवणे यांचे भाषण होईपर्यंत ही नावे माझ्यापर्यंत पोहचवावी.

श्री.नितीन साठवणे:- मा.महापौरजी, मा.सदन. मी जो स्थगण प्रस्ताव येथे मांडलेला आहे. त्याची प्रस्तावना मी येथे सांगत आहे. सगळयात मोठा कोंरटाईन झोन प्रतिबंधीत क्षेत्र म्हणून माझा सतरंजी पुरा एरिया राहिला आहे. सतरंजीपुरा परिसरातील सगळयात कायम स्वरुपी जास्त दिवस प्रतिबंधीत क्षेत्र असलेल्या भागात माझे घर अंतर्भुत आहे. त्या परिस्थितीमध्ये ज्या हालअपेष्ठा माझ्या प्रभागातील, माझ्या परिसरातील, माझ्या मोहल्ल्यातील जनतेने बघितली आहे. त्याची वारंवारं सुचना मी माझ्या जेष्ठ मा.सदस्यांना आणि वरिष्ठ अधिका-यांना दिली आहे. परंतु कोणत्याही प्रकारची सुनावणी झालेली नाही. मा.महापौरजी, माझ्या एरियामध्ये पॉझिटीव्ह असे जास्त पेशंट निघाले नाही तरी सुध्दा सगळयात जास्त सतरंजीपुरा भागातील लोक

कोरंटाईन सेंटरला जावून आले. हा मोठा आकडा आहे. ज्यावेळेस कोरंटाईन सेंटरवरुन हे लोक जावून परत आले त्यामध्ये १६-१७ दिवसांमध्ये परत आलेल्या लोकांना परत कोरंटाईन करण्याकरिता जेव्हा प्रशासनाने पहल केली. त्या वेळेस त्या ठिकाणचे नागरिकांनी स्वत: विरोध केला तेव्हा प्रशासनाच्या बाजूने मी उभा राहून मी स्वत: अलाऊन्समेंट केलेली आहे. त्यावेळेस झोनचे सहा.आयुक्त आणि वरिष्ठ अधिकारी झोनचे उपस्थित होते. त्या वेळेस मी लोकांना आव्हान केले की आपले संमत्तीने आपले सर्व सामान पॅक करुन कोरंटाईन करण्याकरिता जावे. प्रशासनाने विषय घेतला ही गंभीर बाब आहे, असु शकते ती आरोग्याच्या दृष्टीने करणे आवश्यक आहे. परंतु तेथील नागरिकांना कोणत्याही प्रकारचे सहकार्य केले नाही. यापूर्वी कोरंटाईन सेंटरमध्ये जे लोक गेले होते आणि १६-१७ दिवसांनी परत आले होते त्यांनी त्यांचा तो अनुभव शेअर केला. व्हीएनआयटीमध्ये जेव्हा ४०० ते ५०० लोकांना माझ्या मोहल्यातील कोरंटाईन सेंटरला ठेवण्यात आले होते तेव्हा एका-एका फॅमिलीला रुम मिळाले होते परंतु त्या ठिकाणी एका फ्लोअरला चार-चार संडास आणि बाथरुम होते. ६०-७० लोक चार-चार संडास आणि बाथरुमचा वापर सामुहिकरित्या करीत होते. त्यांचे असे म्हणणे होते की आम्ही आमच्या घरीच कोरंटाईन झालो असतो तर बरे झाले असते. कारण सकाळी ज्यांचा नंबर लागत होता तो त्या त्याबाथरुम संडास चा वापर करीत होता. त्यामुळे जास्तीत जास्त प्रार्दुभाव या कोरंटाईन सेंटरमध्ये होवू शकतो. ज्या फॅमिली कोंरंटाईन साठी गेल्या होत्या त्यांच्यासोबत लहान मुले सुध्दा गेली होती. त्या ठिकाणी जेवणाच्या व्यवस्थेव्यतिरिकत् लहान मुलांसाठी दुधाची सुध्दा सोय केलेली नव्हती. ही शर्मची बाब आहे. वेळोवेळी प्रशासनाच्या माध्यमातून माझे झोनचे जुने जे सहा.आयुक्त होते त्यांच्या माध्यमातून काही सामान, दुधाची व्यवस्था त्या ठिकाणी करण्याचा प्रयत्न केला परंतु तेथील लोकांना जी निराशा झाली आणि त्यांनी आलेले आपले अनुभव केले. जेव्हा पुन्हा कोरंटाईन करण्याकरिता इकडच्या टप्प्यातील लोकांना कोरंटाईन करण्यासाठी आले तर त्या लोकांचे असे म्हणणे होते की आम्ही तब्बल १६-१७ दिवस कोरंटाईन होवून आल्यानंतर परत आम्हांला कां कोरंटाईन करण्याकरिता कां आले. तो मुस्लीम बहुल एरिया असल्यामुळे त्यांची समोरच ईद येणार होती. १६ मे ते १७ मे ला हे लोक कोरंटाईन करण्याकरिता आले होते. ज्यावेळी नागरिकांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. एकही नागरिक कोरंटाईनला गेला नाही. याच्याआधी २७ एप्रिल ते २९ एप्रिल या दरम्यान आमच्या एरियातील जवळपास १७०० लोकांना कोरंटाईन सेंटरमध्ये दाखल केले होते. यांचे म्हणणे हे होते की इतक्या दिवसामध्ये असा कसा प्रार्दुभाव होवू शकतो. त्यांचे डायरेक्ट म्हणणे होते की तिकडचे बेड खाली झाले म्हणून आम्हांला कोरंटाईन ठेवण्याची प्रशासनाची इच्छा आहे काय? सगळया दृष्टीने प्रशासनातील वरिष्ठ अधिका-यांना कळविण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांच्याकडून कोणतेही सहकार्य झाले नाही. तरी सुध्दा प्रशासनाने आपली प्रक्रिया राबविली. त्या नंतर माझ्या विरोधात यांनी २६ मे ला माझ्या एरियातील एक बुजुर्ग महिला जी ७२ वर्षाची होती तिचे निधन झाले. निधन झाल्याची माहिती मी अति.आयुक्त राम जोशी यांना वॉटस अप वर कळविली आणि या बुजुर्ग महिलाची अंतिमविधी करण्यासाठी परवानगी आणि प्रक्रिया काय आहे ते मला कळवावे. झोन क्र. ७ मधून मी तीन तासापूर्वी त्याबाबतची सुचना दिलेली आहे. या डेडबॉडीवर कोणत्याही प्रकारचा निर्णय झालेला नाही, उन्हाळयाचे दिवस आहे. बॉडीला पाणी सुटत चालले आहे अशी सुचना केल्यानंतरही मला कोणत्याही प्रकारचा रिप्लॉय आलेला नाही. कसे कां होईना यांनी डेडबॉडी तपासण्याकरिता मेयो हॉस्पीटल रुग्णालयात घेवून गेले. तिथला रिपोर्ट पॉझिटीव्ह आला त्यानंतर प्रशासनाने रात्री भुमिका घेवून माझ्या विरोधात एफआयआर दर्ज करुन गुन्हा नोंदविलेला आहे. माझे एवढेच म्हणणे आहे की मी कोणत्या प्रकारची बाचाबाची केली असेल आणि ते नमुद असेल तर ती प्रस्तुत करावी. मी कुणाचा विरोध केला असेल तर

त्यांनी नमुद करावे. एफआयआरमध्ये स्पष्ट लिहिले आहे की तेथील नागरिकांना कोरंटाईन करण्याकरिता जाण्याकरिता यांनी मनाई केलेली आहे की जावू नका. यांनी कुठल्या नागरिकांनी बयान वगैरे दिले आहे का ? मा.महापौरजी, मी जनहिताच्या कार्यात गुंतलेला असतांना या प्रकारचा माझ्या विरोधात कट रचून माझ्यावर एफआयआर दाखल केला आणि म्हणून मी प्रशासननाला स्पष्टीकरण मागु इच्छितो. मा. महापौरजी, ज्यावेळेला पहिल्यांदा माझा एरिया सील करण्यात आला. मा.महापौरजी, मी आपल्याला एक गंभीर बाब सांगू इच्छितो, त्या एरियामध्ये तीन-चार दिवस कचरा उचलायला गाडी गेलेली नाही. यांच्या घरी चार-चार दिवस कचरा उचलला गेलेला नाही. त्या एरियामध्ये कोणालीही परवानगी नव्हती. त्या लोकांना लहान मुलांसाठी दुध सुध्दा मिळाले नाही. कशा पध्दतीचे भुगतमान त्यांनी भोगले हे मी पाहिलेले आहे. अर्धा अर्धा किलोमीटरहून खांदयावर सिलेंडर नेत होते. एका कोप-यात सिलेंडरची गाडी उभी राहायची त्या ठिकाणाहून सिलेंडर घेवून जावे लागत होते. तब्बल ८१  दिवस माझे घर स्वत: मी त्या प्रतिबंधीत क्षेत्रात राहिलेलो आहे. माझी गर्भवती पत्नी जेव्हा तिला १३ एप्रिलला दवाखान्यात नेण्यासाठी निघालो तर मला पोलीसांनी अडविले की तुम्ही बाहेर जावू शकत नाही. मी त्यांना ओळख दाखविली. मी कसातरी निघालो आणि एका तासात तिची प्रसुती झाली. मा.महापौरजी, सर्वसाधारण  नागरिकांना काय अडचण आली असती जेव्हा माझ्या सारख्या नगरसेवकाला अशा प्रकारची पाळी आली. चक्कीवर जाण्याची परवानगी नव्हती, चक्की त्या परिसरात एका टोकावर होती. चक्कीवर सुध्दा जाण्यासाठी एकाकोप-यातून दुस-या कोप-यावर जावे लागत होते. त्यातही पोलीस अडवायचे की तुम जा नही सकते. मा.महापौरजी, कितीही श्रीमंत माणुस असला तरी तरी त्याच्याकडे आठ दिवसाच्यावर आटा नसतो. त्या लोकांनी सुध्दा आटा मागून खाल्लेला आहे. अशा प्रकारे मा.महापौरजी, यांच्याकडून कोणत्याही प्रकारची गाईडलाईन किंवा सहकार्य मिळालेले नाही. मी वारंवारं गर्भवती महिलांच्या  कोव्हीड टेस्ट झालेल्या नाहीत त्यांना डिलिव्हरीची डेट देण्यात आली असून ज्या ठिकाणी त्यांचे ट्रिटमेंट चालू आहे त्या दवाखान्याचे डॉक्टर म्हणतात की आम्ही हॉस्पीटलमध्ये ॲडमीट करणार नाही जोपर्यंत या गर्भवती महिलांची कोव्हीड चाचणी होणार नाही. मी अति.आयुक्त यांना वॉटस अप द्वारे कळविले परंतु त्यांनी साध्या फोनद्वारे निर्देश दिले नाही. मी एकडून तिकडून माहिती घेवून आणि एका प्रायव्हेट लॅबमध्ये चाचणी करुन त्या गर्भवती महिलांची प्रसुती करण्यासाठी पाठविले. ज्यांच्याशी या संदर्भात संपर्क साधला होता त्या हॉस्पीटल वाल्यांनी २४-२४ तास दवाखान्यामध्ये ॲडमीट करण्यासाठी सांगितले होते. त्या महिला धाबरुन गेल्या होत्या असा माहोल होता, लोकांना मेयो, मेडीकल हॉस्पीटलमध्ये जाण्यासाठी भिती वाटत होती. मा.महापौरजी,  अशा वातावरणात आम्हांला ठेवण्यात आले होते. एक-एक क्षण आठवला तर असे वाटते की आम्ही कुठल्या परिस्थितीत होतो. तेथल्या तीन-चार हजार लोकांना विचारा, काय बितलेली आहे. आमच्या एरियात ज्या घरी गाईढोरे आहेत त्या घरच्या २२ लोकांना कोरंटाईन करण्याकरिता घेवून गेले, त्या गाईची देखभाल, चारापाणी देण्याकरिता एका गृहस्थाला घरी राहू दया असे मी अति.आयुक्त यांना दुरध्वनीवर म्हणत आहे ते संभाषण माझ्या फोनमध्ये आहे. की एका माणसाला त्या घरी राहू दया तो एकटाच घरी राहणार आहे. तो एकटाच माणून असतांना त्याला कोरंटाईन करण्याची गरज नाही तो एकटाच कोरंटाईन होवून घरी राहील परंतु त्या गृहस्थाला कोरंटाईन करण्याकरिता इतके मजबूर करण्यात आले. आणि ती गाय जमा करण्याकिरता जोशी साहेबांनी पशुचिकिस्तक डॉ. महल्ले साहेबांना पाठविले. मी त्या ठिकाणी विरोध केला म्हणून ती गाय कशी बशी थांबली. तेथील लोक म्हणाले की साहेब आमची आमच्या एरियामध्येच चाचणी करावी. ते चाचणी करण्यास तयार नाही. तेव्हा काही अपंग , मेजर जे पेशंट होते त्या लोकांना त्या ठिकाणी ठेवले आणि ७०-८० लोकांची चाचणी घेतली. तेव्हा लोक म्हणू लागले की जेव्हा ७०-

८० लोकांची चाचणी होवू शकते तर आमची कां होवू शकत नाही. वारंवारं महिला म्हणू लागल्या की साहेब आमच्या घराला बाहेरुन कुलूप लावून दया, आम्हांला त्या ठिकाणी पाठवू नका त्या ठिकाणी उल्टा प्रार्दुभाव होण्याची जास्त शक्यता आहे. तरी प्रशासन ऐकण्यास तयार नव्हते. एक नगरसेवक याची विचारणा करीत आहे की साहेब ज्या परिवाराला तुम्ही कोरंटाईन करण्यासाठी नेत आहे त्यांना एक साधे पत्र देवून दया. प्रशासनाने एक लेखी पत्र सुध्दा दिले नाही. साठवणे परिवाराला कोंरटाईन करण्याकरिता नेत आहे, आम्ही त्यांना पुर्ण सहकार्य करण्याकरिता तयार आहोत. परंतु एक साधे पत्र प्रशासनाने दिले नाही. तेथे तानाशाहीसारखे ते वागत होते. माझ्या कडे तेथला एक रिपोटिंग रिझल्ट आहे त्यात ते वीज कापून देवू, पानी खंडीत करु अशा प्रकारच्या धमक्या त्यांनी लोकांना दिला आहे. अशा प्रकारचा कायद्या इंग्रजांच्या काळातील १८५७ चा कायद्या ज्या प्रमाणे काळया पाण्याची शिक्षा इंग्रजाकडून दिला जाईल त्या पध्दतीने काळया पाण्याची शिक्षा देवून राहिले अशा प्रकारचे जीवन सतरंजीपु-यातील मोहल्यातील लोकांनी भोगले आहे. मा.महापौरजी, याच्यानंतर उदभवणारा प्रश्न पावसाळी नाल्या आणि गडरलाईनच्या संदर्भातील आहे. कोणत्याही प्रकारची परवानगी नाही. माझे प्रभागात टेंडर होवून झालेले काम आहे तेथील कामाला रितसर परवानगी दिलेली नाही. मा.महापौरजी, माझ्यावर जो गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मी सभागृहाला विनंती करतो. माझा कोणताही अपराध नसतांना माझ्यावर हा बेकायदेशिररित्या गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मी सभागृहाला विनंती करतो मा. महापौरजी यांच्या माध्यमातून हा गुन्हा वापस घेण्यात यावा. धन्यवाद.

श्री.रविंद्र भोयर:-मा. महापौरजी, गेल्या साडे तीन महिन्यापासून कोव्हीड-१९ च्या नावाखाली या शहरामध्ये जो काही प्रकार झालेला आहे. रुग्ण संख्या घटली पाहिजे, त्यांच्यावर उपचार व्यवस्थीत झाले पाहिजे याकरिता ज्या प्रकारची आवश्यकता होती ती जबाबदारी फक्त् महानगरपालिकेची होती हे समजण्यापैकी मी नाही. मा. महापौरजी, या शहरात ती जबाबदारी रात्र दिवस मेहनत करुन या शहराचे ट्राफिक कंट्रोल करण्याची भुमिका ज्यांनी स्विकारली, एका वस्तीतून दुस-या वस्तीत जाण्यासाठी थोपवून धरणा-या पोलीस विभागाचे मी या ठिकाणी अभिनंदन करतो. या ठिकाणी मा.जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडून ज्या पध्दतीने या शहरामध्ये कोणालाही अन्न धान्याची कमतरता पडू दिली जाणार नाही त्यांच्या पध्दतीने जो आपल्या वतीने प्रयत्न केला त्याबद्दल मा.जिल्हाधिकारी यांचे सुध्दा अभिनंदन करतो. मा.बांगर साहेब या ठिकाणी ते महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून राहून गेले ते सुध्दा यावेळी नागपूर शहरात पोस्टिंगवर होते. त्यांनी त्यांच्या परीने त्यांनी कोव्हीड-१९ च्या क्षेत्रात काम केले त्यांचे सुध्दा मी अभिनंदन करतो. मा.महापौरजी, जेव्हा एखादया घरावर संकट येते किंवा एखादा परिवार संकटात सापडतो तेव्हा त्या घरातील लोकांनी कसे वागले पाहिजे, घराच्या प्रमुखांनी कसे वागले पाहिजे याचे भान ठेवण्याची आवश्यकता आहे. मी कॉग्रेस पक्षाच्या नगरसेवक मा.नितीन साठवणे यांचे ख-या अर्थाने अभिनंदनास पात्र आहेत. तुम्ही स्थगण प्रस्ताव आणला, कोव्हीड-१९ च्या द्वारे यांच्या प्रभागामध्ये काय काय घटनाक्रम झाला. या पुर्ण नागपूर शहरामध्ये सुरवातीच्या काळात सतरंजीपुरा झोनमध्ये पहिल्यांदा कोरंटाईन करण्यात आले. त्या ठिकाणी मोठया प्रमाणात कोव्हीड-१९ चे रुग्ण सापडू लागले आणि त्यांची त्या ठिकाणी जी व्यवस्था केली त्या व्यवस्थेमध्ये जी अव्यवस्था झाली. त्यावर मा.नितीन साठवणे यांनी या ठिकाणी स्थगण प्रस्ताव आणला. यावर त्यांच्या पक्षाचे मत काय आहे याचा विचार न करता मा.नितीन साठवणे यांनी हा विषय आणला आहे. त्यांच्या या विचारावर या सभागृहाने जाण्याची आवश्यकता आहे. हे भारतीय जनता पक्ष, शिवसेवा किंवा कॉग्रेस पक्ष किंवा बहुजन पक्षाशी यांच्याशीच रिलेटेड प्रश्न नाही तर या सभागृहातील १५१ आणि ५ अशा १५६ मा.सदस्यांच्या अस्तित्वाचा त्यांचा प्रश्न आहे. मित्रांनो, आता पाण्याचा प्रश्न संपला तर आता पावसाळा

सुरु झालेला आहे. चेंबर, गडरलाईन या विषयावर मा.सदस्यांना सामोरे जायचे आहे. अनेक मा.सदस्य या सभागृहात या विषयाचा ऊहापोह करतील. परंतु या गोष्टीचे उत्तर मिळेल काय ? मा.महापौरजी, एक नगरसेवक जे मागील अनेक वर्षापासून या सभागृहाचे सदस्य आहेत. त्यांच्या म्हणण्यावर एक इमरजंसीमध्ये चेंबर सुध्दा बनवू शकत नाही. जी मंजूर झालेली गडरलाईन गडरलाईन टाकू शकत नाही. या शहराची इतकी वाईट परिस्थिती झालेली आहे. प्रत्येक वेळी आर्थिक कारण देवून चालणार नाही मित्रांनो. मा.महापौरजी, प्रत्येक वेळी हे सांगतात की आमच्या जवळ पैसा नाही. हा विषय अत्यंत मोठा आहे. हा आता छोटा राहिलेला नाही. कोव्हीड-१९ च्या रुग्णांसाठी राधास्वामी सत्संग मंडळाने जागा दिली. राधास्वामी सत्संग मंडळाने ५ हजार पेक्षा जास्त बेड टाकण्याची अनुमती दिली आणि ती जागा उपलब्ध करुन दिली. ती जागा उपलब्ध करुन दिल्याबद्दल मी राधास्वामी सत्संग मंडळाचे ख-या अर्थाने अभिनंदन करतो. राधास्वामी सत्संग मंडळासारख्या संस्थेने महानगरपालिकेला त्या ठिकाणी कोव्हीड सेंटर टाकण्यासाठी परवानगी दिली. मा.महापौरजी, मी तो घटनाक्रम बघत होतो, त्या वेळेस वैद्यकीय अधिकारी मी विचारले, राधास्वामी सत्संग मंडळ येथे कोव्हीड सेंटर करीत आहे त्या ठिकाणी रुग्णांची राहण्याची व्यवस्था करीत आहे का? मी अत्यंत स्पेसिफिक विचारीत आहे. राधास्वामी सत्संग मंडळामध्ये कोव्हीड रुग्णाची व्यवस्था करीत आहे अशा प्रकारचे मा.अधिका-याने उत्तर दिले. नागपूर शहरात त्यावेळी ४७-४८ टेंम्प्रेचर चालू असतांना आणि हे करीत असतांना त्यांनी हया गोष्टीचा विचार केला नाही काय? मेडीकलचे डीन सुजान मित्रा हे माझे मित्र आहेत जेव्हा मी त्यांना मेडीकल कॉलेजला भेटायला गेलो तेव्हा त्यांनी सांगितले पीपीटी किट घालून आमचा एकही वैद्यकीय अधिकारी, कुठलाही डॉक्टर मेडीकलच्या ए.सी. रुममध्ये एक तासा पेक्षा जास्त ही पीपीटी किट घालून काम करु शकत नाही. तर ४७-४८ टेम्प्रेचरमध्ये या नागपूर शहरातील वातावरणामध्ये राधास्वामी सत्संग मध्ये कोव्हीड सेंटर उभारले आहे यासाठी मी. मा.आयुक्तांचे अभिनंदन करतो. मा.महापौरजी, 'आज तक 'राष्ट्रीय चॅनलवर मी ती न्युज बघितली, नागपूर शहर हे पहिले शहर असे बनले की ५ हजार रुग्णांसाठी हॉस्पीटल उभारले, मला खुप अभिमानही वाटला. कोव्हीड रुग्णांच्या व्यवस्थेकरिता एक जागा सिलेक्ट करुन कोव्हीड सेंटर उभे केले. त्यामुळे आमच्या मनात कुणाच्या नियतीबद्दल आमच्या मनात काहीही प्रश्न नाही. परंतु राधास्वामी सत्संग मंडळ या ठिकाणी पीपीटी किट घालून डॉक्टर कोव्हीड-१९ च्या रुग्णांचे उपचार करु शकतो काय? त्या ठिकाणी एअरकंडीशनची व्यवस्था आहे काय ? डॉ. सुजान मित्रा जे मेडीकलचे डीन आहेत त्यांनी असे सांगितले की एसी रुमचे १६ डिग्रीच्या खाली टेंम्प्रेचर असल्याशिवाय डॉक्टर त्या ठिकाणी एक-दोन तास काम करु शकत नाही. तर ४७-४८ डिग्री टेम्प्रेचरमध्ये डॉक्टर पीपीटी किट घालून राधास्वामी सत्संग मंडळाच्या ठिकाणी उपचार करु शकतील काय ? मला हे मान्य आहे की ही नैसर्गिक आपत्ती आहे. ही कोव्हीडचे संकट हे सगळयावरती येवून पडलेले आहे. परंतु हे करीत असतांना नागरिकांची विश्वासार्ह मिळवावी लागेल. कोव्हीडमध्ये या क्षेत्रात अनेक संस्थांनी काम केले. अनेक शहरात स्वंयसेवी संघटना आहेत. पोलीस मित्रांना नास्ता, जेवनाची कमतरता पडू दिली नाही. घरात राहून त्यांनी चोवीस तास राहून त्यांनी काम केले आहे. मेयो, मेडीकलचा स्टॉफ, नॉन मेडीकल स्टॉफ यांनी या काळात केलेली सेवा हे शहर विसरु शकणार नाही. हा विचार केला तर नागपूर महानगरपालिकेची जबाबदारी मी अत्यंत जबाबदारीने सांगत आहे. महानगरपालिकेची जबाबदारी कोणती आहे तर अशा स्थितीमध्ये प्रायमरी हेल्थ सेंटर चालविण्याच्याच कामाचे आहोत. रुग्नालय चालविणे हे आमचे काम नाही. मा.महापौरजी, आपल्या माध्यमातून मी मा.आयुक्तांना विचारु इच्छितो, आपण ५ महानगरपालिकेचे इस्पीतळ कोव्हीड-१९ साठी सज्ज केले. नागपूर शहरात काल रात्री उशिरा आलेला आकडा आहे. १३१२ रुग्णांची नोंद

झाली..आम्हांला समाधान एवढया गोष्टीसाठी वाटते की आमचा मॉरटीलीटी रेट कमी आहे. आमच्या शहरात १८-१९ रुग्णांना मृत्यू झाला आहे. या शहरात कोरोना सतरंजीपुरा, मोमीनपुरा, भालदारपुरा या वस्तीमध्ये आढळला. त्याने या शहरातील किती वस्तीमध्ये पाय पसरले. आणि ते कां पसरले. नागपूर महानगरपालिकेच्या वैद्यकीय टीमजवळ किती डॉक्टरांची संख्या आहे. जेवढे हॉस्पीटल आहेत तेवढे चालविण्यासाठी आमच्या जवळ जी टीम हवी होती ती टीम ठीक आहे. नागपूर शहरात आमची प्राथमिक आरोग्य सेवा देण्याची जबाबदारी असल्यामुळे त्याकडे जास्त लक्ष दिले नाही परंतु कोव्हीड आल्यानंतर आम्ही किती डॉक्टर या ठिकाणी अपॉईट केले, किती नर्सचा स्टॉफ या ठिकाणी लावलाआहे. मा.महापौरजी, आपल्या माध्यमातून मा.आयुक्तांकडून या गोष्टीचा खुलासा हवा आहे. मा.महापौरजी, नागपूर शहरात जेवढे काही सर्व्हे नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून केले ते सर्व्हेमध्ये किती कोव्हीड पेशंट पॉझिटीव्ह आढळले, महानगरपालिकेने या कोव्हीडच्या संकटावर मात करण्यासाठी आमच्या स्वास्थ्य क्षेत्रामध्ये किती नवीन डॉक्टरांची अपाईंटमेट केलेली आहे. नागपूर शहरात कोव्हीड सेंटरचे हेड कोण आहे. या तीन प्रश्नाचे उत्तर मला आताच देवू शकले तर तर मी या नंतरचे भाष्य करील.

महापौर:- हा स्थगण प्रस्तावावर चर्चा चालणार आहे. जर प्रत्येक वेळी प्रश्न असे असतील तर एकत्रितपणे मा. आयुक्त आपल्या प्रश्नावर उत्तर देतील. माझी विनंती आहे आपण चर्चा करावी.

श्री.रविंद्र भोयर:- मा.महापौरजी, माझ्या माहिती प्रमाणे नागपूर शहराला आणि या सभागृहातील १५६ नगरसेवकांना आश्चर्य वाटेल. कोव्हीड इन्चार्ज मा.महापौरजी, आपण वाईट वाटून घेवू नका तेही जोशी आहेत. डॉ.जोशी जे नॅचरोपॅथीचे डॉक्टर आहेत ते कोव्हीड इन्चार्ज आहेत. कोव्हीडवर उपचार करण्यासाठी आता नॅचरोपॅथीचा कोर्स करायला लागणार आहे. याची गांभीरता आपण लक्षात घेतली पाहिजे मा.महापौरजी, नागपूर शहरात माझी माहिती आहे जे राधा स्वामी सत्संग मंडळ आहे तेथे ६ हजार कोव्हीड रुग्णांसाठी रुग्णालय उभारण्याचा मा.आयुक्त यांनी यशस्वी प्रयत्न केला. त्या ठिकाणी दोनशे बेडला ऑक्सीजन सप्लॉय देण्याचा त्यांचा मानस त्यांनी दाखविला आणि फक्त् आणि फक्त दोनशे बेडला ऑक्सीजन सप्लॉय त्यांनी दिला आहे.

श्री.प्रवीण दटके:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी. माझी विनंती आहे जे प्रश्न येथे उपस्थित होत आहेत त्यांना शेवटी उत्तर देण्याची संधी न देता ते अधिकारी या सभागृहात उपस्थित आहेत त्यांच्याकडून उत्तर घेतले तर हे ठरविण्याचा आपला अधिकार आहे. परंतु वेळोवेळी प्रश्नाचे उत्तर मिळाले तर तो खुलासा होत जाईल. मा.महापौरजी, याप्रमाणे कुणाच्या प्रश्नाचे उत्तर मिळेल, कुणाच्या प्रश्नाचे उत्तर मिळणार नाही. म्हणून माझी विनंती आहे, आवश्यक प्रश्नाचे उत्तर मिळाले पाहिजे.

श्री. प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, स्थगण प्रस्तावाच्या तरतूदीमध्ये स्पष्ट आहे. भोयर साहेबांना अतिरिक्त माहिती पाहिजे असल्यास नियम ४४ अंतर्गत प्रश्न उपस्थित करावा आणि पुढच्या सभागृहामध्ये त्याची माहिती घ्यावी. म्हणून मा.महापौरजी, चर्चा ही चर्चाच असली पाहिजे.

महापौर:- माझी एक सुचना आहे. आपल्याला वाटत असेल की माझ्या स्पेसिफिक प्रश्नाचे उत्तर हवे आहे तर आज सायंकाळपर्यंत आपल्या लेटर हेडवरती माझ्या कार्यालयात प्रश्न आले तर मी त्या प्रमाणे प्रशासनाला त्याची उत्तरे देण्यासाठी सहभागी करायला सांगेल.

श्री.रविंद्र भोयर:- मा.महापौरजी, माझ्या माहितीप्रमाणे प्रशासनाकडून मला उत्तर नंतर मिळणारच आहे.

परंतु मी माझ्या माहितीच्या आधारे माझा विषय याठिकाणी मांडू इच्छितो. परंतु कोव्हीडमध्ये सर्वांना अपेक्षित आहे. याचे राजकारण व्हायला नको. कोव्हीडचे राजकारण व्हायला नको हे संपुर्ण सभागृह या मताशी सहमत आहे. परंतु कोव्हीडमध्ये जे व्यवहार झाला, जी खरेदी झालेली आहे. मा.महापौरजी, या महानगरपालिकेने कोव्हीडच्या या युध्दामध्ये किती पैश्याची प्रोव्हीजन केलेली आहे. किती फंड कोव्हीडशी लढतांना आम्ही वापरलेला आहे. कोणकोणते आयुध विकत घेतली, कोणकोणत्या व्यवस्थेमध्ये किती खरेदी केली आहे. ही महानगरपालिका महाराष्ट्रातील एकच महानगरपालिका नाही. सर्व महानगरपालिका असतील. आजपर्यंत नागपूर महानगरपालिका जी चालत होती ती मा.आयुक्त असतील, या सभागृहातील सदस्य असतील, नागपूर शहराचे पदाधिकारी असतील यांच्या समन्वयातून महानगरपालिका चांगली चालत होती. परंतु या शहरामध्ये काही लोकांनी भासविण्याचा प्रयत्न केला आहे. कोणतीही समस्या निर्माण झाली की 'मॅं हु ना'. माझा एवढा प्राब्लेम आहे, मी असून सुध्दा नसल्या सारखा आहे त्यावर मला ही जनता माफ करणार नाही. शेवटी ही लोकशाही आहे. या लोकशाहीमध्ये कोणी नगरसेवकांचे महत्व तुम्ही समजू शकत नाही. परंतु ज्या पध्दतीने चालले आहे. कुणी बीजेपीचा असेल, कुणी शिवसेनाच असेल, कुणी कॉग्रेसचा असेल, कुणी अपक्ष असेल परंतु या सभागृहात मा. सदस्यांची जात ही एकच आहे. आपण पहिले नगरसेवक आहोत या भावनेतून काम करण्याची आवश्यकता आहे. या अगोदर या महानगरपालिकेत अनेक आयुक्त येवून गेले. मा.महापौरजी, आपल्या माध्यमातून मा.आयुक्तांना विनंती करतो. या गोष्टी मनावर घेवू नका. समजा काही चुका आमच्या आणि तुमच्या झाल्या असतील तर येणा-या काळामध्ये त्या चुकांचा परिणाम या जनतेला भोगता कामा नये. या शहरातील जनतेचे हाल होवू नये. तुम्ही आणि आम्ही या समन्वयाने काम करण्याची हीच योग्य वेळ राहील. जर पोलीटीकल अजेंडा राबवायचा असेल तर या सभागृहामध्ये १९९७ च्या बॅचचे तीन-चार नगरसेवक आहोत. आणि त्यामध्ये १९९७ मध्ये आल्यानंतर आजचे विरोधी पक्ष नेता तत्कालीन मागचे महापौर हे नागपूर महानगरपालिकेचे महापौर होते. या सभागृहाचा स्तर आम्हांला माहीत आहे. या सभागृहाने या महाराष्ट्राला मुख्यमंत्री दिला, या सभागृहाने या महाराष्ट्राला विधानमंडळात डझनाने आमदार पाठविले. या सभागृहाचा चर्चेचा निश्चितपणे स्तर हा वरती होता आणि वरती राहणार आहे. या सभेच्या भावनेला दुर्लक्ष करुन हे शहर चालविता येणार नाही. मा.महापौरजी, मी सांगितले १९९७ च्या बॅचचे आम्ही चार-पाच सदस्य या ठिकाणी आहोत. मा.महापौरजी, ज्यावेळी १९९५ मध्ये या महाराष्ट्रात सत्ता परिवर्तन झाले, १९९५ मध्ये शिवसेना आणि भाजपची सत्ता या ठिकाणी आली. या शहराचे मा.पालकमंत्री नितीनजी गडकरी झाले. मा.महापौरजी, १९९९ मध्ये सत्ता परिवर्तन झाले आणि १९९९ मध्ये सत्ता परिवर्तन झाली तोपर्यंत ही नागपूर महानगरपालिका सुरळित रुपाने चालू होती. सत्ता परिवर्तन झाल्यानंतर विकास कामांचे श्रेय लाटण्याकरिता टी चंद्रशेखर नावाचे मा.आयुक्त त्यावेळी या महानगरपालिकेत आले. आणि त्यांचा एकच उपक्रम होता, 'लोगो को झापना, खुदने छापना, लोगो को झापना, खुद ने छापना' याच्या व्यतिरिक्त त्यांनी काहीच केले नाही. कोणीही गेले तर 'तु चोर है, तु साव आहे का? हा प्रश्न मा.दयाशंकर तिवारी यांनी उचलला तेव्हा महानगरपालिका बरखास्त करण्यात आली त्याचे आम्ही साक्षी आहोत. मा.महापौरजी, २०१९ मध्ये सत्ता परिवर्तन झाले , हे शहर विकासाच्या वेगळया रुपात येत असतांना नागपूर शहर हे कदाचित नागपूर शहर हे हिंदुस्थानात एकमेव असे ग्रीन शहर आहे. ज्या शहरात चांगले मैदाने, चांगले बगिचे, आणि चांगले सिमेंट रस्ते झाले. नागपूर शहरातील ड्रेनेज सुधरविण्याचा प्रयत्न झाला. नागपूर शहरात विविध आयामांवर महानगरपालिकेने काम केलेले आहे. मा.महापौरजी, २०१९ ला सत्ता परिवर्तन पुन्हा झाले त्यानंतर मा. तुकाराम मुंढे आयुक्त म्हणून याठिकाणी आले. राजकीय इतिहास काहीही असला तरी पार्श्वभुमी ही राहणार

आहे काय? ही महानगरपालिका एका विशिष्ट पक्षाच्या हातात आहे म्हणून या महानगरपालिकेत वेगळया पध्दतीने काम करा.ज्या महानगरपालिकेत आमच्या विचाराचे सरकार नाही म्हणून तेथे वेगळया विचाराने काम करा. मला त्या दिवशी वाईट वाटले, राधास्वामी सत्संग मंडळाची बातमी 'आजतक'वर रात्री ११ वाजता मी पाहत होतो. आमच्या मा.महापौरांना माहीत नाही, आमच्या मा.स्थायी समिती अध्यक्षांना माहीत नाही. सगळे नगरसेवक मा.स्थायी समिती अध्यक्ष श्री.झलके यांच्याकडे जातात, तेव्हा स्थायी समिती अध्यक्षांकडे कोणती फाईल येत नाही. महानगरपालिकेच्या स्थायी समितीचा संपुर्ण रेकार्ड गायब करण्याचा, ते पद ज्याला म्हणता येईल हीन दर्जाचे करावयाचे, या शहराच्या विकास कामांना ब्रेक लावण्याचा प्रयत्न जर जर कुणी करीत असेल तर लक्षात ठेवा हे नागपूर शहर आहे. मुंढे साहेब काल तुम्ही बोलतांना एके ठिकाणी बोलले मी बीडचा आहे. तुमच्या माहितीसाठी सांगतो, आमचे नेतेही मुंढे होते आणि तेही बीडचे होते. आमची तुमच्याशी कुठली वैयक्तिक दुश्मनी नाही. सत्ता परिवर्तन झाल्यानंतर एक पक्षाचे सत्ता येते आणि दुसरीची सत्ता जाते. अशा प्रकारे हे सत्ता परिवर्तन होत राहते. याचा अर्थ असा होणार नाही की विकासाच्या कामाला ब्रेक लागणार. नगरसेवकांची जॅन्युअल कामे होणार नाही, या ठिकाणी नगरसेवकांचे महत्व त्या ठिकाणी संपविल्या जाईल. स्थायी समितीला विचारले जाणार नाही. नागपूर शहरामध्ये मोठया प्रकल्पामध्ये कोव्हीड सारखे प्रकल्पामध्ये काम करीत असतांना त्याची माहिती मा.महापौरांना देणार नाही. हेही यांनी आपल्या स्पष्टीकरणात सांगावे. आज तुमची सत्ता महाराष्ट्रात असेल तर उद्या भारतीय जनता पार्टीची सत्ता येईल त्यावेळी तुमची काय स्थिती असेल. तुमचे म्हणणे जर असे असेल तर सत्ता परिवर्तनासोबत सगळे नियम बदलले पाहिजे तर या लोकशाहीला काय अर्थ आहे. जर नागपूर शहरात ही महानगरपालिका चालवायची जबाबदारी तुमची आहे तर तुमच्या सोबत हातात हात घालून काम करण्याची आमची तयारी आहे. काही चुकत असेल तर तुम्ही आम्हांला आणि आम्ही तुम्हांला समज देवू शकतो. मला तर शेवटी असे वाटते हा संघर्ष खुप मोठा नाही. हा संघर्षातून हे शहर उजळून निघेल. मा.महापौरजी, हे शहर आता १३१२ कोव्हीड पेशंटवर आले आहे. अत्यंत कडक व्यवस्था आली. एक वस्तीला एक नियम दुस-या वस्तीला दुसरा नियम, या नियमाने चालणार नाही. या शहरात अनेक मान्यवर आले. या नागपूर शहराची मान्यता मा. नितीनजी गडकरी यांच्या नावाने आहे. या शहराची मान्यता मा.देवेंद्रजी फडणवीस यांच्या नावाने आहे. या शहरात जितकी विकास कामे झाली असतील याच्यामध्ये त्यांचे योगदान आहे. या शहराने हजारो कोटीची विकास कामे पाहिलेली आहे. आज मला हा प्रश्न पडला की हा नेमका संघर्ष कुणाचा आहे. हा विचार जेव्हा मी करतो की हा संघर्ष कुणाचा आहे तर माझ्या हे लक्षात आले की १४-१५ वर्षापासून जे लोक नगरसेवक आहेत. त्यांचा संघर्ष हा १२ वर्षात १४ ट्रान्सफर झालेल्या व्यक्तीसोबत आहे. मा.महापौरजी, आपण आयुक्तांना सांगावे परवा सभागृहात जे घडले हे या सभागृहाची परंपरा नाही. कुणी कुणाला डिवचण्याचा विषय नाही. आम्हांला आमचे मत मांडण्याचा पुर्ण अधिकार आहे. जर प्रफुल्ल् गुडधेला माझे ऐकायचे नसेल तर ते वॉकआऊट करु शकतात आणि मला जर प्रफुल्ल् गुडधेचे मत ऐकायचे नसेल तर मी वॉकआऊट करु शकतो. आम्हांला तुमचे मत ऐकावयाचे नसेल तर आम्ही वॉकआऊट करु शकतो आम्हांला तो पुर्ण अधिकार आहे परंतु वॉकआऊट करण्याचा अधिकार तुम्हांला नाही. मा.महापौरजी, हे शहर कोव्हीडसाठी सज्ज झाले आहे हे फसव्या गोष्टी आहेत याच्यामध्ये त्रुटया आहेत. कोव्हीड आज परमोच्च बिंदूवर पोहचायचा आहे असे माझे मत आहे. या दृष्टीने या शहरात काय उपाययोजनेचे आयोजन मा.महापौरजी, आणि मा.आयुक्तांनी केली पाहिजे. याच्यामध्ये सर्वांचा सहभाग कसा राहील. कारण माझ्या वस्तीतील बोंब मी सांगू शकतो, दुसरा माणुस माझ्या वस्तीतील बोंब सांगू शकत नाही. मा.नितीन साठवणे यांनी जो स्थगण

प्रस्ताव मांडला त्या स्थगण प्रस्तावाच्या दरम्यान मी नितीन साठवणे यांचे अभिनंदन केलेले आहे. यात सगळे जण या निर्णयावर यायला पाहिजे. सर्वांच्या सहमतीने सर्वांच्या साथीने आम्ही कोव्हीड-१९ चा मुकाबला करण्यास तत्पर आहोत. मा.महापौरजी, ज्या वस्तीमध्ये साडे तीन महिन्यापासून जी अव्यवस्था झाली, जे काही प्रश्न असतील ते एकमेंकांशी चर्चा करुन सोडविले जावू शकतात. आम्ही चर्चेच्या माध्यमातून या शहरातील सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी अग्रेसर झाले पाहिजे. मा.महापौरजी, नगरसेवक हे कोणत्याही राजकीय पक्षाचे असाते, नितीन साठवणे यांच्यावर जो एफआयआर दाखल झालेला आहे तो ताबडतोब वापस घ्यावा हे सभागृह ही एकमुखाने मागणी या ठिकाणी मी मागणी करीत आहे. याच्या शिवाय जनप्रतिनिधीच्या विरोधात या पध्दतीने कुणी वागणार असेल तर हे संपुर्ण सभागृह त्या व्यक्तिवर एफआयआर नोंदविल्याशिवाय राहणार नाही. मा.महापौरजी, आमचे प्रामाणिक मत आहे. या कोव्हीडवर जर विजय प्राप्त करावयाचा जर असेल तर सगळे मुर्ख आणि मी एकटा शहाणा असे चालणार नाही. तुम्हांना सर्वांना सोबत घेवून जावेच लागणार आहे. ते पॉलीटिकल बायडींग नसले तरी चालेल. सगळयांच्या साथीनेच मुकाबला करु शकतो. मा.नितीन साठवणे यांच्या स्थगण प्रस्तावाला मी समर्थन करतो. या कामात ज्यांनी ज्यांनी विरोध केला, ज्यांनी ज्यांनी अडथळा निर्माण केला, ज्यांनी ज्यांनी नितीन साठवले वर एफआयआर टाकून नितीन साठवणेला अडकविण्याचा प्रयत्न केला. मा.महापौरजी, आपली वैद्यकीय टीम तर इतकी चांगली होती ज्या सतरंजीपुरा झोनमध्ये कोव्हीडचा धिंगाणा चालू होता त्या सतरंजीपुरा झोनमध्ये आम्ही कोव्हीड टॉपवर असतांना गर्भवती महिलेची टेस्ट केली. त्यांना दवाखान्यात पाठवायला पाहिजे होते. जेव्हा वस्तीत टेस्ट करुन राहिले तर कोरंटाईन करण्याचा काय फायदा. मा.महापौरजी, मी एक सुचना या ठिकाणी करु इच्छितो, यातून आपल्याला कुठेतरी बाहेर पडावे लागेल. घरात बसून काम होणार नाही. सोशल डिस्टंनचे पालन करावे लागेल, हॅन्ड वॉश करावा लागेल, यासाठी जी पध्दत आपण अवलंबून राहिलो त्यावर पुर्नविचार करण्याची गरज आहे त्यामध्ये सुधारणा करावी लागेल. मा.महापौरजी, तेलंगाना राज्यामध्ये त्यांनी हैद्राबादला ज्या दिवशी ४ मे ला शेवटचा लॉकडाऊन झाला, नंतर तो संपला. त्या दिवशी त्यांनी घोषणा केली यानंतर लॉकडाऊन नाही, सगळे बाजार उघडे राहतील, एक चांगली सिस्टीम त्यांनी टाकली त्यामध्ये संपुर्ण देशामध्ये कोव्हीडच्या रुग्णांमध्ये मोठया प्रमाणात भर पडत असतांना तेलंगानामध्ये खुप जास्त रुग्ण आढळले नाही. अत्यंत चांगली उपाययोजना त्यांनी केली ती आम्ही करु शकतो.. आमचे महानगरपालिकेचे १० झोन आहेत. त्या झोनचा टोल फ्री नंबर ज्यांना कुणाला त्रास होईल. कुणाला सर्दी झाली असेल, कुणाला खोकला असेल, कुणाला तापाचे लक्षण जाणवत असतील त्यांनी त्या टोल फ्री नंबरवर कॉल करायचा. त्या ठिकाणी आपली हेल्थ टीम जाईल. त्याला कोरंटाईन करायचे की, त्याला ॲडमीट करायचे की त्याला साधे औषध देवून ठीक करु शकतो याची चाचपडणी करतील आणि त्याला त्या ठिकाणी पाठवतील. मा.महापौरजी, मी अत्यंत विश्वासाने सांगतो, या महानगरपालिकेने घरोघरी जावून रुग्णांचे चेकअप केले त्यात एकही रुग्ण कोव्हीडचा सापडला नाही. या नागपूर शहरात घरोघरी केलेल्या सर्व्हेमध्ये एकही रुग्ण सापडला नाही. ती घरोघरी जावून तपासणी केली ती बरोबर झाली किंवा नाही झाली हा वादाचा विषय असू शकतो. त्याचा काही रिझल्ट आला नाही. मा.महापौरजी, आपले सगळया झोनचे टोल फ्री नंबर दिले तर ज्यांना ज्यांना त्रास जाणवेल तो ताबडतोब त्या टोल फ्री नंबरवर सेंटर वर कॉल करेल. आमची टीम त्या ठिकाणी जावून त्याचे निराकरण करेल. त्या करिता आवश्यकता आहे आमच्या जवळ असणा-या डॉक्टरांची संख्या, आमच्या जवळ असणा-या नर्सेसची संख्या, आमच्याकडील मेडीकल स्टॉफ किती आहे. त्या करिता असणारे आर्थिक प्रोव्हीजन, या सर्व गोष्टीवर सांगोपांग चर्चा झाली पाहिजे. मा.महापौरजी, यासाठी मोठे प्रोव्हीजन करावे

लागणार आहे. त्या प्रोव्हीजनकरीता सुध्दा तयार राहीलो पाहिजे. कोव्हीड-१९ वर राजकारण न करता नागपूर शहराच्या सर्वांगिण स्वास्थ्य विकासाकरिता एकत्रितपणे लढा देवू असा विश्वास व्यक्त करतो आणि नितीन साठवणे यांच्या प्रस्तावाला समर्थन करतो, धन्यवाद.

श्री.पुरुषोत्तम हजारे:- मा.महापौरजी, नितीन साठवणेजी यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे. कोणत्याही टी.व्ही चॅनल वर आपल्या नागपूर शहराच्या बातम्या आम्ही जेव्हा ऐकतो तेव्हा चांगले वाटते की आपले मा.आयुक्त नागपूर शहरासाठी चांगले काम करीत आहेत. नॅशनल चॅनेल, कोणतेही लोकल चॅनलवर प्रत्येक ठिकाणी मा.मुंढे साहेबांचे कौतुक केले जात आहे. आम्ही सुध्दा कौतुक करतो. परंतु नगरसेवक हा स्वत:च्या घरच्या कामासाठी, स्वत:च्या स्वार्थासाठी काम करीत नसतो तर त्याला लोकांनी निवडुन दिलेले असते. त्या लोकांच्या भावना घेवून मा.आयुक्त आणि मा. महापौरजी कडे धाव घेतो. त्या दृष्टीकोनातून नितीन साठवणे यांनी त्यांच्या प्रभागात जे काही घडत होते आणि जे काही घडले त्याकरिता त्यांनी वारंवारं धाव घेतली, अधिका-यांकडे, अति.आयुक्तांकडे धाव घेतली परंतु त्यांना त्याचे मनात संतुष्ठी मिळत नव्हती की ते लोकांना न्याय देवू शकत नाही. त्यांना लोकांचे फोन येत होते. त्या परिसरातून मला सुध्दा फोन येत होते कारण पुर्व विधानसभाची निवडणुक मी लढलो होतो त्यामुळे मला ही फोन यायचे की तुम्ही या आणि परिस्थिती बघा. मा.महापौरजी, कोव्हीडचा विषय चालू असतांना जो एरिया सील केला होता त्या परिसरामध्ये एका मांजराचे पिलू जावू शकत नव्हते तर अशा परिस्थितीमध्ये माणुस कसा जाणार आहे. माझे मित्र नितीन साठवणे यांनी मला अवगत केले, त्यांनी त्यांच्या नेत्यांना सुध्दा अवगत केले. मात्र प्रशासनाकडून त्यांच्यावर जो गुन्हा दाखल केला आपल्या माध्यमातून सर्व मा.सदस्यांच्या माध्यमातून सर्वांचे सहमत आहे किंवा नाही माहीत नाही. मी सर्वांच्या वतीने आपल्याला विनंती करतो त्यांच्यावर जो गुन्हा दाखल झाला तो मागे घेण्यात यावा. आपल्या महाराष्ट्रामध्ये राष्ट्रवादी कॉग्रेस आणि शिवसेना यांचे सरकार आहे आणि यांनी एक चांगले व्यक्तिमत्वाचे अधिकारी या शहराचा चेहरा मोहरा कसा बदलेल याकरिता एक आयुक्त नागपूर शहरात पाठविला आहे. ते चांगल्या पध्दतीने काम करीत आहेत. त्यांचे धन्यवाद मानतो. या प्रस्तावाला माझा विरोध आहे इतके सांगतो आणि मला बोलू दिले त्याबद्दल धन्यवाद.

श्री.किशोर जिचकार :- मा.महापौरजी, नितीन साठवणे यांनी जो प्रस्ताव ठेवलेला आहे त्याला माझे समर्थन आहे. त्याचप्रमाणे त्यांच्यावर जो पोलीस स्टेशनमध्ये एफआयआर झाला तो त्वरित मागे घेण्यात यावा ही विनंती, याठिकाणी मी करतो. त्यांनी आपल्या वक्तव्यामध्ये बरेच ठिकाणी अशी अडचण आली ती सांगितली. परंतु आमच्या भागात कोव्हीड – १९ चे रुग्ण असल्यामुळे मी त्यांच्या काही अडचणी समजू शकलो नाही. परंतु सभागृहाला आणि सर्व मा.सदस्यांना माझी विनंती आहे अशा प्रकारचे जे कार्य आपल्या नागपूर शहराने भोगले मला असे वाटते ते नक्कीच खेदजनक आहे. मी नितीन साठवणे यांच्या प्रस्तावाला समर्थन देतो, धन्यवाद.

श्री.दिनेश यादव:- मा.महापौरजी, जो क्षेत्र प्रतिबंधत घोषित किये गये थे, उन क्षेत्रो के नागरिको को काफी तकलीफ सहना पडा है, और उसी तरह से जिन लोगो को क्वारंटाईन किया गया, उन्हे भी काफी तकलीफ सहना पडा, मा.सदस्य, श्री नितीन साठवणे पर जो केस दर्ज की गयी है वह वापस ली जाये.

श्रीमती प्रगती पाटील:- मा.महापौरजी, मा.सदन आताच मा.सदस्य पुणेकर यांनी नागपूर शहरातील पुर्ण परिस्थिती ठेवली. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यात जे कॉर्डीनेशन असायला हवे ते या तीन-चार महिन्यात शहरात कुठेही दिसले नाही. हे या शहरासाठी, या शहरातील जनतेसाठी अत्यंत दुर्दैवी बाब आहे.

वारंवार मा.आयुक्तांना मा.सदस्य विनंती करीत होते की कॉर्डीनेशनमध्ये काम करावे. तुमच्या कामाबद्दल आम्हांला कोणताही दुराग्रह आणि तिरस्कार असण्याचे काही कारण नाही. परंतु तुम्ही कुठलेही काम करीत असतांना नगरसेवकांना विश्वासात घेवून काम केले पाहिजे. आपण हेल्थ विभागाचे काम पी.डब्लू.डी. विभागाला देण्यात आले. सिवरलाईन असो, चेंबरचे काम असो, दुरुस्तीचे काम असो ते पी.डब्लू.डी. विभागाला देण्यात आले. त्यात आम्हांला खुप अडचण जात आहे. पावसाळयामुळे खुप अडचण आहे. पी.डब्लू.डी. विभागाला चेंबरलाईन कुठून कुठपर्यंत गेली आहे, गडरलाईन कुठून कुठपर्यंत गेली आहे याचा अभ्यास पी.डब्लू.डी. विभागाला नाही. हे काम करीत असतांना अत्यंत त्रास होत आहे. मा. आयुक्तांना आपल्या माध्यमातून विनंती आहे त्यांनी तात्काळ जे पावसाळी कामे हेल्थ विभागाला सोपविण्यात यावे. आता पावसाळा आहे आणि नागरिकांना याचा त्रास होता कामा नये. नागपूर शहरात या दोन दिवसात जो प्रकार घडला, आपण आमसभेतून निघून गेलात. आपण आपल्या खुर्चीची गरिमा ठेवली नाही. त्या खुर्चीची गरिमा ठेवणे आपले काम होते. आपले नगरसेवकांच्या येणा-या समस्यांना उत्तर देणे, त्यांच्या समस्या दूर करणे हे आपले कर्तव्य आहे आपण ते न पार पाडता या सभागृहातून निघून गेले. ही खेदजनक बाब या नागपूर शहरातील जनतेने पाहिली. नागपूर शहरातील जनता आमच्याकडे संशयाने बघत आहे की नगरसेवक इतक्या वाईट प्रकारे वागू शकतात काय? त्या दिवशी जो प्रकार घडला मला वाटते तो या तीन महिन्याचा नगरसेवकांचा रोष होता. मला आठवते, मी आणि आमच्या माजी महापौर मायाताई इवनाते आम्ही मा.आयुक्तांना भेटायला गेलो. त्यांच्या पी.ए.नी सांगितले की माजी महापौर भेटायला आल्या. सध्या त्या केंद्रात राज्य मंत्री आहेत त्यांना असे उत्तर देण्यात आले की आपल्याला एक तास बाहेर थांबावे लागेल. मा.महापौरजी, आम्ही लोकप्रतिनिधी आपल्या घरची कामे घेवून गेलो नव्हतो. लोकप्रतिनिधी हे लोकांच्या समस्या घेवून भेटायला जातात. मा.महापौरजी, माझी एक विनंती आहे, कोणताही नगरसेवक असो, कोणत्याही पक्षाचा नगरसेवक असो त्यांना आपण वेळ दिलीच पाहिजे. आम्हांला काही अर्जंट काम नसतात असे नाही. आम्ही रिकामे असतो काय की आम्ही आयुक्तांच्या चेंबंर समोर येवून बसतो. मा.आयुक्तांना विनंती आहे की त्यांनी कुठल्याही नगरसेवकांना थांबवू नये. काही काही नगरसेवकांना दोन-तीन तास चेंबरच्या बाहेर थांबविण्यात आले आहे. ही माझी तिसरी टर्म आहे परंतु मला असे आठवत नाही की कुणी आम्हांला ५-१० मिनीटे चेंबरच्या बाहेर थांबविलेले आहे. आपल्याला आपल्या खुर्चीची गरिमा सांभाळता आलेली नाही. ती कशी सांभाळता येईल हे बघितले पाहिजे. नगरसेवकांनाही तेवढाच सन्मान दिला पाहिजे. नागपूर शहरात लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांचा समन्वय साधून नागपूर शहराच्या विकासासाठी, आता कोव्हीडचे नवीन संकट या नागपूर शहरावर आले आहे आणि या दोन-तीन दिवसांत नागपूर शहरात महानगरपालिका आणि आयुक्त यांचा वाद मिडीया समोर आला ही अत्यंत खेदजनक आणि चिंताजनक बाब आहे. हा वाद संपवून नागपूर शहर या कोव्हीडच्या संकटात लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने एकत्रित मिळून काम केले पाहिजे अशी विनंती करते. धन्यवाद.

श्रीमती आयशा ऊईके:- मा.महापौरजी, मा.सदन. सतरंजीपुरा झोन येथील नितीन साठवणे यांच्यावर प्रशासनातर्फे केस लादण्यात आली आहे. त्याचबरोबर मोमिनपुरा क्षेत्रातील लोक पांचपावली सेंटरमध्ये क्वारंटाईन होते त्याठिकाणी त्या लोकांना खूप तकलीफ झाली आहे. त्या लोकांनी कोणत्याही प्रकारचे उधम माजविले नाही, नितीन साठवणे यांच्यावर जी कार्यवाही केली आहे ती कार्यवाही हटविण्यात आली पाहिजे. आमच्या कडील काही एरिया आहेत ज्यांच्या एरियामध्ये जे काही झाले असेल त्याच्यावर कार्यवाही केली नाही परंतु आमचे जे नेते आहेत याच्या अगोदर तसे झाले तर केस करण्यासाठी लोक समोर येत होते. नितीन

साठवणे यांच्यावर जी केस झाली आहे ती मागे घ्यावी अशी माझी विनंती आहे.

श्री.जुल्फेकार अहमद भुट्टो:- मा.महापौरजी, मा.सदन, सभी अधिकारीगण, पत्रकार महोदय, कोविड-१९ ने जो साडे तीन महिने पहले नागपूर शहर मे दस्तक दिया, उसके बाद पेशंट मिलने का सिलसिला शुरु हुआ, नागपूर शहर मे कुछ जगहो पर पेशंट निकले, उसके बाद मे हमारे प्रभाग ८ मे एक पेशंट निकला और उस क्षेत्र को हॉटस्पाट के नाम से घोषित किया गया, उसके बाद उसको लॉक करना और उसकी बाउंड्री घेरने का काम शुरु हुआ, तो उस हॉटस्पाट को मोमिनपुरे का नाम देकर गोलीबार चौक से गांजाखेत चौक, गांजाखेत से लाल इमली, फुवारा चौक, अग्रेसन भवन, गितांजली, भगवाघर चौक, मेयो हॉस्पिटल, गार्ड लाईन, भानखेडा, दादरे का पुल, पांचपावली फिर गोलीबार चौक इतना बडा एरीआ और इस एरीये को मोमिनपुरे का नाम दिया गया। मैं सदन से और मा.महापौरजी से पुछना चाहता हुं कि, मोमिनपुरा मे कम से कम २५ से ३९ एरीये आते है, जिसमे डोबरे का कुंवा है, टिमकी है, मोमिनपुरा है, अंसारनगर, हंसापुरी बोरीयापुरा, सैफीनगर, डोबीनगर, खटीकपुरा, कसाबपुरा, शेख बारी चौक, टिमकी तीन खंबा चौक, भानखेडा जैसे बहोत सारे एरीये आते है। क्या इसको मोमिपुरा नाम देना जरुरी था, क्योंकि जब की खदान एरीआ और बहोत सारे एरीये इसमे शामिल हो गये थे, पर इसमे जो भी पेशंट निकलता था तो पोस्ट ऐसी आती थी कि, मोमिनपुरा से इतने पेशंट निकले। मैं प्रशासन से पुछना चाहता हुं कि, क्या इसको हम नंबरींग नही कर सकते थे, क्योंकि पुरे शहर का जो देखने का नजरीया है, उसमे सारे पेशंट मोमिनपुरा से निकले ऐसा वातावरण नागपूर शहर मे फैल गया। यह बात मुझे और हमारे क्षेत्र के जो प्रतिष्ठीत नागरिक है, उनको अच्छी नही लगी, और इस बात पर प्रशासन ने दखल देना चाहिये। दुसरा जैसे हम कोविड मे काम कर रहे है और यह काम हम लोगो की जान बचाने के लिये कर रहे है, आयुक्त साहब ने एफर्ड लेकर बडे प्रमाण मे नागपूर शहर मे काम किया है। पर निगम आयुक्त के निचे बहोत सारे अधिकारी काम कर रहे थे, पर काई भी अधिकारी जनप्रतिनिधीसे बात करने को तैयार नही था, बरोबर जवाब देने को तैयार नही था, एक जनप्रतिनिधी अगर आपसे कोई बात कर रहा है तो यह समझ लेना चाहिये कि, उसके पिछे एक हजार लोगो का प्रेशर है। और वह हजार लोगो के प्रेशर मे आपसे जवाब पुछना चाहता है, तो कम से कम उसको दो लाईन मे जवाब मिलना चाहिये, ताकि जनता की जो बात है वह जनप्रतिनिधी पहोंचा सके। इस काम मे बहोत बडी गॅप थी और हमको बरोबर समाधानकारक जवाब नही मिल रहा था, इस बात का बहोत दुख हुआ, इतना बडा एरीआ बंद कर दिया गया, मेयो हॉस्पिटल मोमिनपुरा से नजदीक है, हम सहा.आयुक्त को बार बार विनंती कर रहे थे कि, अगर मेयो हॉस्पिटल मे कोई पेशंट जाता है तो ऑटो जाने के लिये वहां पर रस्ता नही है, एक दिन मोमिनपुरा क्षेत्र के एक बर्जुग अब्दुल लतीफ नाम के उनको हार्टअटैक का दौरा आगया उनको ऑटो मे डालकर मेयो हॉस्पिटल की दिशा मे ले जाने का काम किया गया, और मेयो हॉस्पिटल के पास मे जो बॅरीकेट लगे थे, और वहां पर जो पोलिस डिपार्टमेंट के लोग उस बॅरीकेटस की सुरक्षा मे बैठे थे, उनको बार बार विनंती करी कि इन बर्जुग को लेकिन उन्होने जाने नही दिया। और उन बुजुर्ग को अटॅक आ गया, उनको मेयो हॉस्पिटल लेजाना बहोत जरुरी है, लेकिन वह कोई बात तुम्हारी सुनने को तैयार नही थे, वह बोलते थे कि, हमे कार्पोरेशन की तरफ से यही आदेश है और हम यह गेट नही खोलेगें। ऐसा करते करते उनको ऑटो से निकालकर बॅरीकेट के ऊपर से उठाकर ले जाने की कोशिश की गयी, और उतने मे उनका वहां पर निधन हो गया, उन्होने दम तोड दिया। मतलब इंसानियत खत्म हो गयी है, ऐसा लगा, क्योंकि हम लोगो को बचाने के लिये काम कर रहे थे, तो यह एक झटका हमारे सामने आ गया और दुसरा जब हम कोरंटाईन कर रहे थे, उस वक्त एक भय का वातावरण था, हमने बार बार लोगो को बहोत समझाया कि, हमारी जान बचाने के लिये यह काम हो रहा है, ऐसे भय के वातावरण मे यह काम

नही होना चाहिये, क्योंकि हम जनता के हित मे काम कर रहे थे, तो इस बात का भी हमने ध्यान रखना चाहिये, जो कोरंटाईन सेंटर मे जब हमारे खाना सप्लॉय के ठेकेदार को चेंज किया गया तो एक दो बार वहां पर प्राब्लेम हुऐ पर हमने लोगो को समझाया कि, प्रशासन जो काम कर रहा है यह हमारे हित मे कर रहा है, इसलिये कोई तकलीफ है तो हमने बर्दाशत करना चाहिये, हमने आम जनता को बहोत समझाया। और इतनी बडी बाउंड्री जिसके अंदर ढाई से तीन लाख लोग वहां पर थे, उसके अंदर मे जो लोग रहते है उनकी क्या व्यवस्था है, उसपर भी शासन ने ध्यान देना चाहिये। जनप्रतिनिधी अगर अपने साथ खडा होंगा तो हमको सपोर्ट होंगा, मानना या नही मानना यह हमारे अधिकार की बात है, प्रशासन ने उसकी बात सुनलेना चाहिये, थी। मा.महापौरजी, नितीनजी साठवणे पर जो गुन्हा दाखल किया है, वह वापस लेना चाहिये, वह जनप्रतिनिधी है, उसने अपने घर का काम नही बताया, उसने कोई अपने लिये काम नही किया, उनपर जो एफ.आय.आर. दर्ज किया उसको हमने वापस लेना चाहिये, मैं इस मत का हुँ । धन्यवाद।

श्री.जितेंद्र घोडेस्वार:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय आयुक्त, अधिनस्त सभागृहातील अधिकारी, सन्माननीय सभागृह, पत्रकार बंधू. निश्चितच २३ मार्च हा संपुर्ण भारतामध्येच नव्हेतर विश्वामध्ये कोव्हीड-१९ चा प्रकोप आला. तसेच भारतामध्ये जानेवारी मध्ये पेशंट मिळाला. याचे नियोजन म्हणून भारत सरकारने प्रतिबंधात्मक कार्यवाही आणि श्रमिक मजुरांना एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी पलायन करण्याची व्यवस्था करुन दयायला पाहिजे होती. त्यांचे थकीत देणे होते कंपनीकडे, मालकाकडे, ते तात्काळ देण्याचे निर्देश सरकारने दिले पाहिजे होते आणि त्यांना त्यांच्या गावाला पाठविण्याची व्यवस्था सरकारने केली पाहिजे होती. परंतु तसे झाले नाही आणि देशात अचानक लॉकडाऊन लागला आणि अन्नधान्यापासून  महामारी निर्माण झाली. इतकेच नव्हे तर लोकांमध्ये ज्या पध्दतीचे भितीचे वातावरण निर्माण करण्यात आले. धारा १८८, धारा १४४ अंर्तगत  शहरातील नागरिकांना एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी जाताना पोलीसांतर्फे मारझोड केली असेही प्रकार झाले. या काळात नागरिकांना अन्नधान्यासाठी नगरसेवकांकडे, सामाजिक संस्थेकडे जावे लागते, यात त्यांची खुप हयगय झाली. काही कां असो,  नगरसेवकांनी, जनप्रतिनिधींनी मानवतेच्या कल्याणाकरिता आपआपल्या सोयीनुसार, आपआपल्या परीने या गोरगरीब लोकांना अन्नाचा, जेवनाचा पुरवठा केला. नागपूर महानगरपालिकेचे डॉक्टर, सफाई कर्मचारी आणि पोलीस वर्ग यांचे मी मनपुर्वक अभिनंदन करतो. २७ जानेवारीला मा.आयुक्त नागपूर शहरातील आपल्या कार्यालयात रुजू झाले. २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनानिमीत्त झंडावंदन मा.महापौरजी आपल्या उपस्थितीत तत्कालीन आयुक्तांच्या उपस्थितीमध्ये झाले. तेव्हापासून ते आजपर्यंत पाच महिने मा.मुंढे साहेबांना येथे झाले. निश्चितच एक शोले मधला डॉयलॉग आहे.'तीन तीन मिल तक जब बच्चा रात को रोता है तो मॉ कहती है की सो जा वरना  गब्बरसिंग आ जायेगा ' मुंढेसाहब भी जब हमारे नागपूर नगरी मे आये उन्होने अपनी कार्यप्रणाली का एक शिस्त एकअनुशासन इस नागपूर शहर मे बनाया लेकीन इस नागपूर शहर मे अनुशासन बनाने के बाद मे सत्ताधारी वर्ग ने समन्वय बनाने की परिस्थितीयां बनायी  लेकीन वह बन नही पायी।  जो भी पुरातन कालीन गड्डे थे, वह गड्डे बुजाने की समिक्षा लगाई।  लेकीन मा.आयुक्त साहेब ने सारे के सारे वर्कआर्डर निरस्त कर दिये, चालु काम बंद कर दिये। जो खड्डे पडे थे उसको बुजाने की कार्यवाही मे  गॅप थी, कहां गया था लेकिन इसको पाच महिने हुए अभी तक यह काम  नही हुऐ। पिछले अनेक वर्षो से कहां भ्रष्टाचार हुआ, कहां नही हुआ इसको उजागार इस पाच महिने मे करना चाहिए था।  मा.आयुक्त साहेब जो महानगरपालिका मे पिछले ३०- ४० सालो से जो ऐवजदार मे भरती हुए है उनका प्रमोशन हुआ, कैसे हुआ इस काम  मे लग गये, इन्होने भी जो नगरसेवक के प्राकलन तयार किया वह जे.ई. हो, टी.ए. हो, डेप्युटी हो, या एक्झक्युटीव्ह हो जिन्होने

प्राकलन तयार किये उसका फीडबॅक आयुक्त साहब को देना चाहिए था l जिन कामो का प्राकलन तयार किये इसके कार्यदेश दिये गये है उसको आप कैसे निरस्त करेगे l इन्होने फीडबॅक नही दिया बल्की इन्होने मुंढे साहब का गाजाबाजा किया जैसे शोले फिल्म के गब्बरसिंग के आजूबाजू रहनेवाले जो गुंडे थे उन्होने जैसा दरारा पैदा किया उसीतरह इस महानगरपालिका मे जो निक्कमे लोग बैठे थे उन्होने इस तरह का दरारा पैदा किया l और यह डर नगरसेवको मे पैदा किया की मुंढे साहब कितने शिस्तप्रिय है, मिलने नही देते, बात नही करते l इस महानगरपालिका मे पिछले १५-१५, २०-२० सालो से जो नगरसेवक है, जो जनप्रतिनिधी है वह तालमेल बैठा रहे थे, जनप्रतिनिधी जिसका ६४ हजार लोकसंख्या का प्रभाग, एक लाख लोक का प्रतिनिधीत्व करने वाला वह जनप्रतिनिधी जिसको सामान्य जनता के समस्या का काम शहर के हर कोने मे काम करना पडता है l जब वह जनप्रतिनिधी झोन स्तर पर यह समस्या रखते है, तब उसकी फाईल ज्युनिअर इंजिनिअर तयार करता है l बडी मुश्किल से वह स्टॅन्डिंग कमेटी मे लेके जाता है l मैने पिछले तीन सालो से इस बात को उजागर किया कि, बहुजन समाज पार्टी के नगरसेवको को कितना फंड मिला तो मुश्किल से मुझे ६५ लाख मिले, एक फाईल तयार की एकता नगर मे जिस काम की आवश्यकता नही थी, यह फाईल जे.ई. और टी.ए.ने तयार की, एक्झक्युटीव्हने सर्व्हे किया तब मुझे प्रावधान मिला, २० लाख का प्रावधान स्टॅन्डिंग कमेटी से मिला l आज भी वहां जाओगे तो वहां पर पुरा पानी भरा हुआ है, पिछले १५ दिनो से सक्शन मशीन बुलाने का काम कर रहा हूँ , सक्शन गाडी बुला के मुझे पानी निकालना पड रहा है l इस परिस्थिती मे बॅनर्जी मॅडम हो या कोई भी हो, कोई कार्यवाही नही हुई l सहा.आयुक्त इन्होने तीन वर्ष मे पहले वहां का दौरा किया था l इस तरह की समस्या नगरसेवक रखने का काम करते है l मा.मुंढे साहेब आयुक्त बन कर यहां पर आये, सदसदविवेक के साथ सभी नगरसेवको के साथ मे समन्वय का वातावरण बनाना चाहिए था l जो चोर है उनके मन मे डर रहता है पिछले कुछ सालो मे जो भी कार्ये हुये है उनकी चौकशी करके उनपर कार्यवाही करनी चाहिए l परंतु सभी को एकी दिशा मे भरडने का काम आपने किया है l यह न्यायोचित नही है और इनमे मान्यवर मा.महापौरजी मै निश्चित रुप से शहर के अंदर मे मा. आयुक्त के बारे मे कुछ कहना चाहूँगा,

कभी फुल कभी शोला,

कभी शबनम की तरहा लोग मिलते है,

बरसे हुए मौसम की तरह, बरसे हुए मौसम की तरह

ऐसी कुछ परिस्थितीया कुल पाच महिने के अंदर मे नागपूर महानगरपालिका की हो चुकी है l हमने मा.आयुक्त के माध्यम से जो झोन मे समस्या होती है, झोन के वार्डो के माध्यम से जो गडरलाईन, चेंबर, और आयआरडीपी रस्ते मे जो खड्डे पडे है उसके लिए हमने बार बार आयुक्त, सहा.आयुक्त् को निवेदन दिया l बरसात के पहले उसपर उपाययोजना के तौर पर हमे दो-दो लाख की नस्तीया बनाके के बताए l नगरसेवको को घुमा घुमा कर ज्युनिअर इंजिनिअरने के नस्ती बनाई जब प्रोव्हीजन के लिए बोला तो बोले की अभी प्रोव्हीजन नही है l फिर बताया की क्लब करके नस्तीयां तैयार होगी, ४२ लाखची चेंबर, गडरलाईन की नस्तीयां बनाने के लिए लगाया l इसके बारे मे पुछते है तो प्रोव्हीजन नही l हमने एक्झक्युटीव्ह साहब से पुछां की इस संदर्भ मे आपने आयुक्त महोदय से मिटींग की क्या ? इसके बारे मे आपको कोई अधिसुचना मिली है क्या ? तो बोलते है की हमारी मिटींग नही हुई, तो आपने कैसे इसको बनाने के लिए कहां, उनके उपर के अधिकारी को पुछा तो वह बोलते है की इस पर कोई चर्चा नही हुई है l चर्चा हुई नही है तो फिर नस्तीयां क्यु बनाई l जब हम नगरसेवक बोलते है तो नस्ती बनती है तो वो अधिकृत नही होती है क्या ? साईड व्हिजीट

नही हुई क्या ? जब हम वहां के नागरिक को बताते है की यह काम हात मे लिया गया है, चार-पाच महिनों मे यह काम हो जायेगा तो नागरिक बार बार पुछते है की कब काम होगा और हम पर वह आक्रोशित होते है। गालीगलौच करते है , जब कोई व्यक्ति का गडर भर जाता है और वह जब झेडो के पास आता है अपनी समस्या लेके तो उसकी क्या स्थिती होती है। जब उसका काम नगरसेवक के पास मे आता है और जब गाडी मंगाओ तो गाडी आती नही है। हमको फिर इंजिनिअर को बताना पडता है तो वह कहता है की एक लाईन मे रिचेंबर है क्या ? वह रिचेंबर का प्लग लाने मे आठ दिन चले जाते है। यह बात फिर डेप्युटी तक जाती है, फिर डेप्युटी एक्झक्युटीव्ह इंजिनिअर को बताता है, एक्झक्युटीव्ह इंजिनिअर बॅनर्जी मॅडम है फिर तब गाडी आती है। यह जो प्रक्रिया है इसे आठ-दिन हो जाते है, फिर वह नागरिक जिसकी समस्या होती है वह बहोत अग्रेसीव्ह हो जाता है और गालीगलौच पर आ जाता है। यह सारी समस्यो से हमे बरसात के दिनो मे उलझना पडता है। यह बात सहा.आयुक्त इनको मालूम नही होती है, जो लोक जमीन पर काम करते है, जो लोगो के संपर्क मे रहकर काम करते है उनको यह बात मालूम होती है। मा.महापौरजी, निश्चित रुप से इस दिशा मे हम आशीनगर झोन के सभी १६ के १६ नगरसेवको ने जब बैठक ली तो एक्झक्युटीव्ह इंजिनिअर तो आये ही नही, १ बजे मिटींग थी वह ३ बजे तक आता हूँ बोले उसके बाद भी वह तो आये नही, हम दिन भर राह देखते रहे। फिर रोष बढ गया और वह मिटींग् पोस्टपोन करनी पडी। फिर हमने आशीनगर झोन के मा.सभापती के माध्यम से १८ तारीख को मिटींग बुलाई, उस मिटींग मे सहा.आयुक्त और एक्झक्युटीव्ह इंजिनिअर समाधानकारक उत्तर दे नही सके। वो कहते है की प्रावधान ही नही है, तो नस्तीयां क्यु बनाई। ४७ लाख को क्लब करके १६ नगरसेवको की नस्तीयां बनाई, आज एजन्सी काम करने के लिए तैयार नही। कोई एजन्सी है क्या आज, जो पेंडींग काम कर सके। साधा एक टाका बनाने को २ लाख के काम के लिए एजन्सी नही है। ऐसे परिस्थिती मे जनता का रोष सामान्य नगरसेवकों के प्रति होता है। नगरसेवक उनकी समस्या दूर नही कर सकता है तो उसका नगरसेवक बनने का क्या उपयोग है। मा.आयुक्त साहब, आपको लगता है तो महानगरपालिका बरखास्त करनी चाहिए। नही तो जो चोर है उनपर कार्यवाही करनी चाहिए। शहानिशा करने के लिए ५-५ महिने लगते है, शहानिशा करने को ३ महिने तो कोव्हीड-१९ मे चले गये। दो महिने आपने इस सारी परिस्थिती का जायजा करने मे लगा दिये। फिर वही काम की संमिक्षा ही संमिक्षा चल रही है। कब काम पुरा होगा, जनता का कब समाधान होगा। ऑनलाईनपर जो सामान्य नागरिक कम्प्लेंट करते है, वह सामान्य व्यक्ति कम्प्लेंट करते है, ६४ लाख के प्रभाग मे जो जनप्रतिनिधी चुनके आते है जो एक लाख का पाप्युलेशन है, उसकी दखलअंदाजी उसकी नस्ती बनने के बाद मे बंद की जाती है तो उसने क्या करना चाहिए। कैसे कार्य करना चाहिए, समाज मे क्या जबाब देना चाहिए। यह साडे तीन महिने मे जहां जनता कंगाल हो चुकी है, उधारी मे दुकाने से राशन नही मिल रहा था, जिनके राशनकार्ड है उनको राशन की दुकान से अनाज नही मिल रहा था। और मजदूर वर्ग जिनके पास मे राशन कार्ड नही थे और उनके गावो मे वापस जाने की व्यवस्था नही थी, ऐसे लोगो को किस परिस्थिती का सामना करना पडा है। कुछ लोगो ने गले का दुपट्टा लेके फासी लगाने की कोशीश की, । निश्चित रुप हमने हमारे सामाजिक क्षेत्र मे जनता को मदत करने का काम किया। परंतु अभी बरसात के मौसम मे नगरसेवक जब दबाव की परिस्थिती मे चलेगा एक टाका और गडरलाईन नही बना सकता तो नगरसेवक को मुंह छिपा के घुमना पडेगा। अभी आने वाले दो साल के बाद चुनाव है, साडे तीन साल मे हमने अच्छे भी काम किये होगे तो वो काम मे पानी फिर जाता है। तो इसलिए मा.आयुक्त साहेब हमारा आप के प्रति कोई शिकवा नही है, आपने कार्यप्रणाली को चुस्त और दुरुस्त कराया निश्चित रुप से हम आपका स्वागत करते है। लेकिन इस के साथ मे नगरसेवक के साथ मे तालमेल और समन्वय करके विकास

निश्चित रुप मे होना चाहिए । उसकी दखलअंदाजी और खबरदारी आप के माध्यम से होना चाहिए । मा.महापौरजी, मै आपके माध्यम से कहना चाहूँगा की जो भीकाम है वह आयुक्त साहब करेंगे । और परसो के सभागृह मे जो घटना व्यक्तिगत टिपणी हुई, आम्ही भारताचे लोक, गणराज्य, लोकशाहीला मानतो. तर व्यक्तिच्या प्रतिष्ठेला जर ठेस पोहचत असेल तर निश्चितच तो त्याचा स्वाभीमान आहे आणि त्याला आपला हक्क आणि अधिकार न्यायोचित मागण्याचा अधिकार आहे. आणि त्यामुळे जातीभेद, लिंग, भिन्न भिन्न भाषा मिळून भारतीय संविधान बनलेले आहे. निश्चितच व्यक्तिगत टिपणी होत असेल तर त्या व्यक्तिला त्रास होणार आहे. संत तुकाराम महाराज ते होवून गेले त्यांनी महिमा काय, मा.आयुक्त महोदयांचे नाव तुकाराम आहे. फिल्म इंडस्ट्री मध्ये जितेंद्र आहेत आणि मी एक जितेंद्र आहे. माझ्याशी तुलना होवू शकते काय ? तुलना करीत असतांना कुठल्या महापुरुषांचे नाव घेतांना कुणाशी तुलना केली पाहिजे याचे सुध्दा भान ठेवले पाहिजे. जर राष्ट्राची एकात्मता मानतो त्या व्यक्तिची प्रतिष्ठा त्यामध्ये आहे. कृपया मा.साठवणे साहेबांवर जो अन्याय झाला, जो अत्याचार झाला आणि गा-हाणे त्यांचे म्हणणे ऐकुन घेण्यात आले नाही. त्यांनी जो स्थगण प्रस्ताव या ठिकाणी ठेवला. त्यांच्यावर जी केस लागलेली आहे. निश्चित रुपाने मा.महापौरजी यांना विनंती करतो, ते त्यांना सेजेस्ट करतील. निश्चितच हा प्रस्ताव या ठिकाणी आणला आणि जे पावसाळी विकास कामे आहेत त्यांना तात्काळ गती देण्याचे मा.महापौरजी आपण निर्देश दयावे. स्थगण प्रस्तावाचा मी विरोध करीत आहे आणि येथेच थांबत आहे. धन्यवाद

महापौर:- मला वाटते सभागृह चालविण्याकरिता सर्व सदस्यांनी उपस्थित राहणे गरजेचे आहे. मी दोनदा नावाचा पुकारा करील, दोन्ही वेळेस ते उपस्थित नसतील तर तिस-यांदा नावाचा पुकारा करणार नाही हे कृपया सर्वांनी लक्षात घेवून सहकार्य करावे.

श्रीमती दर्शनी धवड:- मा.महापौरजी, मा. सभागृह, सभागृहात बसलेले मा.सदस्य , सर्व अधिकारी वर्ग, पत्रकार बंधू. मा.महापौरजी, लोकांनी आम्हांला निवडून दिलेले आहे. नगरसेवक म्हणून आम्ही आपआपल्या प्रभागात काम करीत असतो. खरे तर नगरसेवक आम्ही एक ब्रीज चे काम करतो, लोक आमच्यापर्यंत आपल्या समस्या घेवून येतात आणि आम्ही ते प्रशासनासमोर मांडतो आणि त्या समस्या सोडविण्याचा पुर्ण प्रयत्न करतो. प्रशासन आणि नगरसेवकामध्ये कम्युनिकेशन गॅप असली तर ती समस्या कशी सोडवयाची. लोकआमच्या मार्फत त्यांना येणा-या समस्यांचा फॉलोअप घेतात आणि आम्ही प्रशासनाकडून त्या कामाचा फॉलोअप घेत असतो. जर सुनावणीच होत नसेल तर त्या समस्येचे निराकरण कसे होणार आहे. मा.महापौरजी, नितीन साठवणे यांनी आपली येथे आपबिती सांगितली, त्यांच्यावर काय काय प्रसंग आले ते सर्व सांगितले आणि सर्वांनी ती ऐकले. मला असे वाटते की ते एक कोरोना योध्दा आहेत. ते त्या काळात लोकांपर्यंत पोहचले आणि लोकांच्या समस्या घेवून ते प्रशासनापर्यंत पोहचविण्याचे काम त्यांनी त्यांच्या एरियामध्ये केले. त्यांचा उद्देश एकदम साफ होता. ते प्रशासनाला पुर्ण मदत करण्यास तयार होते परंतु प्रशासन त्यांना मदत करण्यास तयार नव्हते याची मला खुप खंत वाटते. मा.महापौरजी, तुम्हांला एक गोष्ट मी सांगू इच्छिते, माझ्या एरियामध्ये मागासवर्गीय महिलांचे एक वस्तीगृह आहे. ते कोव्हीड सेंटर म्हणून तयार झाले असून दहा मिनिटात कोव्हीड पेशंट त्या ठिकाणी येत आहे अशी माहिती मला तेथे काम करणा-या एका सफाई कर्मचा-याने दिली. ते वस्तीगृह कोरंटाईन सेंटर माझ्या घरापासून हार्डली पाच मिनीटाच्या वॉकींग डिस्टन वर आहे. मला ती गोष्ट माहीत नाही. मी जेव्हा तेथे गेली तर तेथे ५०-६० लोकांची गर्दी झाली होती. तेव्हा लोकांना आश्चर्य वाटले की आमच्या नगरसेविकेला माहीत नाही की येथे कोरंटाईन सेंटर तयार केले आहे आणि त्या ठिकाणी कोरंटाईन रुग्ण आणले जाणार आहे. मी पोहचल्यावर तेथील अधिका-यांना

विचारले तर त्यांनी मला सांगितले , भविष्यात जर पेशंट वाढले तर हे वस्तीगृह कोरंटाईन सेंटर म्हणून योग्य राहील किंवा नाही हे फक्त आणि फक्त पाहायला अधिकारी आलेले आहेत. याठिकाणी कोंरटाईन सेंटर तयार झालेले नाही आणि या ठिकाणी कोणताही पेशंट येणार नाही. मी त्या ठिकाणी येईपर्यंत लोकांनी खुप गोंधळ घातला होता. कारण लोकांना असे वाटत होते की पश्चिम नागपूर तर सेफ आहे या भागात एकही पेशंट नाही. त्यामुळे हे कोरंटाईन सेंटर उभे करु दयायचे नाही. मी या विचाराने त्या ठिकाणी आली होती तेव्हा हार्डली ५०-६० लोक होते त्यानंतर ३५० लोक त्या ठिकाणी जमा झाले होते. ५ लोकांच्या वरती लोकांनी एकत्रित यावयाचे नाही असे असतांना त्या ठिकाणी ३५० लोक उपस्थित होते. कोणीही काहीही ऐकण्याच्या तयारीत नव्हते, तेथे फार गोंधळ झाला होता. हा सगळा प्रकार कशामुळे झाला आणि हा गैरसमज कां निर्माण झाला तर फक्त आणि फक्त कम्युनेशन गॅपमुळे झालेला आहे. प्रशासनाने मला मॅसेज दिला असता की आम्ही फक्त पाहणी करायला येत आहे असा निरोप प्रशासनाने मला दिला असता तर मी लोकांना समजावून सांगितले असते. या सगळया प्रकारात फक्त नगरसेवकच वाईट असतात असे दृश्य निर्माण झाले होते . एवढया लोकांना असे वाटते की आपल्या नगरसेवकांला ही बाब माहीत नाही,आपली नगरसेविका ही बेजबाबदार आहे. जे अधिकारी त्या ठिकाणी आले होते ते गर्दी बघून तसेच निघून गेले. कारण लोक दगड घेवून उभे होते, मला त्या ठिकाणी पोलीसांना बोलवावे लागले. प्रशासनाला असे वाटते की नगरसेवक आमच्या विरोधात उभे होते. दोन्ही बाजूला शेवटी नगरसेवकच वाईट ठरतात. मा.महापौरजी, अजूनही नागपूर शहर कोरोना मुक्त झालेले नाही. कोव्हीड पेशंट वाढतच चालले आहे. नगरसेवक म्हणून या तीन महिन्यात सर्व नगरसेवकांनी आपआपल्या भागात आपआपल्या परीने जेवढे करता येईल तेवढी लोकांना मदत केली. मग मी अन्नधान्याने असो, शुगर, बि.पी. असलेल्या लोकांना औषधे पोहचविणे असो, मजुरांची जेवणाची व्यवस्था असो, मजुरांना मायघरी वापस पाठविणे असो ही सगळी कामे नगरसेवकांनी केलेली आहेत. मा.महापौरजी, माझी प्रशासनाला विनंती आहे, जे काही कोव्हीडच्या लढाईसाठी ज्या काही गाईडलाईन असतील ते नगरसेवकांना सांगाव्यात. नगरसेवकांना विश्वासात घ्यावे, आम्ही पुर्ण सपोर्ट करण्यासाठी तयार आहोत. आयुक्त साहेबांनी या तीन महिन्यात चांगले कामे केलीत. आम्ही सगळे सहकार्य करण्यासाठी तयार आहोत, आम्हांला फक्त आणि फक्त विश्वासात घेवून माहिती दयावी. आमचे असे म्हणणे नाही की आम्हांला विचारा परंतु आम्हांला आमच्या भागातील माहिती तर दयावी.लोक आमच्यापर्यंत पहिले येतात आणि आम्हांला विचारणा करतात. मा.महापौरजी, माझी आपल्या माध्यमातून प्रशासनाला विनंती आहे. या कोव्हीडच्या संदर्भात ज्या काही गाईडलाईन तयार होतील त्याची नगरसेवकांना माहिती झाली पाहिजे. मा.नितीन साठवणे यांच्या विरुध्द जी पोलीस कार्यवाही झालेली आहे ती वापस घ्यावी. मला बोलू दिले त्याबद्दल धन्यवाद.

श्री.मनोज चाफले:- मा.महापौरजी, मा.सदन. नितीनजी साठवणे यांनी जो स्थगण प्रस्ताव या सभागृहात आणला त्याचे मी खुप अभिनंदन करतो. नितीनजी साठवणे यांचा जो प्रभाग आहे त्या लगतचा माझा प्रभाग आहे. त्यांचा प्रभाग २१ आणि माझा प्रभाग २२ आहे. त्यांच्या प्रभागामध्ये ज्यावेळेस पेशंट पॉझिटीव्ह मिळाला त्याचा त्रास त्यांना निश्चित झाला. त्यासाठी त्यांनी संघर्ष सुध्दा केला. त्या लगतच काही दिवसात माझ्या प्रभाग आणि त्यांच्या प्रभागाची बार्डर एक होती. बाजूलाच सागर बिल्डींगमध्ये दोन पॉझिटीव्ह पेशंट मिळाले. हा परिसर सील करण्याची प्रक्रिया जेव्हा सुरु झाली. जेव्हा ही प्रक्रिया सुरु करतांना किती मोठा एरिया सील केला पाहिजे याची विचारणा मी जेव्हा अधिका-याकडे केली त्याचे उत्तर अधिका-यांनी दिले नाही. सतरंजीपुरा झोन आणि माझा लगतचा गांधीबाग झोनचा एरिया सील करण्याची प्रक्रिया सुरु केली. त्या

प्रक्रियेमध्ये खुप त्रास झाला. त्या प्रक्रियेमध्ये आम्ही सुध्दा या कोरोनाच्या महामहारीत लोकांना अन्नधान्याची आवश्यकता आहे त्यासाठी आम्ही किचन सुरु केले. मिलींद मेश्राम साहेब यांच्याकडून परवानगी घेवून आम्ही किचन सुरु केले आणि तेथुन लोकांना अन्नसामुग्रीचा पुरवठा करण्याचा प्रयत्न केला. पॉझिटीव्ह पेशंट जेथे मिळाला त्याच्या पासून एक किलोमीटरचा परिसर सील करण्यात आला. पेशंट ज्या भागात आहे तो भाग सील केला पाहिजे. सी.ए. रोडपासून इतवारी स्टेशनपर्यंत जाणारा रस्ता होता तो पुर्णपणे सील केला. येथल्या लोकांना जाण्यायेण्यासाठी तो त्रास होताच हे कंटोनमेंट झोन घोषित केले. हे कंटोनमेंट झोन घोषित करण्याचे काही नियम असतात. हे कंटोनमेंट झोन घोषित केले त्या ठिकाणी संपुर्ण व्यवस्था दयावी लागते. आम्हांला त्यांनी सांगितले याच्यातून आपल्याता निघता येणार नाही, आतमध्ये जाता येणार नाही. आतमध्ये जाता येणार नाही तर दुधवाला असेल, कचरावाला असेल आणि ज्या काही व्यवस्था असतील त्या येण्यासाठी काय? मग तुम्ही त्या व्यवस्था करुन दिल्या पाहिजे. मा.महापौरजी, मी आपल्याला सांगू इच्छितो, ज्या वेळेस संपुर्ण एरिया सील केला, आम्ही अन्नधान्याचे किट वाटप करण्याचा प्रयत्न केला तेव्हा पोलीसांनी सक्त निर्देश दिले. हया कंटोनमेंट झोनमध्ये अन्न् देखील शिजविता येणार नाही आणि लोकांपर्यंत पोहचविता येणार नाही. मग आम्ही म्हटले की आता काय करायचे तर ते म्हणाले तुम्हांला किचन दुस-या प्रभागात हलवावे लागेल. पेशंट आमच्याच भागात असता तर आम्ही निश्चित केले असते. पेशंट ज्या भागातून निघाला त्यापासून एक किलोमीटरचा एरिया सील करण्यात आला होता आणि हा भाग दूर होता. आमच्या गांधीबाग झोनच्या मा.सभापती वंदना यंगटवार सभापती आहेत. तो एरिया जेव्हा सील केला तेव्हा आम्ही जमा झालो, पुष्कळ नागरिक त्या ठिकाणी जमा झाले. त्यांचे असे म्हणणे होते की एक व्यक्तिला जाण्यायेण्यासाठी जागा दयावी त्यातून आम्ही अन्नाची किट पुरवू या अनुषंगाने त्यांना परवानगी मागितली परंतु पोलीसांनी परवानगी दिली नाही. येथून कुणाला जाता येणार नाही, आणि कुणाला येता येणार नाही असे त्यांनी स्पष्ट सांगितले अशा प्रकारची वागणुक करण्यात आली. ज्या वेळेस मा.सभापती वंदनाताई यांना मी म्हटले की मा.आयुक्तांना फोन लावून या विषयावर चर्चा करु. त्यांनी फोन लावला आणि फोनवर बोलू लागल्या. त्यांना मी म्हटले की मला फोन दया, मी बोलतो. मी सुध्दा फोन वर बोलू लागलो, मा.आयुक्तांना सर्व अडचणी सांगितल्या. आयुकत साहेब म्हणाले हे नियमामध्ये करावे लागेल.आपल्याला नियमामध्ये जावे लागेल. मी सुध्दा म्हटलो की आपण कंटोनमेंट झोनचे सर्व नियम फॉलो केलेत काय ? तर मा.आयुक्तांनी बोलता बोलता फोन कट केला. त्यांचे बोलणे आणि माझ्या बोलण्यात संपर्क तुटला. जर नगरसेवकांसोबत अशा पध्दतीने वागत असतील तर नगरसेवकांशी पुर्णपणे बोलत नसतील त्यांना माहिती देत नसतील तर अशी अरेरावी चालणार नाही. तुम्हांला नगरसेवकांना सांगावे लागेल, तुम्हांला सर्व माहिती दयावी लागेल की कंटोनमेंट झोनचे नियम असे आहेत. अशा प्रकारची व्यवस्था तेथे केलेली आहे. अशा प्रकारे वागत असेल तर या विषयावर आम्ही कुणाशी चर्चा केली पाहिजे. मा. महापौरजी, मी आपली एक इंटरव्हयु बघितला, त्यात आपण सुध्दा म्हणाले की अशा पध्दतीने महानगरपालिका चालत आहे. मा.महापौरजी यांना म्हणावे लागले की आपल्याकरिता खुर्ची सोडण्यास तयार आहे. ही आमच्या नगरसेवकांसाठी दुर्दैवी घटना आहे. मा.महापौरजी यांनासुध्दा असे वक्तव्य दयावे लागले. मा.महापौरजी, एक घटना मी तुम्हांला सांगू इच्छितो, कंटोनमेंट झोनमध्ये एका महिलेला प्रसव वेदना सुरु झाली. त्या महिलेला त्रास व्हायला लागला, मी म्हटले त्या महिलेला प्रसव वेदना सुरु झाली असून तीला खुप त्रास होता आहे तिला कंटोनमेंट झोनच्या बाहेर काढण्यासाठी आपण काही तरी केले पाहिजे. महिलेला बाहेर काढणे आवश्यक आहे. आम्ही पोलीसांना म्हटले तर ते म्हणाले आम्हांला महापालिकेचे सक्त निर्देश आहेत. या महिलेला आपण बाहेर काढू शकणार नाही. महिला बाहेर जावू शकत

नाही. मी म्हटले, त्या महिलेची प्रसुती तुम्ही रस्त्यावर करणार आहे काय? ते म्हणाले, मुंढे साहेबांचे सक्त आदेश आहेत, असे आदेश आम्हांला दिले आहेत. अशा प्रकारचे आदेश ही फार दुर्दैवी घटना आहे. आम्ही पोलीसांशी वाद घातला आणि त्या महिलेला टिनाच्या खालून काढून कसेबसे डागा हॉस्पीटलला पाठविण्यात आले. अशा प्रकारची व्यवस्था होत असेल आणि कंटोनमेंट झोन मध्ये अशा प्रकारची व्यवस्था केली जात असेल तर ती काय कामाची नाही. या कोरोनाच्या बिमारी पासून लोकांना वाचविण्याचा प्रयत्न करीत आहे की अशा पध्दतीने लोकांना मारण्याचा प्रयत्न होत आहे. यातून आपण काय साध्य केले. ज्या कंटोनमेंट झोन मध्ये जे राश्नचे दुकान होते. आपल्याला तर माहीत आहे या कोरोना काळात अन्नधान्याचा कसा तुटवडा होता. कशा प्रकारे लोकांना अन्नधान्यासाठी त्रास होता. अन्नधान्य घेण्यासाठी कंटोनमेंट झोन मध्ये आतमध्ये येवू देत नव्हते. लोकांकडे अन्नधान्य नव्हते. त्या लोकांना राशन घेण्यासाठी कंटोनमेंट झोनमध्ये येता आले पाहिजे अशी तर व्यवस्था करावी असे त्यांना म्हणू लागलो परंतु त्यांनी अशी कुठलीही व्यवस्था करण्यास तयार नव्हते. अशा प्रकारचा त्रास लोकांना देण्यात आला. मा.महापौरजी, पुष्कळ असे विषय आहेत, आपल्याला सर्वांना माहीत आहे. ज्या प्रकारचा निर्णय या तीन महिन्यात घेण्यात आला, मला असे वाटले की महानगरपालिका बरखास्त तर नाही झाली. बरखास्त झाली असेल म्हणूनच आमच्याशी काही बोलणे करीत नाही, आम्हांला काही माहिती दिली जात नाही. अधिका-याचा वचक आपल्यावरती आहे. मुंढे साहेबांनी ज्या प्रकारचे वातावरण निर्माण केले त्याप्रमाणे त्यांच्याशी कुणी भेटू शकत नाही, बोलू शकत नाही. त्यांच्याशी फोनवर बोलत असतांना मध्येच फोन स्विचऑफ होतो. नागपूर महानगरपालिका बरखास्त झाली असून सर्व अधिकार मा.आयुक्तांना आहेत. सर्व निर्णय मा.आयुक्तच घेतील. जनप्रतिनिधींना बोलण्याचा काहीच अधिकार नाही अशी सर्व भावना आमच्या मनात निर्माण झाली. मा.महापौरजी, या सर्व नगरसेवकांच्या भावना आपण लक्षात घेतल्या पाहिजे. आपण या सर्व गोष्टीवर निर्णय घेतला पाहिजे. मा.महापौरजी, आपल्याला माहित असेल जेव्हा या कंटोनमेंट झोनच्या फाईल थांबलेल्या आहेत. ज्या वेळेस पेशंट घरी निगेटीव्ह होवून आला, कोरंटाईन होवून त्याला १४ दिवस झाले आता कंटोनमेंट झोन काढण्याची तयारी करावी. यासाठी मी जैन साहेब आणि जोशी साहेबांशी बोलणे केले की साहेब आता पॉझिटीव्ह पेशंट निगेटीव्ह होवून १४ दिवस झाले आता कंटोनमेंट एरिया काढायला पाहिजे. त्यांचे म्हणणे असे होते की २८ दिवस झाल्यानंतर काढण्यात येईल. जवळजवळ ४५ दिवस तो एरिया कंटोनमेंट झोनमध्ये ठेवण्यात आला अशा पध्दतीचा त्रास तेथील लोकांना होता, त्याच्या आजूबाजूच्या लोकांना दिला गेला. अश पध्दतीने त्रास दिला जात असेल तर ही विचार करण्याची बाब आहे. आपण काम केले पाहिजे, आपण चांगले अधिकार आहेत त्याची आम्ही सुदधा तारीफ करु. परंतु अशा पध्दतीने काम असेल तर आम्ही निश्चितपणे त्याचा विरोध करु. आणि ज्या पध्दतीने आपल्याला माहीत आहे जे तीन-चार महिन्यापासून साधे जे छोटे छोट काम आहेत ते ज्या पध्दतीने थांबलेले आहेत. आम्हांला लोकांनी मागणी केल्या प्रमाणे चेंबर बनविता येत नाही. पावसाळयाचे दिवस आहेत, प्रभागातील छोटे छोटे काम होत नाही. लोक म्हणतात की नगरसेवकांना काय सांगायचे. नगरसेवकांना चोर साबीत करायला आपण निघाले आहे. आपण निश्चितपणे करावे. एकच अधिकार ईमानदार आणि सर्व नगरसेवक चोर ही भावना लोकांमध्ये जागृत करीत आहे हे बरोबर नाही. हे आपण करु नये. मा.महापौरजी, ज्या छोटया छोटया कामांसाठी नगरसेवकांना मा.आयुक्तांना विनंती करावी लागत आहे ही दुर्दैवी घटना आहे. मी नितीन साठवणे यांनी जो स्थगण प्रस्ताव ठेवला आणि त्यांना जो त्रास झाला तो त्रास मला निश्चितपणे माहीत आहे. नितीन साठवणे यांच्या स्थगण प्रस्तावाला मी समर्थन करीत आहे. आणि या सर्व बाबींवर निश्चितपणे निर्णय घ्याल अशी मी मा.महापौरजी विनंती करतो, धन्यवाद.

श्री.मनोज सांगोळे:- सन्माननीय.महापौरजी, सन्माननीय सदन, चांगले लिहिणारे पत्रकार आणि दुरदर्शनवर चांगले दाखविणारे पत्रकार बंधुनो. जगामध्ये १९७ देशात हा कोव्हीडचा प्रार्दुभाव होवून भितीचे वातावरण निर्माण होवून लाखोच्या संख्येने लोक मरणार होते. आपल्या पत्रकारबंधूनी मदत म्हणून आपला पेमेंट वाटला काय? काही पत्रकारांनी वाटला आहे. जे पत्रकार लोक बसुन लिहितात त्याचे काय ? बोलण्याची संधी खुप दिवसापासून मिळाली. पुर्ण देश एका जागी थांबला. प्रार्थना स्थळे, ऐअरपोर्ट, कंपन्या बंद झाल्या. आमच्या देशामध्ये दारुची दुकान चालू करण्याची पुन्हा परवानगी मिळाली.चायचे दुकान चालवायला परवानगी मिळाली नाही. जे रस्त्यावर जाणारे बिमार लोक आहेत त्यांना दवाखान्यात जाण्याची परवानगी मिळाली नाही त्यांना ते वापस आणेपर्यंत मौत च्या मुंहमध्ये गेले. ३ वर्षाचा मसनघाटाचा रेकार्ड उचलून बघाल तर इतके लोक मरत होते परंतु या कोरानाच्या काळात इतके लोक मेलेले नाहीत. कुणी ॲटॉक ने मेले, ज्यांच्या घरी पैसे नव्हते त्यांनी फाशी लावली. कोरोनाने मरण्याची संख्या खुप कमी होती. माझी विंनती आहे, माझ्या परिसरातील लोकांना जे देशातील क्रिम लोक होते ते विदेशात गेले होते त्यांना फ्री मध्ये परत आणले. चायनाच्या लोकांना आम्ही आणले काय? ते मा. पंतप्रधान यांनी आणले. चायनाची मेट्रो ट्रेन आम्ही आणली काय? तिचा वापर आम्ही करतो काय? विदेश निती कुणाच्या हाती आहे. ती आमच्या हाती आहे काय? या देशातील कामगार वर्ग जो पैदल चालत आपल्या गावी गेला त्याला गावात गेल्यावर प्यायला पानी मिळत नव्हते. आमच्या देशातील प्रत्येक नागरिक हा आपल्या देशावर प्रेम करणारा आहे. एक राशनकार्ड एक राष्ट्र, एक शाळा एक शिक्षण, एक शाळा चांगली बनविली काय? त्याच्यासाठी कधी लिहीतो काय? तुमचे लेकरे महानगरपालिकेच्या शाळेत जातात काय? मुंढे साहेबांनी दवाखाने बनविले ते पुराने दवाखाने होते. मी नवीन दवाखाना बनविण्यासाठी मुंढे साहेबांना पत्र दिले. मा. उद्योगपती रतनजी टाटा सढळ हाताने पैसा देवू केले होते. २०१८ पासून तुमची सत्ता होती. त्या पत्राला तुमच्या सरकारने थारा दिला नाही. आणि आता जे सरकार आले आहे त्यांनी सुध्दा थारा दिला नाही. मुंढे साहेबांनी ५ चांगले दवाखाने बनविले त्यांचा सत्कार केला पाहिजे. माझ्या एरियामध्ये नारा घाट बनविला, त्या पध्दतीने त्या ठिकाणी दवाखाना बनवू शकत होतो, वाचनालय बनवू शकत होतो. माझ्या एरियामध्ये पुनर्वसन केंद्र बनविले मला कधी विचारले काय? मुंढे साहेब येवून राहिले म्हणून त्या ठिकाणी काम चालू होते ते काम थांबविण्यात आले. १ ते १८ लोकांना पुनर्वसन केंद्रात फक्त ठेवले त्याठिकाणी जे पोलीस क्वार्टर आहेत त्या ठिकाणी कोरंटाईन सेंटर निर्माण करु शकत होतो. रस्ता मोठा नव्हता म्हणून आले नाहीत. माझ्या प्रभागात नारी घाट तयार करण्यात आला आहे मा.आयुक्तांनी त्या घाटाची पाहणी करावी. तसेच पुर्नवर्सन केंद्राला सुध्दा मा.साहेबांनी भेट दयावी. जेव्हा फुकटया लोकांसाठी कार्यक्रम राबवितो तर जे इमाने इतबारे काम करतात त्यांच्या सत्कार केला पाहिजे. आम्ही काय चोर आहोत. गेल्या दीड महिन्यापासून रस्त्यावर गंदे पानी वाहत आहे. सहा.आयुक्तांकडून प्रभागातील विकास कामाच्या फाईल अडकवून ठेवण्यात येत आहेत. मागील ३ महिन्यापासून अनेक विकास कामाच्या नस्ती प्रलंबित आहेत त्या त्वरित निकाली काढण्यात याव्यात. आम्हांला झाकणे नाही मिळत आहे. ७२ झाड प्रभागात लावण्यासाठी मागत आहे ते मिळत नाही आहे. आम्ही चोर असू तर चौकामध्ये चाकू नाही तर सरळ भर चौकात एसिड टाकून जाळा. आमचाही मान सन्मान आहे, माय बापांनी आम्हांला फुकट पैदा नाही केले, कुणी भगवानाने पैदा नाही केले. हा नितीन साठवणे आहे ना याने गडबड केली असेल तर कार्यवाही झाली पाहिजे या मताचा मी आहे. परंतु साठवणे हा काही आपल्या घरच्यासाठी काम करीत नव्हता. ते पत्र मी वाचले की मा.आयुक्तांच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी. यावर चर्चा झाली असे लिहिले नाही आहे. जर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला तेव्हा

मा.महापौरजी सोबत चर्चा झाली काय? परंतु सहा.आयुक्तांच्या पत्रामध्ये स्पष्ट उल्लेख आहे. आम्ही यांच्याशी विचार विनिमय करुनच काम केले. सरकारी कामात अडथळा निर्माण करतो असा त्यात आरोप आहे. तो गुन्हेगार असेल तर त्याच्यावर कार्यवाही झाली पाहिजे. तीन महिन्यापासून मी त्या घाटावर राहतो मरणा-यांची संख्या कमी आहे. मुंढे साहेबांचे कोरोना महामारीचे नियोजन असे होते की कमी शिकल्या असल्या कारणाने लोक घाबरुन राहिले, त्यांना आमच्या सारखा जागृत करणारा माणूस असेल तर ज्याने घाबरविले त्याला चमकविण्याची माझी तयारी आहे. माझी विनंती आहे, कोरोना रोग हा गंभीर आहे त्यावर सर्वाच्या सहकार्याने काम करण्याची भुमिका आहे. समजा जर नगरसेवकाने गडबड केली असेल तर त्याची चौकशी करण्यात यावी नाही केली असेल तर गुन्हा वापस घेण्यात यावा एवढीच विनंती या सभागृहाला आपल्याद्वारे करतो. धन्यवाद जयभीम, जयभारत.

श्री.दिपक चौधरी:- मा.महापौरजी, मा. सदन, आदरणीय पत्रकार बंधू आणि आदरणीय चित्रकार आयुक्त साहेब यांनी ज्याप्रमाणे कोव्हीड-१९ चे चित्रण केले, त्याचे वर्णन चित्रीत केले. एखादे चित्र बनवून दिले आणि त्याला प्रेक्षक वर्ग भेटला नाही , त्याची स्तुती करायला मित्र मंडळी भेटली नाही. त्या चित्रात काही प्राब्लेम आहे काय? त्याचे कुठून पांढरे केस झाले काय , की कुठून काळे केस झाले आहे हे सांगायला प्रेक्षक वर्ग, आपले सहकारी असले पाहिजे ज्यांनी त्याची स्तुती केली पाहिजे, त्यात खोड काढली पाहिजे. आता सगळे १५६ नगरसेवक आम्हांला कुठले काम उरलेले नाही काय ? माझा एक प्रश्न आहे, या शहराला मा.महापौर नाहीत काय? मा.महापौरजी यांची गरज नसेल तर महापौर दिला कसाला, त्यांची नियुक्ती कशाला करण्यात आली. मा.आयुक्त साहेबांचे कुणाच्या प्रति, त्या चेअरच्या प्रति काही बंधने आहेत की नाही. नागपूर शहरात कोव्हीड-१९ आला, या कोव्हीडच्या संदर्भात मा.महापौरजी यांचेशी न बोलणे, स्व:त निर्णय घेणे, मा.सदस्यांशी न बोलणे, स्व:त निर्णय घेणे. यात माझ्या लक्षात एक गोष्ट आली यांच्या खाली असलेले असिंस्टंट यांना फोन केला तर ते एक एसएमएस करा असे म्हणतात. अनेक लोक आहेत त्यांना एसएमएस करता येत नाही. फोन तर उचलायचा नाही. जर समस्या असेल तर सांगायची कुणाला. कोण जिम्मेदार आहे, नगरसेवक कां पागल आहेत का, की मुर्ख आहेत. ही जबाबदारी नगरसेवकांवर दिलेली आहे. महानगरपालिकेमध्ये त्यांच्या समस्येचे निराकरण जर कुणी करीत असेल तर त्यांनी पाठविलेला नगरसेवक, त्यांनी बनविलेला महापौर, त्यांनी बनविलेले उप महापौर अशी यंत्रणा आहे. आणि हा अधिकार संविधानाने दिलेला आहे. या तीन महिन्यामध्ये एक गोष्ट लक्षात आली की नाला भरला असेल तर तसाच राहू दया, आणखी एक गोष्ट लक्षात आली जी कचरा गाडी येत होती त्यावर लिहिलेला नंबर होता, मग वॉटरवर्क्ससाठी हा नंबर, यासाठी हा नंबर, त्यासाठी तो नंबर. एक माझ्या लक्षात आले , काही लोक येवून मला विचारायचे की भाऊ , तुम्हांला सांगायचे की या गाडीवर दिलेल्या नंबरवर सांगायचं. मी म्हटल काय प्राब्लेम आहे तर म्हणाले टॅन्कर पाहिजे होता जी, मी म्हटले साहेबांना सांगा, त्या ठिकाणी एसएमएस करा. लोकांना जेव्हा अत्यंत निकडीची बाब आली तेव्हा त्या लोकांनी फोन लावले परंतु अधिका-यांनी फोन उचलले नाही. काही अधिका-यांनी तर सांगितले की माझा नंबर देवू नका. यांचे वक्तव्य आहे,'आय एम नॉट अ पब्लिक सर्व्हट' आमचे म्हणणे आहे की नगरसेवक हे पब्लिक सर्व्हट नसेल तरमा.महापौरजी, कोव्हीड-१९ मध्ये बुडापर्यंत जावून आम्ही काम केलेले आहे. युआर ए पब्लिक सर्व्हंट यु आर नॉट टू से आय एम नॉट ए पब्लिक सर्वंट, आपको अधिकार लो, आपकी जिम्मेदारी है की प्रशासन के अधिकारीयो ने सभी लोगो को साथ मे लेकर चलना चाहिये, आपकी अकेली की जिम्मेदारी नही है I जितने आप रिस्पॉन्सीबल है उतने हम भी रिस्पॉन्सीबल है I हमारी भी रिस्पॉन्सीबीलीटीज है I लेकिन इन तीन महिनो मे हमने कौनसे काम किये, यह बात हमने नही पुछनी चाहिये क्या ? मा.निगम

आयुक्त इन तीन महिनो मे महापौरजी से कोई चर्चा नही कर सके, फिर अधिकारी कैसे चर्चा करेगें। आमच्या भागामध्ये आमचा एरीआ कंटोनमेंट झोन जवाहरनगर, तो एरीआ २८ दिन बंद करण्यात आला. एरीआ प्रतिबंधीत करण्याकरीता काय नियम असतात की नाही. आम्ही कुठल्या अधिका-याला विचारले तर ते म्हणते साहेबांचे हे नियम आहे. आपण आम्हाला नियम अंतर्गत सांगीतले कि, २८ दिवस प्रतिबंध उठवु शकत नाही. जवाहरनगर मध्ये राहणारा प्रत्येक व्यक्ती करोडपती आहे काय? त्याठिकाणी राहणा-या लोकांना माहित होते काय ? की तीन महिन्याचे राशन बोलावून घेवू, तीन महिन्याचे हे सामान बोलावून घेवू. त्यांना तेल, राशन, धान्य इतर जे काही सामान असेल ते भरुन घेवू. नागरिकांना हे माहित नव्हते, तुमच्या टिमनी त्याठिकाणी सर्व्हे केला काय ? तुमचे लोक त्याठिकाणी गेले काय ? कारण कि, त्या भागामध्ये कोरोना पसरला होता, पेशंट एक गल्या १७ , द होल इंटायर्ड एरिया सील्ड बॉय गेट वन हा काय प्राब्लेम आहे कोण्या एका व्यक्तीकडे सुध्दा विचारणा करण्यांत आली नाही कि, बाबा तुझ्या घरी राशन आहे काय ? त्याला पेंशन काढायची असेल म्हातारा माणुस आहे त्या म्हाता-याला बाहेर जातांना दे दणके, अरे पण त्याचे घर कसे चालणार , त्यांच्या घरी जावुन आपण किट दिली काय ? कारण कि, नगरसेवकांना आंतमध्ये जाण्याची बंदी होती. कारण तुमच्या त्या चौकोटीतील नियम होता तो. तुम्ही काम करता त्या चौकोटीत काम करता तो नियमा अंतर्गत एखाद्या नगरसेवकांला किट द्यायवयाची असल्यास त्याला आंतमध्ये जाता येत नव्हते. पोलीसवाले आंतमध्ये येतांना हेच विचारायचे की तुम्ही कसे काय नगरसेवक आंतमध्ये येता, या पध्दतीने तुमची ट्रिटमेंट जर शिक्षित नगरसेवकांना मिळत असेल तर या सभागृहामध्ये असे अनेक नगरसेवक आहेत ज्यांना शिक्षण सुध्दा नाही. जर तुम्हीच जर असे वागत असाल तर ज्यांच्याकडून नोटशिटवर कार्पोरेशन असे लिहिले आहे. या अशा चेअरवरुन समाजाचे काही काम केले असेल तर तुमचे अभिनंदन आहे. ज्यांच्याकडे आयडियाज आहे, ज्यांच्याकडे काही करण्याची क्षमता आहे. माझे घर नव्हते कोरंटाईन मध्ये, मला करायला पाहिजे होते, आम्हांला म्हणायला पाहिजे होते. आम्ही आलो असतो. अरे कोरंटाईन एरिया करतांना नगरसेवकांनाच माहीत राहत नाही. त्या एरियातून दोन-दोन हजार लोक निघतात कोरंटाईन व्हायला आणि ते लोक तुमच्या विरोधात बंड पुकारायला. आम्ही तुम्हांला नियम विचारतो तर तुम्ही सांगत नाही. काल उदय नगरला एक पेंशंट निघाला, मला काहीच माहिती नाही. मला लोकांनी विचारला पेशंट पॉझिटीव्ह मिला है, कुछ प्राब्लेम है क्या, मैने बोला मुझे तो कुछ मालुम नही है। क्यु, तो किसी नही बताया तो कैसे मालुम होगा। त्याला कोरंटाईन केले आहे असे माहीत झाले आहे. माझे हे म्हणणे आहे की तुम्हांला जी जिम्मेदारी दिली आहे, आमचा काही आक्षेप आहे का, तुमची काही दुश्मनी आहे काय? अनेक लोकांच्या अनेक समस्या आहेत. गडरलाईन नाही होत आहे, गडरचे काम पडलेले आहेत. दोन-दोन वर्षापासून रस्त्याचे काम पडलेले आहेत. माझे तर सर्व टेंडर तसेच आहेत. टेंडर झाल्यानंतर वर्कआार्डर झाल्यानंतर आतापर्यंत काम सुरु झालेले नाही. लोक तुम्हाला नाही म्हणणार हो तुम्ही प्रत्येकाच्या घरी नंबर एसएमएस करुन टाका, पुर्ण नागपूर शहराचे नंबर दया. मा.तुकारामजी साहेबांचा हा नंबर आहे. याला कॉन्ट्रक करा. तुम्हांला कोणी विचारणार नाही,आम्हांला विचारणार. आम्हांला त्या घरात राहायचे आहे. आम्ही सोडून जावू शकत नाही. ठीक आहे, नगरसेवक राहिलो नाही राहिलो. परंतु दररोज एक नवीन प्रश्न आम्हांला विचारतात त्याचे उत्तर कोण देणार. ते आम्हाला ओळखत नाही, ते मा.महापौरजी यांना ओळखत नाही हे काही योग्य नाही. नागपूर महानगरपालिका ही एक यंत्रणा आहे की सर्व मिळून चालविली पाहिजे. या नागपूर महानगरपालिकेमध्ये प्रत्येकांची एक जिम्मेदारी आहे. प्रत्येक माणुस जिम्मेदार आहे म्हणून येथे आहे. लोकांनी निवडून पाठविले आहेत ते मुर्ख नाहीत आहेत. त्यांची स्वत:ची एक जिम्मेदारी आहे. त्यांनी तुमच्याशी आाणि तुम्ही त्यांच्याशी

ताळमेळ ठेवून काम केले पाहिजे. मा. नितीन साठवणे यांनी जो स्थगण प्रस्ताव दिलेला आहे त्यांच्यावर झालेली कार्यवाही ताबडतोब रद्द करण्यात यावी. आपल्या लोकांसाठी लढणार आहे अशा नगरसेवकाला सोडून दिले पाहिजे. आम्हांला या गोष्टीचा खंत आहे की कोव्हीड-१९ बाबतीत तुम्ही जे काम केले असेल ते चांगले आहे पण मा.महापौरजी यांच्या आदेशानुसारही काही काम व्हायला पाहिजे. एवढी मोठी सत्ता चालवित आहे आणि त्यांना काहीच माहीत नाही. त्यांनाच माहीत नाही तर आम्हांला कोण विचारणार यु आर ऑन्सररेबल फॉर दॅट, पण तुम्ही कोणालाच उत्तर देणार नाही. मा.महापौरजी, माझे एकच म्हणणे आहे. आम्हांला दोन-तीन प्रश्नाचे उत्तर पाहिजे आहे. What is the responsibility on Mayor in Nagpur city & What is responsibility on Chairman in Nagpur City & how are you going to coordinate both of each other, This is my question ? I want answer for that chair, Is that Clear, Ok, Thanks. धन्यवाद.

श्रीमती हर्षला साबळे:-मा.महापौरजी, मा.सदन, सदनातील सर्व अधिकारी वर्ग, सदनातील सर्व नगरसेवक, नगरसेविका आणि पत्रकारबंधू. मा.महापौरजी, अत्यंत गहन विषयावर चर्चा होत आहे. मा.महापौरजी आपण चांगले काम करीत आहे हे तेवढेच सत्य आहे. परंतु अशा काही अडचणी आहेत ते वार्डातील लोकच जाणू शकतात. कोव्हीड-१९ बद्दल अनेक लोकांच्या समस्या आहेत. खरोखरच माझे मोठे बंधू नितीनजी साठवणे यांनी अत्यंत खुप सुंदर काम केले आहे ते एक योध्दा आहेत. ज्याप्रमाणे सीमेवर आपला सैनिक लढत असतो त्याप्रमाणे त्यांनी आपल्या प्रभागाचे नेतृत्व केले आहे. अशा लोकांचा सन्मान झालाच पाहिजे. त्यांचे कौतुक झालेच पाहिजे. आम्ही सुध्दा काही समस्या मांडलेल्या आहेत. आज तीन महिने झाले, सभागृह झालेले नाही. अनेक वार्डामध्ये अडचणी आहेत. आमच्या अडचणी कोण आम्ही कुणाला सांगणार आहे. हा आमचा मोठा प्रश्न आहे. ज्या काही अडचणी आहेत त्या जनतेच्या अडचणी असतात. ते अधिका-यापर्यंत जावू शकत नाही. ते अत्यंत गरीब वर्गातील असतात. त्यांनी काही काही गोष्टी समजत नाही ते आपल्या समस्या मांडण्यासाठी नगरसेवकाकडे धाव घेतात. त्यांचा अधिकार तेवढा नसतो की ते अधिका-यांपर्यंत जावू शकतील. वार्डातील अडचणीबाबत कुणाला माहीत असेल तर या सभागृहातील प्रत्येक जण निवडून आलेला आहे. मी दुस-यांदा निवडून आलेली आहे. माझे पती सुध्दा दोनदा निवडून आलेले आहेत. ज्या काही अडचणी आहेत त्याचे निराकरण आपल्याला करावयाचे आहे. तुम्हांला कोणताही विरोध नाही परंतु तुम्ही आमच्याशी संपर्क साधून आमच्या समस्या तर ऐकुन घ्याव्या. तुमच्याशी आमची भेट होवू शकत नाही. तुमच्याशी आम्ही बोलू शकत नाही. हा समन्वय साधला गेला पाहिजे. कारण प्रत्येक नगरसेवक हा दाट वस्तीच्या एरियामध्ये राहतो. सगळे सिव्हील एरियातील लोक नाहीत, आम्ही दाट वस्तीत राहतात. जवळ जवळ लागून घर आहेत. आमच्या मनामध्ये सुध्दा भितीचे वातावरण निर्माण झाले हाते. आमच्या बाजूला लगतच कॉटन मार्केट आहे. माझे पती सुध्दा दंडा घेवून एका माणसाचे काम केले आहे. सर्व अधिकारी होते तेथे त्यांनी सुध्दा ट्रक रोखले, परिस्थिती हाताळली. आमच्या घरापर्यंत लोक येत होते. लोकांना हात जोडून जोडून त्यांना आम्ही सांगत होतो. नगरसेवकांशी समन्वय साधून तुम्हांला काम करावयाचे आहे. नगरसेवकांची छोटी छोटी कामे आहेत ती त्यांनी कुणाला सांगायची. प्रत्येक नगरसेवकांच्या समोर सगळयात मोठा प्रश्न आहे या सभागृहातील प्रत्येक नगरसेवकाला निवडून यायचे आहे आणि लोकांसमोर सुध्दा जावयाचे आहे. आमचे प्रश्न आपण ऐकुन घ्यावे, आम्हांलाही थोडा वेळ दयावा. मा.महापौरजी, मी आपल्या मार्फत मा.आयुक्तांना विनंती करते की त्यांनी आमच्या समस्या जाणून घ्यावा. आम्हांला सुध्दा वेळ दयावा. याातुन समन्वय साधून हे सभागृह चालवावे तरच सर्वांना न्याय मिळेल. मला दोन शब्द बोलू दिले

त्याबद्दल धन्यवाद.

श्रीमती उज्वला बनकर:- मा.महापौरजी, मा.सदन, आदरणीय अधिकारी वर्ग, पत्रकार बंधू. ज्यांनी या कोव्हीडच्या तीन महिन्याच्या काळामध्ये सेवा दिली. सगळे आमचे कर्मचारी वर्ग यांनी स्वच्छता सांभाळली, कच-याचे नियोजन केले, हे नागपूर शहर स्वच्छ आणि चांगले ठेवण्याचे काम केले. जेव्हा भीतीचे वातावरण या नागपूर शहरात होते त्यावेळेस जे क्लॉस फोरचे कर्मचारी आहेत त्यांच्यावर या शहराची जबाबदारी होती. अधिकारी वर्ग काय नुसता फोनवर बोलतो, हे करुन घ्या, ते करुन घ्या. पण आपला जीव धोक्यात टाकून जे चतुर्थ श्रेणीचे कर्मचारी काम करतात. मग ते कोरंटाईन सेंटरवर लोकांना जेवन पोहचविण्याचे काम असो, एरियातील साफसफाई असो, नागपूर शहरातील स्वच्छता असो, ही फार मोठी समस्या या नागपूर शहरामध्ये आहे. गडरलाईन साफ करण्याचे काम असो, चोकेजेचे काम असो, छोटया मोठया नाल्या साफ करण्याचे काम असो या चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांवर या सर्व कामांचा भार आला होता. अधिकारी काय आपल्या खुर्चीवर बसले असतील तर ही नागपूर शहराची जबाबदारी या गोरगोरब या चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांवर आली होती आणि ज्यांनी ही जबाबदारी चांगल्या पध्दतीने निभावली यासाठी मी त्यांचे खुप अभिनंदन करतो. मा.महापौरजी, आज येथे आमचे कमिश्नर यांनी सुध्दा नागपूर शहराची जबाबदारी स्विकारली आणि अत्यंत शिस्तबध्द पध्दतीने करण्याचा त्यांनी त्यांच्या परीने या नागपूर शहराचे व्यवस्था सांभाळली. त्यांच्यावरती या नागपूर शहराची जबाबदारी होती आणि त्यांचा सुध्दा मानस हाच होती की या नागपूर शहरात रोगराई फैलू नये. हा रोग जेव्हा आपणच म्हणतो की एका पासून दुस-याला लागणारा हा साथीचा रोग आहे. हा एवढा मोठा साथीचा रोग हा आला कुठून, हा तर विदेशातूनच आला आहे ना. आपल्या नागपूर शहरात होता काय ? जे लोक विदेशातून विमानाने आले त्यांच्या सोबत हा रोग इतक्या लांबून आपल्या देशात आला आणि तो सर्वत्र फैलावून नागपूर शहरात आला. हा इतका फैलावणारा रोग आहे म्हणूनच आपल्या आयुक्त महोदयांनी जे काही कोरंटाईन एरिया केले आहे. हा साथीचा रोग फैलावू नये ही त्याच्या पाठीमागची भुमिका आहे. हे व्हायला सुध्दा पाहिजे, आणि हे करीत असतांना त्यांनी त्यांची जबाबदारी ही खरोखरच एक चांगल्या पध्दतीने निभावली यात काही शंका नाही. परंतु हे निभावत असतांना आम्ही सुध्दा लोकप्रतिनिधी म्हणून निवडून येतो. जेव्हा हे लोकांना माहीत नसेल ही जबाबदारी मा.आयुक्तवर आहे की अधिका-यावर आहे. जेव्हा लोक आम्हांला निवडून देतात त्यावेळेस त्यांना एवढेच माहीत असते की या भागातील या माणसाला, या बाईला आम्ही निवडून दिले आहे आणि त्यांना आम्ही जे काम सांगू ते त्यांनी आमचे काम करुन दिले पाहिजे. अशा परिस्थितीत लोकांचे लोंढे चे लोंढे नगरसेवकांच्या घरावर येत असतात आणि त्यांना समजवण्याचे काम नगरसेवकाला करावे लागते. कोव्हीड-१९ चे रुग्ण ज्या भागात सापडले त्या भागातील लोकांना कोरंटाईन करण्यात आले. ज्या लोकांना होते त्या लोकांना केले आणि ज्या लोकांना नव्हते त्यांना सुध्दा केले. अशा परिस्थितीत समन्वय नव्हता. एक गल्लीमध्ये जर पेशंट निघाला तर पुर्ण एरियातील लोकांना कोरंटाईन करावे लागले. मा.कमिश्नर साहेबांचा हेतू वाईट नव्हता, त्यांचा एकच हेतू होता की लोकांना सुरक्षित ठेवणे. त्यांच्यावर लोकांना सुरक्षित ठेवण्याचे काम होते तर लोकांना न्याय देण्याचे काम लोकप्रतिनिधींवर होते. लोक आयुक्तांकडे जावू शकत नाही तर ते लोक नगरसेवकांकडे जातात. तुम्ही केले ते योग्य होते परंतु लोकप्रतिनिधी सुध्दा जे करतात ते योग्य असते सर, गोरगरीब लोकांनी कुठे जाणार सर. ते लोकप्रतिनिधी जे त्यांच्या गावातील असतात ते त्यांच्याकडेच जाणार ना. त्यांना कुठे माहीत असते की कमिश्नर साहेब कोण आहेत. ते आम्हांला माहीत आहे. आम्ही तक्रार करतो तर फोन लागत नाही. बाकीचे अधिकारी ऐकत नाही. जे रस्ते सील केले, जे एरिया सील केले त्यामध्ये लोकांना काय समस्या आहेत ते लोकप्रतिनिधींना सांगितल्या

असत्या तर सोडविता आल्या असत्या परंतु तुम्ही त्या कडे दुर्लक्ष केले. ज्याच्यामुळे लोकांच्या समस्या वाढल्या. समस्या सोडविल्या गेल्या असत्या तर इतक्या वाढल्या नसत्या आणि आमचे नितीन साठवणे यांच्यावर एफआयआर दाखल करण्याची वेळ आली नसती. तेथे छोटे छोटे मुले होते त्यांच्यासाठी दुध नव्हते. जेवण नव्हते,अन्नधान्य लोकांच्या घरी नव्हते, त्यांची बायको स्वत: प्रेगनेंट होती त्यांच्यावर अशी वेळ ओढावली होती. तिला दवाखान्यात जाण्यासाठी मनाई करण्यात आली. तिला रस्ता करुन देण्यात आला नाही. एक नगरसेवक असूनही त्यांच्यावर अशी परिस्थिती ओढावली. ही परिस्थिती नागपूर शहरातील सर्व नागरिकांवरच ओढावली होती. अशा परिस्थिती आपण मार्ग काढायला पाहिजे होता परंतु आपण एका टोकाची भुमिका घेतली. त्यामुळे सगळया नागपूर शहरातील नागरिकांना जो त्रास झाला. आपण कोरंटाईन जे केले ते वनामती, आमदारनिवास येथे एकाच ठिकाणी हजारो लोक कोरंटाईन केले परंतु त्यांच्यासाठी तितकी बाथरुम, टॉयलेटची व्यवस्था होती काय ? जेव्हा आपण म्हणतो की हा लागणारा रोग आहे म्हणून लोकांना कोरंटाईन केले तर नाही तर आपण केले नसते. हा एक संसर्गजन्य रोग आहे आणि तो एका माणसापासून दुस-या माणसापर्यंत पसरतो तर मग ज्या ठिकाणी लोकांना कोरंटाईन केले त्या ठिकाणी किती टॉयलेट, बाथरुम होते आणि आपण किती लोकांना त्या ठिकाणी ठेवले. ती व्यवस्था आपण केली काय? जर व्यवस्था नव्हती तर आपण त्या ठिकाणी कोरंटाईन कां करुन ठेवले. आणि या माध्यमातून रोगाची साथ पसरली. त्याच कोंरटाईन सेंटरमधून जास्तीत जास्त पॉझिटीव्ह पेशंट निघाले, कुठल्याही एरियामधून पॉझिटीव्ह पेशंट निघाले नाही. कोरंटाईन करुन ठेवलेले लोक आहेत तेथूनच मोठया प्रमाणात पॉझिटीव्ह पेशंट निघत आहेत. तेथुनच साथीचा रोग पसरला असे म्हणण्यास हरकत नाही. मा.महापौरजी, आम्ही विनंती करतो साहेब, लोकप्रतिनिधी हा लोकांनी निवडून दिलेला असतो. लोकप्रतिनिधींवर लोकांचा विश्वास असतो. लोक त्यांच्या घरापर्यंत जातात त्यांच्या समस्या सोडविण्याचा आम्ही प्रयत्न करतो. प्रशासनाने आमच्या समस्या सोडवाव्यात एवढीच इच्छा आमची असते. परंतु समन्वय साधल्या जात नाही, आमच्या समस्या सोडविल्या जात नाही, म्हणून आम्हांला तुमच्या पर्यंत येण्याचा मार्ग शोधावा लागतो. लोकप्रतिनिधी आणि प्रशासान या दोन्ही मध्ये दुआ साधण्यापेक्षा या दोन्हीमध्ये तफावत आली आहे. म्हणून हा रोष निघतो आहे. शहराच्या भवितव्याचे काम आणि जनतेचे काम तुम्हीही करता आणि आम्हीही करतो. आपण जसे लोकांसाठी काम करता तसेच लोकप्रतिनिधी आपल्या साठी काम करीत नसतात ते जनतेसाठी काम करीत असतात. नागपूर शहर चांगले व्हावे हा तुमचा जसा मानस आहे तसाच मानस आमचा सुध्दा आहे. सर्वांनी समन्वय साधून काम केले पाहिजे. नागपूर शहराची परिस्थिती नक्कीच चांगली होईल असे म्हणावयास काही हरकत नाही. आता पावसाळयाच्या या काळामध्ये नागपूर शहरातील सगळे चेंबर तुटलेले आहेत, गडरलाईन तुटलेल्या आहेत. चेंबरवरती झाकणे नाहीत. चेंबर भरुन वाहते आहे. तेथे जर लोक पडले तर ही कुणाची जबाबदारी आहे. ही समस्या सुध्दा आहे. मा.आयुक्त साहेबांनी त्वरित हया ज्या काही अति तातडीच्या समस्या आहेत त्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करावा. गडरलाईन, चेंबर, खड्डे पडलेले आहेत, पाणी साचून वाहत आहे अशा समस्यांकडे मा.आयुक्त यांनी जातीने लक्ष दयावे. जी आवश्यक कामे आहेत ती कामे करावीत. मा.महापौरजी, माझ्या प्रभागात अनंत नगर येथे नाला येतो, एकीकडे सिमेंट रस्ता जातो, मध्ये सगळे पाणी शिरुन वस्तीमध्ये जाते. सिमेंट रस्त्याचे कामाचे वर्कआर्डर झाल्यानंतर ते काम थांबलेले आहे. तेथे नाला असल्यामुळे आणि मध्ये उंच झाल्यामुळे इकडून पाणी आणि तिकडून येणारे पाणी वस्तीमध्ये येते. स्व:त डेप्युटी कमिशनर यांनी ती फाईल तयार केली होती आणि त्यानंतरच प्रोव्हीजन दिले आणि त्यांच्यानंतर वर्कआर्डर झालेले आहे. मी आयुक्त साहेबांना अशी विनंती करेल की ते काम मार्गी लावण्यात यावे. समोर

आम्हांला विश्वासात घेवून कामे करावे जेणेकरुन आम्हांला माहिती राहील. नगरसेवक नितीन साठवणे यांच्यावर एफआयआर दाखल केला तो मागे घेण्यात यावा अशी आपल्या माध्यमातून विनंती करते. मा.महापौरजी, मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानते. धन्यवाद, जयभीम.

श्री.परसराम मानवटकर:- मा.महापौरजी, मा.सदन. माझ्या परिसरात पॉझिटीव्ह पेशंट निघाला म्हणून चुकीची बातमी आली आणि माझ्याकडे लोक आलेत आणि असा प्रसंग निर्माण झाला. त्यामुळे अशी चुकीची बातमी देवू नये. मा.महापौरजी, माझा स्लम एरिया असून त्या ठिकाणी स्लम वस्ती आहेत. त्या ठिकाणी झोपडपट्टया आहेत. तेथे जाण्या येण्याची सोय नाही. त्या दिवशी पावसामुळे खुप पाणी साचले. मागच्या वेळेस सहा.आयुक्त आणि भुतकर साहेब आले आणि त्यांनी त्या ठिकाणी पाहणी केली. मी नेहमी फॉलोअप घेत असतो. आमचे कामे होत नाही अधिका-यांना विचारणा केली तर ते म्हणतात की आमच्याकडे पैसा नाही तर काम कसे करणार. नेहमी नेहमी असे सांगणे बरोबर नाही. लोक आमच्या घरावर येवून शिव्या देत असतात. आम्ही काय करायचे. कमीत कमी ते खड्डे बुजवून दिले पाहिजे, मुरुम टाकून दिला पाहिजे. मा.महापौरजी, ही बाब आपण प्रशासनाच्या लक्षात आणून दिली पाहिजे. नितीनजी साठवणे यांच्यावर जे आरोप लावण्यात आले आहेत ते चुकीचे आहेत ते नेहमी लोकांची कामे करीत फिरत असतात. त्यांच्यावर जो एफआयआर दाखल केला तो मागे घेण्यात यावा. धन्यवाद.

श्रीमती स्नेहा निकोसे:- मा.महापौरजी, मा.सदस्य, श्री नितीनजी साठवणे पर प्रशासन की ओर से जो केस दर्ज की गयी है वह वापस ली जाये, और दुसरी बात मैं आपके माध्यम से आयुक्तजी से कहना चाहुंगी कि, आयुक्त जो काम कर रहे है, उस काम मे अगर वह मा.सदस्यो को विश्वास मे लेंगे तो शहर का विकास तेजी से होंगा, अभी बरसात शुरु होनेवाली है, बहोत सारी सिव्हर लाईन तुंटी है, गडर के पाईप लाईन के, पावसाळी नाली के, चेंबर्स के काम तुरंत होने चाहिये, बस इतना ही कहते हुऐ मैं अपने शब्दो को विराम देती हुँ ।

श्री.सुनिल हिरणवार:- मा.महापौरजी, कोविड-१९ के बाद मे नागपूर शहर मे आयुक्त व्दारा किये गये कामो की सराहना हो रही है, उन्होने अच्छे काम किये है तो उसकी सराहना होनी चाहिये । मा.महापौरजी, मा.सदस्य, श्री नितीनजी साठवणे उनके ऊपर हो गुनाह दर्ज किया गया है, वह वापस होना चाहिये, उनके समर्थन मे मैं खडा हुँ । मा.महापौरजी, मैंने मा.आयुक्त को निवेदन देने के लिये वारंवार प्रयत्न किये, उनके पी.ए. से इस बारे मे कहां, लैकिन साहब फोन भी नही उठाते और टाईम भी नही देते, एक तातडी का विषय था उस संदर्भ मे मुझे आयुक्त से मिलना था तो मैंने उनके पी.ए. को कहा कि, आप साहब को बताईये मुझे उनसे मिलना है, आप उनको बताईये, तो पी.ए.ने साहब को जाकर बताया और मैं उनसे मिला, मैंने आयुक्त को बताया कि, नाले की दिवाल पिछले ६ महिने पहले से गिरी हुई है, वह नाले की दिवाल बनाना अति महत्वपुर्ण विषय है, वह गंभीर विषय है, उस गंभीर विषय के संदर्भ मे पिछले छे महिनो से हम झोन मे पत्र दे रहे है, लेकिन झोन के सहा.आयुक्त के तरफ से हमको कोई सहयोग नही मिला। उस दिवाल के विषय मे मैंने निगम आयुक्त साहब को भी पत्र दिया है, लेकिन कोई काम नही हुऐ। मैंने अलग अलग ये विषयो पर निगम आयुक्त साहब को पत्र दिये है। मा.महापौरजी, मेरे घर के बगल मे वनामाती कार्यालय है, वहां पर लोगो को कोरंटाईन किया गया था, वनामाती के बगल मे पत्रकार कॉलनी, धरमपेठ मेरा खुद का निवासस्थान, राजीव गांधी झोपडपटटी ऐसे टोटल २० हजार लोग रहते है, हमारे सहयोगी सदस्य, श्री संजीयजी बंगाले और मैंने इस कोरंटाईन सेंटर के विरोध मे निगम आयुक्त साहब को एक पत्र दिया था, लेकिन उसपर कोई ध्यान नही दिया

गया, और दो तीन गंभीर विषयो को लेकर के हमने पत्र दिये थे, उसपर भी कोई कारवाई नही की गयी I मेरी महापौरजी आपसे और प्रशासन से निवेदन है कि, जिन गंभीर विषयो को लेकर के मा.सदस्य, अपने अपने विषय रख रहे है, उसपर कारवाई होनी चाहिये, जनप्रतिनिधी जो है, वह लोकतंत्र का आधार है, जनप्रतिनिधी चोर नही है, जनप्रतिनिधी को जनता ने चुनकर दिया है, जनता के बिच मे उनका अपमान मत किजीये I मा.महापौरजी, मा.आयुक्त, आयएएस है, उनका नागपूर शहर मे स्वागत है, मा.आयुक्त ने शहर मे अच्छा काम किया है, मैं उन्हे शुभकामना देता हुॅं I नागपूर शहर मे मा.श्री. नितीनजी गडकरी, मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस और मा.श्री चंद्रशेखरजी बावनकुळे इन्होने विकास के काम किये है, नागपूर शहर मे नागपूर जिल्हे के भारतीय जनता पार्टी के ११ आमदारो ने नागपूर शहर को एक शानदार शहर बनाने के लिये सराहनीय काम किये है I मा.आयुक्त महोदय ने भी नगरसेवको को साथ मे लेकर के नागपूर शहर का गौरव बढाने मे हातभार लगवाना चाहिये, नगरसेवको को समय दिजीये, उनके क्षेत्र मे विकास के काम करने बहोत जरुरी है, मैंने पिछली बार छे पत्र दिये लेकिन किसी भी पत्र पर कारवाई नही हुई, हमे नागरिको के फोन आते है, लोग हमसे सवाल करते है, मेरे प्रभाग मे धरमपेठ, शंकरनगर और बर्डी क्षेत्र है, जिन क्षेत्रो से नागपूर महानगरपालिका को बडे प्रमाण मे उत्पन्न प्राप्त होता है, लेकिन विकास कामो के संदर्भ मे हम जनवरी से लेकर अभी तक परेशान है, हमको लोगो ने चुनकर दिया है, लोक हमसे जवाब चाहते है, मा.सदस्यो का जो वार्ड विकास का फंड है, प्रशासन ने उस फंड मे निधी उपलब्ध करवाना चाहिये, मा.सदस्यो के प्रभाग के रुके हुऐ काम तुरंत पुरे करने चाहिये, मा.सदस्य, श्री नितीनजी साठवणे पर जो गुनाह दाखल किया गया है, वह तुरंत विड्रा होना चाहिये, इतना कहते हुऐ मैं अपने दो शब्द समाप्त करता हुॅं I

श्री.मनोज गावंडे:-:- मा.महापौरजी, मा.सदन, मा.आयुक्त साहेब. या कोव्हीड-१९ मध्ये जो साडे तीन महिन्याचा पिरेड गेला. प्रत्येक नगरसेवक जो लोकप्रतिनिधी होता यांना लोकांचा सामना त्यांचा रोषाच्या रुपाने पाहायला मिळाला. सर मी आपणांस एकच विनंती करतो की लोकप्रतिनिधी हे आपणांसोबत काम करण्यास इच्छूक आहेत. आपण चांगले आणि धडाडीचे कार्य करीत आहेत याबद्दल मला शंका नाही. फक्त आपणांकडून एकच अपेक्षा आहे लोकप्रतिनिधींचाही त्यात सहभाग असायला पाहिजे. कारण ज्या प्रभागातून ते निवडून येतात तिथली जनता हे सर्वात आधी नगरसेवकांकडे जातात. त्यांची अपेक्षा असते की जी काही समस्या आम्ही लोकप्रतिनिधींना सांगितलेली आहे ती लवकरात लवकर हा नगरसेवक सोडवेल आणि त्या अपेक्षेने नगरसेवक हा तुमच्याकडे बघत असतो की त्यांना प्रशासनाकडून अपेक्षा असते तर आपण जे येथे काम करीत आहात. मी नागपूर शहराच्या जनतेच्या वतीने निवेदन करीत आहे लोकप्रतिनिधी हे आपल्या सोबत काम करण्यास तयार आहेत. कारण प्रत्येक ठिकाणी असे झाले आहे की लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाचे जमत नाही हे आम्ही समाचार आणि वृत्तपत्रातून ऐकलेले आहे नागपूरकर म्हणून आपणांस विनंती करतो की, आपणांस एक इच्छा जाहीर करतो की नागपूर मध्ये असे काही होणार नाही की जेथे आम्ही तुमच्या सोबत काम करण्यास तयार नाहीत. आम्ही एवढीच विनंती करीत आहे की तुम्ही जे काम करीत आहात, करीत राहा. फक्त काही अधिकारी असे होवू शकते की तुम्हांला चुकीची माहिती देत असतील की ज्याच्यामुळे तुमच्या आणि आमच्यामध्ये गैरसमज होत असतील. परंतु असे होणार नाही. ॲक्च्युअलमध्ये जे नगरसेवक आहेत त्यांच्यावर जर गुन्हा दाखल झालेला आहे त्वरित तो मागे घेण्यात यावा एवढीच आपणांस विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो. जयहिंद

श्री. प्रमोद चिखले:- मा.महापौरजी, सभागृहात उपस्थित माझे सहकारी बंधू. आज जो स्थगण प्रस्ताव माझ्या सहकारी मित्राने ठेवला आहे. त्याच्या समर्थनार्थ मी या ठिकाणी उपस्थित आहे. खरे तर स्थगण प्रस्ताव

हा नितीन साठवणे यांनी ठेवला. त्यांनी त्याच्यावर जो अन्याय झाला त्यावर स्थगण प्रस्ताव ठेवला. त्या स्थगण प्रस्तावर आज आम्हांला येथे बोलण्याची संधी मिळाली आहे. खरं तर एक गोष्ट या कोव्हीड-१९ मध्ये या तीन महिन्याच्या दरम्यान एक, दोन, तीन, चार लॉकडाऊन झाले. चार लॉकडाऊनमध्ये प्रत्येक नगरसेवक हा कोरोना योध्दा म्हणून आपआपल्या क्षेत्रात आपआपल्या परीने युध्द लढत होता. काही लोक आपल्या कामाची जाहिरात करीत होते. परंतु काही लोकांनी आपल्या कामाची जाहिरात करु नये अशा सुचना सुध्दा त्यांना होत्या. प्रत्येक नगरसेवकाने आपआपल्या परीने लढाई लढलेली आहे. मला एक प्रश्न या तीन महिन्यात , चार महिन्यात पाहायला मिळाला. कारण या सदनामध्ये मी पहिल्यांदा नगरसेवक म्हणून आलेला आहे. या काळात हे मा. आयुक्त झाले आहेत. याच्या आधी तीन आयुक्त साहेब मी बघितले आहेत. बांगर साहेब होते, मुदगल साहेब होते, त्याच्या आधी पार्डीकर साहेब होते, सोबत ठाकरे साहेब काही काळाकरिता होते. एक गोष्ट मला सातत्याने जाणवत होती ती मला येथे बोलाविशी वाटते की याच्या अगोदर जेवढे आयुक्त साहेब होते त्या आयुक्तांनी आपल्या कामाचे गौरव, गुणगान हे सोशल मिडीयामध्ये कधी केले नव्हते. मला या तीन महिन्याच्या कालावधीत असे वाटायला लागले होते की नागपूर शहरात लोकशाही पध्दतीने निवडून आलेली महानगरपालिकेतील सत्ता, विरोधात असलेले नगरसेवक, सत्तेत असलेले नगरसेवक हे काहीही कामाचे नाहीत. त्यांच्यावर कमेंट हे तर काही लोकांनी ठरवून टाकले होते, मला तर हरीश ग्वालबंशी यांचे एक वाक्य चांगले आठवते, त्यांनी एक वाक्य म्हटले होते की इंग्रजांचे सुध्दा फॉलोअर होते. इंग्रजांचे सुध्दा फॉलोअर होते तर इंग्रज खरोखर चांगले होते काय ? ही विचार करण्याची गरज आहे. जर त्यांचे वाक्य खरोखर जर लक्षात घेतले तर या गोष्टीचा आपल्याला अंत मिळेल. प्रत्येक नगरसेवक आपल्या परीने कार्य करीत होता. परंतु काही लोक कमेंट पास करीत होते. काही लोक सांगत होते की आपले मा.आयुक्तच इतके काम करीत आहे. बाकी नगरसेवक झोपा काढीत आहे. असे सोशल मिडीयामध्ये चालू होते. प्रत्येक नगरसेवक काम करीत होता ते त्यांला स्वत:लाच माहीत होते. नागरिक सांगू शकतात की नगरसेवक कामात होते किंवा नाही. असे किती तरी नगरसेवक आहेत जे डब्बे उचलून सॅनिटायझेशन पुर्ण वस्तीत करीत होते. किती तरी नगरसेवकांनी तीन-चार महिने आपले स्वत:चे पैसे लावून किचन चालविले. कीट वाटल्या, जेवण वाटले परंतु फेसबुकवर किंवा वॉटस अपवर कधी पाठविले नाही. परंतु दुर्दैवाने सांगावेसे वाटते की आपले मा.आयुक्तांनी एक प्रकारची सोशल मिडीया चालविली होती. मला लाईक करा, मला हे करा, मी चांगले करतो. योग्य करतो, अयोग्य करतो, केले नाही केले मला माहीत नाही परंतु सोशल मिडीयावर जे दिसत होते की मी जे काम करतो आहे त्याचे श्रेय मला मिळणार आहे किंवा नाही मिळणार आहे. म्हणजे नगरसेवक जे दिवसरात्र काम करतात त्यांच्या कामाचे श्रेय कुठे आहे आणि लोकशाही पध्दतीने निवडून आलेल्या या शासनाने या राज्यात ही महानगरपालिका ७५ हजार जनतेने आम्हांला निवडून दिले. ज्या जनतेचा आमच्यावर विश्वास आहे. जनतेशी आम्ही जुळून असतो, याचे साधे उदाहरण सांगतो जर नवरा बायकोचे भांडण झाले तरी बायका आम्हांला सांगत येते की साहेब माझ्या नव-याने आज मला मारले. एवढे आम्ही त्यांच्या घराशी कनेक्ट असतो . त्यांच्याशी आमचा संवाद असतो. घरात निंबू आला तर आम्हांला सांगतात. मग प्रशासनाला एवढे सुध्दा कळले नाही या नागपूर शहरात कोणती व्यवस्था निर्माण करावयाची आहे. जर आपण नगरसेवकांना विश्वासात घेतले असते तर बिघडले असते काय ? कुठे बिघडले असते आम्ही तर तुमच्या कामात मदत केली असती. या प्रशासनात बसलेले बाकीचे अधिकारी आहेत त्यांनी सांगावे, यांना आम्ही टॅक्स वसुलीपासून, जिथल्या कामात अडचण जाते त्या सर्व कामात मदत करतो. यांना आम्ही कधी रागवतो तर कधी खांदयावर हात ठेवून बोलतो, कामही करुन घेतो हे त्यांना माहीत आहे. एका

मोठया अधिका-याचा आदेश आल्यावर ते मोठे हतबल होतात. त्यांचे सरळ उत्तर होते की साहेब, मा.आयुक्तांचा आदेश आहे आम्ही काहीच करु शकत नाही. मा.आयुक्तांचे असे आदेश होते काय की नगरसेवकांचे कुठे ऐकायचे नाही. त्यांना विश्वासात घ्यायचे नाही, मी म्हणणे तो कायदा. मी म्हणेन गधं तर गधं, मी म्हणेन घोडं तर घोडं. असं राहतं काय ? याच्याकरिता आम्हांला लोकांनी निवडून दिले काय? आम्ही जनप्रतिनिधी आहोत, कुणीतरी सांगितले आम्ही ब्रीजचे काम करतो, प्रशासन आणि जनतेमधील आम्ही दुआ आहो. जेथे तुम्ही पोहचत नाही तेथे आम्ही तुम्हांला पोहचविण्याचा प्रयत्न करतो. तुमच्या अडीअडचणीत आम्ही तुम्हांला मदत करु शकतो. तुमच्या प्रशासनीक यंत्रणेत आम्ही मदत करु. जेथे जनता आहे त्या शेवटच्या टोकावर पोहचण्याचे कार्य आम्ही करु. तुम्ही आम्हांला विश्वासात तर घ्या, विश्वासात घेणार नाही, आम्ही म्हणू ती पुर्व दिशा असे चित्र जर तुम्हांला उभे करावयाचे असेल तर ही लोकशाहीची परंपरा नाही. भारतीय राज्यघटनेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या घटनेत आम्हांला तो अधिकार आहे. तो अधिकार दडपण्याचा आणि हाणण्याचा प्रयत्न आपण केला आहे. हे लोकशाहीच्या हिताचे नाही. सत्ता कॉग्रेसची असो, भारतीय जनता पार्टीची असो परंतु शेवटी न्याय हा प्रत्येकाला मिळाला पाहिजे. 'सत्ता आती है, जाती रहती है' एका अधिका-याकडे जबाबदारी आली तर आपण कोणत्या शासनाच्या अधिनस्त काम करतो हे चित्र उभे करण्यात आले. मी तर कधी चौकात उभा राहतो आणि बाकी लोक ते चर्चा करतात की आपले नवीन आयुक्त आले आहेत. ते आपल्या भाषेत बोलतात ते मी सांगत नाही. मी प्रशासकीय भाषेत सांगतो. ते ठरवून आले असतील की भाजपाच्या सत्तेला येथे बदनाम करण्यात यावे. किंवा येथे जे सत्ताधारी आहेत ते काहीच कामाचे नाहीत. मी येथे अधिकारी म्हणून आलो आहे मी एकटाच काम करीत आहे हे पुर्ण दाखविण्याचा येथे प्रयत्न होतो आहे आणि दररोज होत आहे असा प्रयत्न या वेळेस झाला आहे आणि हे लोकशाहीकरिता घातक आहे. कारण सत्ता आज भाजपची आहे उद्या कॉग्रेसची आली . अधिकारी हा विशिष्ट वेळाकरिता प्रशासनाच्या माध्यमातून आपल्या अनुभवाचा फायदा जनतेला सेवा देण्यासाठी करतो. त्याच्या मनात हा भेदभाव नसला पाहिजे. त्याने योग्य ते मार्गदर्शन व योग्य ती दिशा जनतेला दिली पाहिजे. कारण येथे जरी भाजपची सत्ता असली तर ती लोकशाही पध्दतीने निवडून आलेली सत्ता आहे. येथे मा.महापौरजी यांना विश्वासात घेवून, येथल्या यंत्रणेला विश्वासात घेवून, येथेल्या नगरसेवकांना विश्वासात घेवून आपण जर राज्य चालविले असते आणि अधिकार दाखविला असता आणि प्रशासन चालविले असते तर योग्य झाले असते. जनतेमध्ये चांगला संदेश गेला असता. आज काय जनतेत संदेश आहे की आयुक्तसाहेब चांगले काम करीत आहे आणि मा.महापौरजी यांचे ऐकत नाही. साधा उदाहरण आहे, मला हे कळत नाही आपण जो जनता दरबार लावला, एकीकडे मा.महापौरजी यांचे जनता दरबार सुरु होते, दुसरीकडे आपले जनता दरबार सुरु होते. मा.महापौरजी जनता दरबार लावून राहिले तर आपल्याला काय अडचण होती. ते जनतेचेच काम करुन राहीले. त्यांनी लावले म्हणून आपण लावले पाहिजे हा जो आपल्या मनात दुराभाव आहे. हा लोकांना संदेश बरोबर गेला नाही. एक चांगल्या पध्दतीने चालणारे सरकार, एका चांगल्या पध्दतीने चालणारे शासन आपण कुठेतरी येवून त्याला खंडीत केले. विकासाच्या कामाला खंडीत करुन ठेवलेले आहे. विकासाचे काम एकीकडे थांबलेले आहे. आज दुर्दशा अशी आहे की प्रभागात एक नाली बनविण्यासाठी आमचे नाक राहिले नाही. २ लाख सोडून दया, ५० हजार, २५ हजारामध्ये एक टाके बनवून देण्याची आमची लायकी राहिली नाही. रस्त्याने फिरायला गेला तर लोक म्हणतात ऐ मास्तर इकडे या, नाली फुटली आहे. मी म्हणतो हो ते बघावे लागेल तर ते म्हणतात की काही बघावे लागत नाही ते काही आम्हांला सांगू नका, तुम्ही नगरसेवक आहा ते काही सांगू नका. एवढया सरळ आणि स्पष्ट भाषेत ते

बोलतात. यावर आयुक्त साहेब तुम्ही गंभीरतेने विचार करा, शेवटी जनता जनार्दन आहे. जसा मी आज नगरसेवक आहे उद्या राहीलो नाही राहीलो परंतु जेवढा काळ मला जनतेची सेवा करायला मिळाला आहे. जनतेसमोर मी असलेल्या पदावर आपण योग्य न्याय देतो किंवा नाही देत याचा सुध्दा विचार केला पाहिजे. आपण येथे आलात सहा-सात महिने झाले असेल आणि पुढे काही काळपर्यंत आपण राहणार तोपर्यंत जनतेसमोर चांगला संदेश जाईल. येथल्या पुर्ण नगरसेवकांना आपण विश्वासात घ्या, जनतेच्या हितसाठी जे योग्य आहे ते आपण करावे एवढेच बोलून मी आपले दोन शब्द समाप्त करतो. धन्यवाद.

श्रीमती प्रणिता शहाणे:- मा. महापौरजी, मा.सदन, पत्रकारबंधू. खरच हा विषय खुप गंभीर आहे. मा. नितीनजी साठवणे यांनी आपल्या प्रभागातील अत्यंत दु:खद बातमी आपल्या समोर मांडली. त्या वातावरणात आणि त्या परिस्थितीत सगळयांनी आपआपली मते मांडली. मला असे वाटते ज्या प्रकारे नितीनजी साठवणे यांच्या पत्नीसोबत अशी घटना घडली तसेच जेष्ठ लोकांशी जे काही घडले ते घडू नये असे मला वाटते. सगळया नगरसेवकांनी आपआपल्या प्रभागातील समस्या सांगितल्या. त्या समस्या खरोखरच मा.आयुक्त साहेबांशी चर्चा करुन त्या गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे. नितीनजी साठवणे यांच्यावर जो गुन्हा दाखल केला आहे तो मागे घेण्यात यावा. मा.महापौरजी, मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद.

श्री लहुकुमार बेहते :- मा.महापौरजी, मा.सदस्य, श्री नितीनभाऊ साठवणे यांनी जो स्थगण प्रस्ताव दिलेला आहे, त्याबद्यल मी त्यांचे अभिनंदन करतो, आणि समर्थन करतो. मा.महापौरजी, ज्यावेळेस नवीन नवीन आयुक्त नागपूर महानगरपालिकेत आले होते, मा.श्री मुंढे साहेब त्यावेळेस दोन तीन दिवसानंतर सिव्हील ऑफिसला मी गेलो होतो, मी ज्यावेळेस विचारावयास गेलो कि, पोजिशन कशी काय आहे, खूप छान साहेब आलेले आहे, महानगरपालिकेमध्ये या पध्दतीचा वातावरण होते त्यावेळेस आणि आजची जी परिस्थिती आहे, ती अशी आहे कि, दुर से देखा तो मौसम हंसी था, ही परिस्थिती महानगरपालिकेसाठी चांगली नाही, आम्ही ज्यावेळेस नगरसेवक म्हणुन प्रभागात फिरतो त्यावेळेस आमचे वर्क आर्डर झालेले काम ते तर स्टॉपच आहे चार पांच महिन्यापासुन आम्हाला कोणतेही अधिकार आजच्या स्टेजला नाही. माझ्या म्हणण्याचे अर्थ असे आहे कि, ज्यावेळेस नागरिक आमच्याकडे येतात त्यावेळेस नागरिक आम्हाला सांगतात कि, आम्ही आयुक्त साहेबांना भेटु काय ? आणि आम्ही जर त्यांना बोललो कि होय तुम्ही आयुक्त साहेबांना भेटा तर अश्यावेळेस नगरसेवकांचा अर्थ काय ? आम्ही कोणते काम करायचे मा.महापौरजी, म्हणुन माझी विनंती आहे कि, प्रशासन आणि शासन एका नाण्याचे दोन बाजु आहे, जर आपण मिळुन मिसळुन काम नाही केले तर प्रशासन पण निगेटीव्ह मध्ये जातो आणि नगरसेवक पण निगेटिव्हमध्ये जातो. मला असे वाटते कि, ज्याठिकाणावरुन मा.आयुक्त महोदय नागपूर महानगरपालिकेमध्ये आले आहे, मला वाटते त्या ठिकाणावर त्यांचा जास्त प्रेम दिसतो. आणि नागपूर महानगरपालिकेवर कमी प्रेम दिसतो, मा.महापौरजी, तु प्यार है किसी और का तुझे चाहता कोई और है, असे जर असेल तर मा.महापौरजी, महानगरपालिकेमध्ये नगरसेवक ज्या कंडीशनमध्ये आता आहे, माझी आपल्या मार्फत मा.आयुक्तांना विनंती आहे कि, महानगरपालिकेमध्ये नगरसेवकांना सम्मान दिलाच पाहिजे. या आधी पण आयुक्त येवुन गेलेले आहे महानगरपालिकेमध्ये आम्ही आयुक्तांना भेटायचो, आमचे जे दु:ख राहत होते ते त्यांना सांगत होतो. आमच्या फाईलमध्ये काही अडचणी असल्या तर त्या आम्ही सांगायच्या आणि आम्ही राजीखुशीने कॅबिनच्या बाहेर जायचे पण आता आम्हाला असे काही झाले आहे कि, आम्ही त्यांच्याकडे गेलो तर ते आम्हाला टाईम नाही देत, ही चुकिची बाब आहे,

मा.महापौरजी, तीन महिने झाले लॉकडाउनच्या परिस्थितीमध्ये पाण्याचे बील आले मा.महापौरजी, आमच्याकडे नागरिकांचे फोन येतात, तीन महिन्यामध्ये माझे शेजारी आहे, त्यांना तीन महिन्याचा १२००० हजार रुपये बील आलेले आहे, ते पुण्यामध्ये होते, मा.महापौरजी, ज्यावेळेस आम्ही महानगरपालिकेमध्ये अधिका-यांकडे गेलो तर अधिका-यांनी सांगीतले कि, बील कमी करण्याचे आर्डर माझ्याकडे नाही. त्यांना रिडिंगनुसार बील आलेला आहे, माझ्या म्हणण्याचा अर्थ असा होता कि, नगरसेवकांसोबत जे नागरिक येतात त्यांचे समाधान होत नाही, नागरिकांच्या समाधानाकरिता आम्ही आयुक्तांकडे गेलो तर आयुक्त आम्हाला रिस्पांस देत नाही. मा.महापौरजी, मी आपल्या मार्फत आयुक्तांना विनंती करतो कि, नगरसेवकांना जो मानसम्मान मिळत होता, तो मिळाला पाहिजे. मला बोलण्याची संधी दिली, त्याबृद्यल धन्यवाद.

श्रीमती यशश्री नंदनवार :- सन्माननिय महापौरजी, सन्माननिय सदन, गेल्या ३ महिन्यापासुन सर्व जग आणि त्या जगाचा एक भाग म्हणुन नागपूर शहर सुध्दा आणिबाणीला समोर जात आहे आणि या आणीबाणीच्या संदर्भात आपण एका वैद्यकीय स्वरुपाच्या चर्चा येथे करीत आहे. परंतु या संदर्भात चर्चा सुरु करण्यापुर्वी मला एक महत्वाची गोष्ट आपल्या लक्षात आणुन दयायची आहे या सभागृहातील प्रत्येक सदस्य चर्चा करीत आहे. सर्व सदस्य आपले मत मांडत असतांना माईक देत आहे. एका सदस्यांकडुन तो माईक दुस-या सदस्यांकडे दिला जात आहे तो सॅनिटाईज केला जात आहे काय ? होत नसेल तर त्याची तातडीने व्यवस्था करण्यात यावी. मा.महापौरजी, मी राज्य शास्त्राची शिक्षीका आहे आणि नगरसेविका सुध्दा आहे आणि उच्च प्रशासकीय अधिकारी म्हणून काम केलेल्या व्यक्तीची मुलगी सुध्दा आहे. या गेल्या ३ महिन्याच्या काळामध्ये वैद्यकीय आणिबाणीला नागपूर शहर समोर जात असतांना या शहराची परिस्थिती अशी होती की आपल्या शहरात राजकीय आणीबाणी सुध्दा लागु झाली होती काय ? अशी स्थिती निर्माण झाली होती. नागपूर शहरात नागपूर महानगरपालिकेत नगरसेवक आणि महानगरपालिकेच्या ज्या विविध समित्या आणि मा.महापौर आपण सुध्दा अस्तित्वात आहात की नाही असा प्रश्न निर्माण झाला होता. या शहराचे सर्व कर्ता करविता आपले सन्माननिय आयुक्त मुंढेसाहब एकटेच आहे अशी परिस्थिती त्यांनी निर्माण केली होती. सगळया नगरसेवकांनी विषय मांडला की आम्हांला प्रतिसाद दिला जात नाही, आम्हांला माहिती सांगितली जात नाही. जेथे मा.महापौरांजी आपल्यालाच काही माहिती नाही तेथे आम्ही सर्व नगरसेवकांच्या प्रश्नाला गौन स्थान दिले जात होते.. कारण या शहराच्या आपण प्रथम नागरिक आहे. जेव्हा आपण या शहराचे जबाबदार नागरीक आहात म्हणुन शहरात होत असलेल्या सर्व घटनांची माहिती मा.महापौरांना दिल्या गेली पाहिजे परंतु आपण त्या बद्यल अनभिज्ञ असाल. आपल्याला कुठल्याही निर्णयाची माहिती दिली जात नसेल तर आपण सर्व अदृश्य आहोत, अस्तित्वातच नाही. असे सर्व नगरसेवकांनी मान्य करुन घ्यावे आणि आपला सर्व कर्ता करविता एकमात्र आयुक्त साहेब आहे यावर ठाम राहून आपण त्यांना शरण जावे अशी मी आपल्या सर्वांना विनंती करीत आहे. मा.महापौरजी पर्वा या सभागृहात फार मोठा ऐपीसोड घडुन आला मा.आयुक्त साहेब सभागृहातुन सभात्याग करुन गेले. ही अत्यंत दुदैवी घटना घडून गेली. त्यांच्या प्रतिष्ठेला बाधा पोहचली आहे असे काही विधान झालेले आहे नक्कीच. परंतु प्रशासकीय स्तरावरील सर्व अधिका-यांना प्रशासनातील सर्व दबाव आणि टिका हाताळायचे प्रशिक्षण दिल्या गेलेले असते. नेहमी या बाबतीत चर्चा ही होत असते. याबाबतीत मार्गदर्शनही होत असते. मा.आयुक्तांनी या सर्व बाबतीतील प्रशिक्षण घेतले आहे की नाही अशी शंका परवाच्या दिवशी निर्माण झाली. या संदर्भात मी माझ्या वडीलांशी चर्चा केली. अतिशय उच्च पदावर मंत्रालयात दिर्घकाळ प्रशासकीय अधिकारी होते. त्यांनी मला सांगितले अशा वेळी एखादी व्यक्ती तनावामध्ये गेल्या तीन महिन्यात नागपूर शहरात जो तनाव होता त्या

तनावातून जात असल्यामुळे कदाचित होवू शकते. परंतु तरी सुध्दा हा तनाव तत्कालीन असू शकतो. सभात्यागाचा जो काही त्यांचा निर्णय होता ज्या दबावातून घेतला. हा दबाव सुध्दा तत्कालीन असायला पाहिजे होता. त्यानंतर त्यांनी मा.महापौरजीच्या विनंतीला मान देऊन सभागृहात यायला पाहिजे होते कारण त्यांच्या प्रतिष्ठेला निश्चितच बाधा पोहचली असेल परंतु एखादया व्यक्तीच्या प्रतिष्ठेपेक्षा या शहराच्या सर्वोच्च सभागृहाची प्रतिष्ठा सर्वात जास्त महत्वाची आहे. त्या प्रतिष्ठेचे प्रतिक आपण आहात मा.महापौरजी, त्यामुळे आपल्या विनंतीला मान देऊन त्यांनी येथे येणे अत्यंत आवश्यक होते परंतु त्यांनी आपला मान ठेवलेला नाही. मी आपल्या माध्यमातून सांगु इच्छिते की मा.आयुक्त साहेबांना सांगू इच्छिते की मा.आयुक्त साहेब आपण चुकलात, निश्चितच चुकलात. आपल्यावर जे काही टिका झाली असेल किंवा आपला जो काही अपमान झाला असेल त्याच्यावर काय कार्यवाही करायची त्यावर जे काही प्रशासकीय नियम आहेत आणि एका तपापेक्षा जास्त काळ आपण प्रशासकीय पदावर आहात. ते नियम आपल्याला माहितच आहे आणि आपण बराच काळ स्थानिक प्रशासनासोबत आहात त्यामुळे अशा वेळेस कुठल्या नियमांचा आपण आधार घ्यायचा हे आपल्याला पुर्ण माहीत पाहिजे. त्या नियमाचा आधार घेऊन मा.महापौरांच्या मदतीने हे प्रकरण थांबवु शकला असता. परंतु आपण हे निश्चितच केलेले नाही. आणि त्याबद्दल आपण निश्चित दिलगिरी व्यक्त केली पाहिजे असे मला मनापासून वाटते. मा.महापौरजी ज्या वेळेस कोव्हीडचा प्रभाव सुरु झाला त्यावेळेस मी माझ्या काही व्यक्तिगत मर्यादेमुळे माझे वॉटस अप देखील आणि मोबाईल देखील बंद केले होत. मी क्वचिततच घराच्या बाहेर पडलेली नाही. माझ्या वैद्यकीय कारणामुळे मला समाजात मिसळायला मला डॉक्टरांनी मनाई केलेले आहे परंतु तरी सुध्दा जेव्हा मला संधी मिळाली मी समाजात मिसळली आहे. या प्रकरणांत पहिला झटका मला पडला २३ मार्चला. नुकताच कोव्हीडमुळे लॉकडाऊन घोषित झाले होते. त्या दिवशी २३ मार्चला माझ्या मिस्टरांना संध्याकाळी ३- ४ वाजता ताप चढला. संध्याकाळी ७ वाजता मानेवाडा ते नंदनवन या ठिकाणचे सर्व हॉस्पीटल आणि उपलब्ध असलेले सर्व डॉक्टरांचे दरवाजे ठोठवले परंतु त्यांना तपासण्याकरिता एकही डॉक्टर तयार नव्हता. माझी मुलगी स्व:त डॉक्टर होत आहे या वर्षी अंतिम वर्षाला आहे. माझे वडील ८५ वर्षाचे आहेत त्यांचीही तब्येत बरोबर नसल्यामुळे माझी मुलगी त्यावेळी तेथे होती. त्यांना काही सांगून प्रेशर वाढविण्यापेक्षा मी माझ्या मिस्टरांना घेवून रात्री ११ वाजेपर्यंत सर्व दवाखान्याचे दरवाजे ठोठावत होती. परंतु माझ्या मिस्टरांना तपासण्याकरिता एकही डॉक्टर तयार नव्हता. अशा परिस्थितीमध्ये ११ वाजेच्या सुमारास एक डॉक्टर भेटले त्यांच्याशी मी बोलले त्यांनी म्हटले तुम्ही दवाखान्यात या मी दवाखान्यात येतो. त्यांनी माझ्या मिस्टरालाच आपल्या नाडीचे ठोके तपासायला सांगितले. दूरुन पाहून त्यांनी माझ्या मिस्टरांचा घशा तपासला. गेल्या चार दिवसाची आमची दिनचर्या विचारली आणि सांगितले की निश्चितच तुम्हांला कोव्हीड नाही असे मला वाटते. मी लिहून देतो तेवढे औषधे आपण घ्या. आपण उद्या सकाळपर्यंत वाट पाहू. त्याच्यानंतर आपण पुढचे काय करायचे ते आपण पाहू. सुदैवाने सकाळी ४ वाजेपर्यंत माझ्या मिस्टरांचा ताप उतरला. मी सकाळी ६ वाजता डॉक्टरांना फोन केला ते म्हणाले, घाबरण्याचे कारण नाही परंतु पुढल्या ८-१० दिवस दोघेही नवरा बायको कोणत्याही लोकांमध्ये मिसळू नका. घरात स्वतंत्र रहा. मा.महापौरजी, या पहिल्या झटक्यानंतर मला शहरातील बाकी भागातील जेष्ठ व्यक्तिची जास्त काळजी वाटायला लागली. त्याच्यात एक दिवस माझ्या प्रभागातील एका कार्यकर्तांचा मला फोन आला की ताई आपल्या प्रभागातील जी शाळा आहे त्यामध्ये कोरंटाईन सेंटर तयार होत आहे. मला मोबाईलवर कुठलाही मॅसेज नव्हता. त्याबाबत मी आयुक्त साहेबांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. अर्धा तास सतत फोन करुनही फोन उचलला जात नव्हता. शेवटी मी आयुक्त साहेबांच्या फोनवर मॅसेज टाकला जी शाळा आपण

कॉरंटाईन सेंटर म्हणुन निवडलेली आहे ती शाळा अत्यंत दाट वस्तीमध्ये आहे. त्या शाळेच्या भिंतीपासून, खिडकीपासून ५-१० फुटावर लोकांची घरे आहेत आणि अशा ठिकाणी कुठल्याही व्यक्तीला त्या कॉरंटाईन सेंटरमध्ये ठेवणे योग्य नाही. मला त्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही. किंवा माझी शंका चुकीची होती असे सुध्दा उत्तर मिळालेले नाही. त्या संदर्भात जैन साहेबांकडे अनेक नागरिक गेले, त्यावेळी उपमहापौरजी, माजी महापौरजी दिपराज पार्डीकर हे सुध्दा त्या ठिकाणी उपस्थित राहीले होते. त्या लोकांना त्या ठिकाणी कळले की त्या ठिकाणी कॉरंटाईन सेंटर केले जात नाही. कोणत्याही बाधीत व्यक्तिला ठेवले जात नाही तर त्या ठिकाणी बेघर लोकांचा निवारा केंद्र उभारल्या जात आहे त्याकरिता लाईट, पाण्याची व्यवस्था हे बघण्यासाठी सरकारी कर्मचारी गेले होते. मा.महापौरजी, याबाबतीत अशी घटना होती तर त्या वेळेला नागरिकांनी प्रश्न उपस्थित केले त्यावेळेला उपस्थित नागरिकांना कां नाही उत्तर दिले गेले. तेथे बेघर लोकांना ठेवण्यात येणार होते तर त्या बेघर लोकांची टेस्ट करण्यात आली होती काय ? की करण्यात येणार आहे तर या प्रश्नाचे उत्तर हुमणे साहेबांकडे सुध्दा नव्हते. कारण त्यांना विचारले की त्यांचे एकच उत्तर होते की साहेबांच्या आदेशानुसार आम्ही सर्व करीत आहे. आम्ही साहेबांना प्रश्न विचारु शकत नाही. मा.महापौरजी, आपल्या त्यांच्या दृष्टीकोनातून अस्तित्वात नाही. आपल्या सहकारी अधिका-यांना ते प्रश्न विचारु देऊ शकत नाही. म्हणजे फक्त नागपूर शहरातील सर्व अधिकारी, कर्मचारी वर्ग आदेशानुसार अस्तीत्वात येतात. सर्व अधिकारी, कर्मचा-यांना नगरसेवकांना प्रश्न विचारण्याचा अधिकार नाही, शंका मांडण्याचा अधिकार नाही तर मा.महापौरजी ऐवढे सक्षम आयुक्त आपल्याला दिल्याबद्यल महाराष्ट्र शासनाचे आभार मानले पाहिजे. एवढा एकटा व्यक्ती सर्व करण्यासाठी सक्षम आहे. आपण सगळे त्यांच्या आदेशानुसार आहे. आजही या परिस्थितीमध्ये बदल झालेला नाही. ज्यावेळी अनेक नगरसेवकांनी समस्या मांडल्या त्यावेळी त्यावेळेला मलाही अनेक फोन येत होते. मी आपल्या परिने समाधान करण्याचा विविध पातळीवरील अधिका-याशी बोलून प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत होते. परंतु आदेशामध्ये इतकी अस्पष्टता होती की त्यांच्यामुळे अजुन नवे गोंधळ निर्माण होत होते. आपल्याकडे लॉकडाऊन लागू झाला होता, महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार आयुक्त साहेबांनी आदेश काढला की लॉकडाऊन आहे सर्व शाळा, कॉलेज व महाविद्यालय बंद आहे. त्याच वेळेस महाराष्ट्र शासनाचा दुसरा आदेश येवून थडकला होता की शाळांनी आपल्या रिझल्टचे कामे सुरु करावे. सर्व शिक्षक लोक, ज्या ऐरियामध्ये कॉटेंनमेंट झोन तयार केला होता त्या एरियातील शाळेमध्ये सुध्दा शिक्षक लोक उपस्थित होते. आणि रिझल्टचे कामे तयार करीत होते. जेथे एक बाळंतीणबाई बाळंपणासाठी दवाखान्यापर्यत् जाऊ शकत नव्हती, त्या एरियातील लोकांना अन्नधान्य पुरविता येत नव्हते. आपले सर्व नगरसेवक हतबल ठरत होते त्यासाठी ते प्रशासनाशी भांडत होते की नागरिकांना सुविधा उपलब्ध करुन दया त्याचवेळी त्याच एरियामध्ये शिक्षक लोक जावून रिझल्ट तयार करीत होते आणि त्या वेळी त्यांच्या उपस्थितीचे कुठलेही नोटींग घेतले जात नव्हते म्हणजे उद्या जर शिक्षकांना कोरोना झाला असता तर त्यांच्यासाठी जबाबदार कोण ? त्यांच्यामुळे त्यांच्या घरी कोरोना झाला असता तर शिक्षकांवर गुन्हा दाखल केला असता काय? की लॉकडाऊन असतांना आपण शाळेत गेला म्हणून. या दृष्टीकोणातुन आयुक्त महोदयांनी काय भुमिका घेतली. महानगरपालिकेच्या शाळा वगळता इतर शाळेमध्ये डेप्युटी डायरेक्टरचा आदेश आवश्यक असतो महाविद्यालयासाठी कुलगुरुंचा आदेश आवश्यक असतो. या दृष्टीकोनातून शिक्षण विभागांच्या इतर अधिका-यांशी आयुक्त महोदयांनी संपर्क साधला होता काय ? त्यांना योग्य ते निर्देश दिले काय ? याचेही उत्तर मला नकारात्मक मिळेल. मा.महापौरजी, आजही आपल्या कडे अशी परिस्थिती आहे जे स्लम आहेत, जे स्लम वस्तीत राहतात त्यांना रेशनचे धान्य मिळते किंवा त्यांना नगरसेवकांमार्फत,

एनजीओ मार्फत धान्याचा पुरवठा होते परंतु या शहरात राहणारे जे अनेक नागरिक प्रौढ अवस्थेत आहे. जे एकटे राहतात त्यांच्या पर्यत जेवण पोहचविण्याची व्यवस्था काय केली होती. जे ७० ते ८० वर्षाचे सिनिअर सिटीझन आहे त्यांच्याकडे लॉकडाऊनच्या काळामध्ये कामवाली बाई नव्हती. आयुक्त साहेबांनी सुरवातीच्या काळात काही हेल्पलाईन नंबर दिले होते. त्या हेल्पलाईनवरुन उत्तर येत होते की ही जबाबदारी आमची नाही. अशा वेळेस त्यांना धान्य पोहचविण्याची जबाबदारी कोणाची होती. मग अशा लोकांसाठी जेवण कोण बनविणार, भाजीपाला कोण आणुन देणार, दुध कोण पोहचविणार या प्रश्नाचे उत्तर काय? आजही आपण सांगतो की ६० वर्षाच्या वरच्या व्यक्तींनी घराच्या बाहेर निघु नये, पोलीसांना सुध्दा असे सांगण्यात आले कि, ५५ वर्षाच्यावर वय असलेल्या पोलीसांनी ऑफीस मध्ये डयुटी करा. त्या ७० ते ८० वर्षाच्या एकटया म्हाता-या माणसाने काय करायचे ? त्या व्यक्तीकडे पैसे देण्याची ताकद आहे परंतु परिस्थितीमुळे नाईलाजाने त्या व्यक्तीला बाजारात यावे लागत आहे. दोन अडीज महिने त्यांनी कसे काढले असतील. आपल्या परिस्थितीने त्यांना नगरसेवकांना किंवा एनजीओला अन्न मागण्याची लाज वाटत होती. अशा परिस्थितीत कसे दिवस काढले असतील. या सर्व गोष्टीसाठी अस्पष्ट आदेश, प्रशासनाचे ढिसाळ नियोजन आहे. अशा परिस्थीतीमध्ये आपले मा. आयुक्त पाठ थोपटुन कौतुक करुन घेत होते. तुम्ही ५००० बेडचे हॉस्पीटल दाखविले असेल परंतु अजुनही नागपूर शहरातल्या प्रत्येक मॅटरनिटी हॉस्पीटलमध्ये बाळंतणपणासाठी येणा-या महिलांसाठी सक्त सुचना आहे की तुमची कोव्हीडची चाचणी झाल्याशिवाय खाजगी दवाखान्यात येऊ नका, सरकारी दवाखान्यामध्ये मेडीकलमध्ये जा. या संदर्भात प्रशासन काय निर्णय घेणार आहे. बाळंतणपनाची तारीख डॉक्टरनी दिली असली तरी त्याच दिवशी डिलीव्हरी होत नाही. नगरसेवक श्री.साठवणे यांच्या संदर्भात सुध्दा असेच घडले पाहतो आहे. या अनेक गोष्टी घडलेल्या आहेत. या शहरात या परिस्थितीत अंगणवाडी सेविका आणि अशा वर्कर प्रशासनासोबत काम करीत होत्या या परिस्थितीत कुठल्याही सुविधा नागपूर महानगरपालिकेने त्यांना दिल्या नाही. स्वच्छता कर्मचारी डबल काम करीत होते त्यांच्या संदर्भात प्रशासनाने कुठला सकारात्मक निर्णय घेतला आहे. या सर्व बाबींची उत्तरे आपल्याला प्रशासनाकडून हवी आहेत आणि ज्या पध्दतीने मा.आयुक्त साहेब अपमानित झाले आणि भावनाविवश होऊन रागारागात सभागृहातुन निघुन गेले तसाच राग नितीन साठवणे यांना आला असु शकत नाही काय ? आयुक्त महोदयांच्या आदेशानुसार काम करण्यासाठी हजारोंच्यावर कर्मचारी आहे. साठवणे यांच्या जवळ कोण आहे. ७० हजारापेक्षा जास्त लोक रोज त्यांच्या दारावर येवून प्रश्न विचारीत असेल तर त्यांच्यावर दबाव येत असेल तर त्यांचा तोल जाणार नाही काय ? कदाचित त्यांच्या तोंडातुन एखादा जास्तीचा शब्द निघून गेला असेल, त्याच्यासाठी त्याच्यावर गुन्हा दाखल करणे, ही चुकीची बाब आहे म्हणुन या स्थगण प्रस्तावाला मी आपले समर्थन करतो आणि आपले दोन शब्द समाप्त करते.धन्यवाद.

श्री.प्रकाश भोयर :- मा.महापौरजी, नितीनजी साठवणे यांचा स्थगण प्रस्ताव त्याचबरोबर मंगलाताई गवरे यांच्या स्थगणप्रस्तावाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. येथे जे काही एपिसोड झाले त्यावर काही चर्चा झाली मला प्रश्न विचारायचे आहे आदरणिय आयुक्तांना महापौरजींना उद्येशुन विचारायचे आहे. आदरणिय आयुक्त साहेब आले त्यानंतर जनता दरबार घेण्याचे सुरु केले. ते बहुतेक ४ ते ५ या काळात जनता दरबार घेत होते. त्या जनता दरबारमध्ये अनेक लोकांची गर्दी होत होती आणि लोकांचे प्रश्न ते समजून घेत होते. परंतु समजून घेतल्यानंतर त्यांचे ते कामे करीत होते काय ? आयुक्तांनी सहजतेने हो किंवा नाही म्हणावे, मुंडी हलविली तरी चालेल,

महापौर :- (बेल) आपण प्रश्नोत्तरे नाही म्हटले होते.

श्री.प्रकाश भोयर :- मा.महापौरजी, आयुक्त महोदय काम करीत असतील हे मला मान्य आहे कारण लोक येतच होते आणि अनेक लोकांचे कामे होत होते. पण मा.महापौरजी, अनेक लोक डायरेक्ट त्यांच्याकडे आल्यावर हे त्यांचे कामे करतात, करीत असतील, आणि मा.महापौरजी मी एक साधा नगरसेवक आहे येथे १५६ नगरसेवक आहे त्या नगरसेवकांचे वर्कऑर्डर झालेले कामे सुध्दा आपण थांबविले आहे. मी माझ्या बाबतीत सांगतो तुम्हाला माझे गडर लाईनचे सोनेगावचे काम थांबविले आहे. पण हे काम थांबविले आहे या गोष्टी सांगण्याच्या मागे मी माझ्या पक्षाची भुमिका तुम्हाला सांगून देतो. मी दक्षिण पश्चिम नागपूरचा नगरसेवक आहे. माझ्या वरीष्ठांनी पहिले मला सांगितले अडीच वर्ष मी जेव्हा निवडुन आलो २०१७ ला तेव्हा अडीच वर्ष महाराष्ट्रात शिवसेना व भारतीय जनता पार्टीची सरकार होती. आणि देवेंद्रजी फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हे दक्षिण पश्चिम नागपूरचे असल्यामुळे मला बराच प्रमाणात फंड मिळत होता. आणि त्यामुळे मला माझे वरिष्ठ सहकारी दक्षिण पश्चिम नागपूरचे तसेच भारतीय जनता पक्षाचे जेष्ट पदाधिकारी जितके स्थायी समितीचे चेअरमन झाले त्या सर्वांकडे माझे चांगले संबंध असून कारण जितकेही लोक झाले त्या काळापासून मी सुध्दा भारतीय जनता पार्टीचे काम करीत आहे. त्यांच्याकडे मी पैसे मागायला गेलो तर दक्षिण पश्चिमचा नगरसेवक आहे म्हणुन मला एकही पैसा दिला नाही. पहिल्या वर्षी दिला नाही पण या करीता भारतीय जनता पक्षाची भावना या करीता चांगली होती की दक्षिण पश्चिम नागपूर मध्ये पैसे मिळतात आहे. मग मी पहिल्या वर्षी नाही मिळाले, दुस-या वर्षी नाही मिळालो मग मी तिस-या वर्षी म्हटले जेष्ठ नगरसेवकांना की माझे सर्व कामे झाले आहे. त्यामध्ये देवेंद्रजी झाले, नितीनजी झाले हे मोठे नेते आहे त्यांच्याचकडुन पैसा घेत राहु आणि मी माझी प्रॉपट्री केव्हा बघु, मी माझ्या स्वत:चे काही ना काही केले पाहिजे की नाही. की मी माझ्या नेत्यांकडुनच घेतले पाहिजे. महानगरपालिकेच्या माध्यमातून मला काहीना काही, स्थायी समितीच्या माध्यमातून मला काहीना काही मिळाले पाहिजे की नाही तर तिस-या वर्षी मला गडर लाईनकरीता १० लाख रुपये, आणि एक फ्लॅट स्कीम आहे तेथे कंपाऊंड वॉलच्या बाजुला डुकरांचा त्रास आहे तेथे कंपाउंड वॉल करीता १० लक्ष रुपये आणि १२ लक्ष रुपये सोनेगावचा एक रस्ता दक्षिण पश्चिम नागपूर मध्ये तेव्हा बरेच सिमेंटचे रस्ते झाले मी म्हटले देवेंद्रजींच्या फंडातून हे सर्व झालेच तर आपणही आपल्या माध्यमातून हा रस्ता सिमेंटचा करावा, तेव्हा मी प्रपोजल बनविले. मा.महापौरजी विषय असा आहे की हे का करावे कारण की पांडे लेआऊट हा वरचा भाग असल्यामुळे पुर्ण पाणी हे खाली उतरते आणि ते एका जागी जमा होऊन अनेक लोकांच्या घरी पाणी जाते. म्हणुन मला तो सिमेंट रस्ता फार आवश्यक होता. अधिका-यांच्या भेटी घेतल्या टी.एस. झाले सर्व झाले, पुर्ण सॅग्शन झाले, लेटर मिळाले, सर्व झाले दोनदा स्टॅन्डींग मध्ये गेले, माझे नशिब खराब होते आयुक्त साहेब जानेवारीमध्ये आले आणि थांबले. माझ्या चारही साईडला सर्व झालेले काम मला करता आले नाही. १० ते ११ लक्ष रुपयांचे छोटे छोटे कामे होते. जुन्या काळातील आई वडीलांच्या गोष्टी माहित आहे म्हणुन सांगतो काही पैसे आपल्याजवळ शिल्लक ठेवावे म्हणुन मा.महापौरजी मी दरवर्षी कमीत कमी ५ ते ६ लाख रुपये आपल्या वार्ड निधीचे वाचवुन ठेवत होतो जानेवारी महिन्यापर्यत नंतर दोन ते तीन जागी मला गडर लाईनचा प्रॉब्लेम झाला, साहेब आले आणि नंतर माझ्या वार्ड निधीचे पैसे होते त्या ५ ते ६ लाखांचे वर्कऑर्डर सुध्दा तुम्ही करु शकत नाही. दुसरे तर दिलेच नाही पण माझ्या वार्डनिधीचे पैसे दिले नाही. त्यानंतर ३० लाख रुपये फिक्स प्रायरिटी देतात त्या पैकी १० लक्ष रुपयांचे वर्कऑर्डर होऊन काम सुरु झाले आणि साहेब आले २० लक्ष रुपयांचे काम थांबले पुन्हा माझे नशिब खराब झालं, मा.महापौरजी येथे बसलेले सर्व नगरसेवक या भागात जेव्हा कोणतेही काम करीत असतील तर भारतीय जनता पर्टीचे म्हणत नाही तर सर्वच पार्टीचे

नगरसेवक जेव्हा कोणतेही काम करतात तेव्हा ते लोकांना सांगतात की येणा-या २ ते ३ महिण्यात मी तुमचे काम करीत आहे. सर्व झाल्यावर मा.आयुक्त सांगतात पैसे नाही आणि तुमचे काम होणार नाही. ते मान्य केले मा.महापौरजी मी, मी अजुन सांगतो तुम्हाला की मी आदरणिय विकास महात्मे साहेबांच्या फंडातून पैसे घेतले, चिंतामणी नगरला रस्ता बनवायचा होता सर्व झाले टेन्डर, मी आयुक्तांकडे गेलो नाही कारण की अनेक लोक सांगत होते की दोन ते तीन तास बसावे लागते ज्या दरवाज्यामध्ये आपजी इज्जत नाही त्या दरवाज्यामध्ये आपण जात नाही. मी गेलो नाही मा.महापौरजी, पण एक दिवस मी महात्मे साहेबांना म्हटले मी तर काही जात नाही पण कमीत कमी तुम्ही जा आयुक्त साहेबांना म्हणा, त्यांनी आयुक्त साहेबांना मॅसेज टाकला, आणि चार दिवसाआधी मी आयुक्त साहेबांच्या पी.ए. ला लॅन्डलाईनवर फोन लावला त्या दिवशी मात्र माझे नशिब चांगल होत. त्या पी.ए. नी आयुक्त साहेबांना फोन दिला. त्यानंतर माझे आणि त्यांचे फोनवर बोलने झाले, आणि मी त्यांना सांगितले की या कामाचे सर्व झाले मी सर्वांकडुन घुमुन आलो सर्वांचे म्हणणे असे होते की आयुक्तांनी वर्कऑर्डर थांबविले आणि आयुक्तांसोबत चर्चा झाली तेव्हा ते म्हणे की माझ्याजवळ तर एकही फाईल नाही. आता प्रश्न असा आहे मा.महापौरजी काही लोक आयुक्तांच्या नावावर खपवुन घेत असतील, किंवा काही जागी आयुक्तांनी वर्कऑर्डर केल्या नसतील त्यामुळे अशा समस्या आहे. ही माझी एकटयाची समस्या नाही मा.महापौरजी, अनेकांची समस्या आहे. येथे प्रत्येक नगरसेवकांन गडरचे झाकणे टाकण्यासाठी ६-६ लाख रुपये आहे ते २-२ लाख रुपयातही गडरचे छोटे छोटे कामे होतात आणि ते वाहत असलेले गडर पाहु नाही शकत.आम्ही आयुक्तांच्या समोर किंवा अधिका-यांच्या समोर बोलत नाही परंतु नगरसेवकांना रात्रंदिवस नगरसेवकांना काय काय ऐकावे लागतात हे ज्या दिवशी डायरेक्ट अधिकारी आणि आयुक्त साहेब ज्या दिवशी जातील, तेव्हा समजेल, परिस्थिती ही आहे. आयुक्त साहेब आले, चांगले झाले, गवगवा झाला मान्य आहे पण आयुक्त काही पुर्वग्रह दुषित घेऊन तर नाही आले. मा.महापौरजी मी आपल्याला स्मरण करुन देऊ इच्छितो की १९९७ ला नागपूर महानगरपालिकेमध्ये भारतीय जनता पार्टीचे सरकार होते. आणि १९९४ ते १९९९ मध्ये येथे एक शडयंत्र रचले गेले आणि नागपूर महानगरपालिकेत एक अधिकारी बसविण्यात आला चंद्रशेखर म्हणुन आणि नंदलाल कमेटी या भारतीय जनता पार्टीच्या नगरसेवकांना आणि पदाधिका-यांना बदनाम करण्याचे शडयंत्र घेऊन ते सर्व आले होते. मा.महापौरजी यांना ज्यांनी कोणी पाठविले असेल, त्यांचे ते शडयंत्र तर नाही ना. चेक करावे लागेल, मा.महापौरजी, आणि चंद्रशेखरांना आणलं त्यांच्या मागे जो त्यांचा दृष्टीकोण होता. १९९४ ते १९९९ मध्ये नितीनजी गडकरी यांनी जे कामे केली त्या कामाला मिटविण्यासाठी चंद्रशेखर साहेबांना आणलं जो काम करतो त्यांचे कोणी नाव मिटवु शकत नाही. आज सुध्दा ७७ कोटी रुपयांचे कामे शहरात झाले आहे ते खोडण्याकरीता तर आयुक्तांना आणले गेले नाही. असे अनेक प्रश्न येथे निर्माण होत आहे. पण कितीही बदनामी करण्याचा प्रयत्न केला ते शक्य नाही. त्यानंतर दोनदा भारतीय जनता पार्टीची सत्ता आली आणि आजही आहे. कितीही काहीही यांच्या डोक्यात आणि ज्यांनी पाठविले असेल त्यांच्याही डोक्यात काही चुकीचे असेल तर त्यांनी ते विसरुन जावे. राहिला कोव्हीडचा प्रश्न मी माझ्या झोनमध्ये सुरुवातीला आमच्या खामल्यातील ७ पेशंट कोरोनाचे निघाले मी झोन सभापती या नात्याने माझ्यासोबत असिस्टंट कमीश्नर होते आणि आमचा स्टाफ होता. त्या स्टाफच्या माध्यमातून आम्ही पुर्ण लक्ष्मीनगर झोन सॅनिटाईज करण्याचा पुर्णपणे प्रयत्न केला. आम्ही खांदयाला खांदा लावुन पुर्ण टिमने व झोन ने काम केले. आणि रोजचा संपर्क होता. संवाद आणि संवर्ग हा जर अधिकारा-यांचा आणि प्रशासनाचा दोघांमध्ये असेल तर काम चांगले होऊ शकेल परंतु तुमच्या बाबतीत आणि आयुक्तांच्या बाबतीत आम्हाला तसे दिसले नाही. मी याच्यावर मंथन केले, मंथन केल्यानंतर तीन ते चार मुद्दे

माझ्या लक्षात आले माझ्या असिस्टंट कमीश्नर आणि स्टाफने मला साथ दिला, मला विचारले, मला सांगितले माझ्या लक्षात आले की माझ्या असिस्टंट कमीश्नरने माझ्या सोबत जो संबंध ठेवला या असिस्टंट कमीश्नरला त्यांच्या मनात कदाचित हुकुमशाही नसावी, तिसरे त्यांना आपल्या मनात संवाद कायम ठेवायचा असावा आणि चौथे यांना नागपूरात काम करायचे आहे असे असावे, म्हणुन यांनी माझ्याशी चांगला संबंध ठेवला असेल, आणि काम चांगले केले असेल, पण मा.महापौरजी, अनेक निर्णय झाले, आणि येथे मुंढे साहेबांनी आम्हाला सांगितले नाही असे अनेक नगरसेवक म्हणत आहे हे कितपत योग्य आहे. संवाद आणि संपर्क या दोन्ही गोष्टी नौकरशाहांनी त्या कराव्यात, लोकप्रतिनिधी आणि जनता या दोघांचा एक मध्यबिंद साधुन त्यांनी या शहराचा विकास करायचा असतो. फक्त मी, मी, आणि मी. त्या दिवशी काही चुक नव्हते मा.महापौरजी, चुक याच्यासाठी नाही की त्यांनी म्हटले माझ्या मधात कोणी बोलायचे नाही मी बोलत असतांना यामध्ये आतुन मी पणा भरला आहे. त्यांनी जर तो मी पणा आतुन काढला तर बरे होईल. आम्हाला काम करणारा मानुस पाहिजे. या जगात आपण जन्म घेतो आपण रडतो आणि जेव्हा या जगाचा निरोप घेतो तेव्हा लोक रडतात. ही भावना जर मुंढे साहेबांमध्ये आली.आयुक्त साहेब पहिले नागपूर जिल्हा परिषदेमध्ये सुध्दा होते. आणि हे सर्व का करतात माहिती नाही. समजुन नाही राहिले, कधी कधी मला असे वाटते की यांची जेव्हा बदली झाली तेव्हा लोकांनी यांच्यामागे जावे, आणि म्हणावे की यांची बदली थांबवा, असे कुठेतरी पाहिले, फक्त हा मी पणा आणि संवाद सोडला तर अनेकांनी चांगले काम केले आहे. त्यांनी याच्यानंतर जे आहे ते झटकुन दयावे, आणि पुन्हा सोबत एक जिद्दीने नागपूर शहरात काम करावे, पण मनात कोणताही ग्रह ठेऊ नये. धन्यवाद.

श्री.दिपराज पार्डीकर :- मा.महापौरजी, मा.नगरसेवक श्री.नितीनजी साठवणे यांनी जो स्थगण प्रस्ताव मांडला त्या समर्थनार्थ मी बोलणार आहे. या देशामध्ये जी कोरोना महामारी आली. या शहरामध्ये पाहिल्यांदा सतरंजीपूरा भागात ज्या प्रमाणे नितीन साठवणे यांना अनुभव आले, पेंशंट मिळाल्यानंतर कोणत्याही प्रकारची माहिती न देता मनमान्या ठिकाणाहुन टिना लावण्यात आल्यात. सिल करण्यात आले त्यानंतर लोकांना जो त्रास सुरु झाला तोच त्रास आज आमच्या नाईक तलाव व बंगलादेश भागात आहे. गेल्या १८ मार्चपासून नागपूर शहरात लॉकडाऊन सुरु झाले. नाईक तलाव, बंगलादेश हा भाग अति स्लम वस्ती असुन झोपडपट्टीचा भाग आहे. ज्याप्रमाणे मुंबईमध्ये धारावी झोपडपट्टी आहे त्याचप्रमाणे नाईक तलाव सुध्दा आहे. आणि गेल्या १८ ते २२ मार्च पासून अडीच महिने लॉकडाऊन सुरु होते आणि ३१ मे ला लॉकडाऊन खुलणार अशा परिस्थितीमध्ये २६ मे ला पहिला पॉझिटीव्ह पेशंट त्या भागात भेटला, आणि तेव्हापासून नाईक तलाव आणि बंगलादेश ही लागूनच भाग आहे परंतु आता नाईक तलाव आणि बंगलादेश वेगवेगळे दाखवत आहे. तर तेव्हापासून याप्रमाणे नागपूर शहरात नाईक तलाव आणि बंगलादेश हा भाग हॉटस्पॉट झाला आहे. ज्या भागामध्ये पहिला पेश्ंट मिळाला आणि ज्याच्या घरचे १६ पेशंट आले वर्तमानपत्रात, टी.व्ही. चॅनलवर इंटरनॅशनल न्युज झाली. आणि त्यानंतर त्या भागातील नागरिकांची जी अवस्था झाली अनेक लोक जे कंटोनमंट ऐरियामध्ये राहत होते त्यांना कामावरुन काढण्यात आले होते. मानुस भाजी घ्यायला दही बाजार किंवा इतवारीमध्ये गेला तर त्या दुकानदारांनी विचारले की कुठुन आलो त्यांनी सांगितले की मी नाईक तलाव आणि बंगलादेशम मधुन आलो तर लोक भाजी दयायचे नाही. अनेक दुकानदारांनी त्यांना कामावरुन काढले, कामावर येऊ दयायचे नाही. त्यानंतर जसजसे पेशंट मिळत गेले आणि दुसरे सिल करण्याचे काम सुरु झाले, पहिले सिल तसेच आणि दुसरी कोणतीही सूचना न देता अजुन दुस-या ठिकाणाहून सिल लावण्याचे काम सतरंजीपूरा झोनच्या माध्यमातून सुरुवात झाली. या लॉकडाऊनच्या काळामध्ये अनेक संस्था आमचे राष्ट्रीय

स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक, अनेक संस्था, अनेक एनजीयो, प्रभाकरराव दटके संस्थाच्या माध्यमातून भोजन व्यवस्था असे करीत करीत साडेतीन महिने आम्ही काढत आलो. साधी एखादी सॅनिटायझरची गाडी मागितली तर आम्हाला भेटली नाही. अशा परिस्थितीमध्ये आता ऐवढा मोठा कोरोना पॉझिटीव्हचा भाग नाईक तलाव बंगलादेश असल्यावर सुध्दा या पुर्ण महिन्याभरात ८ ते १० फायर ब्रिगेडच्या गाडया आल्या. त्या गाडया फक्त जे मोठे रोड आहे तेथे गेल्या आणि जे वस्तीमध्ये गाडी जात नाही. ८ ते १० मोठया गाडया येतात ती गाडी २००० लिटरची असते ती गाडी १५ ते २० मिनीटात संपते. त्याच्यानंतर फायलेरिया डिपार्टमेंटला आम्ही फोन केला त्यांना सांगितले की आम्हाला सॅनिटायझर करायचे आहे. १०० एम.एल.ची बॉटल देते आणि एक डबकी ते १५ ते २० घरात मारली तर तो गायब आणि अशा परिस्थितीत लोक आम्हाला शिव्या देत होते की सॅनिटायझर तर करा, ते सुध्दा करु शकत नव्हतो. प्रभाकरराव दटके स्मृती संस्थाच्या माध्यमातून एक टॅंकर चालत होती त्या टॅंकरच्या माध्यमातून नागपूर महानगरपालिकेचे कर्मचारी घेऊन आम्ही पुर्ण प्रभागात गल्ली गल्लीमध्ये जाऊन सॅनिटायझर केले. आता लेंडी तलाव या भागात ६ पॉझिटीव्ह पेशंट मिळाले, नाईक तलावापेक्षा जास्त दाट वस्ती ही लेंडी तलाव या भागात आहे. पुर्ण स्लम वस्ती आहे. त्या वस्तीवर सुध्दा अजुनपर्यत सॅनिटायझर झाले नाही. तांडापेठला ३ पेशंट मिळाले, त्यानंतर तांडापेठला पेशंट निघाले नाही. त्यानंतर नाईक तलाव व बंगलादेश मधुन २२०० च्या जवळपास लोकांना क्वॉरंटाईन करण्यात आले. व्ही.एन.आय.टी. जे क्वॉरंटाईन सेंटर आहे. मधात एक शनिवार आणि रविवारचा दिवस आला होता. जेव्हा पेशंट निघत होते तेव्हा आशा वर्करच्या माध्यमातून अंगणवाडी सेविका, आशा वर्कर आणि काही डॉक्टरची टिम त्यांनी पुर्ण घरोघरी सर्व्हे केला. सर्व्हे करुन ३५८ लोकांचे नावे लिहीले, ३५८ लोकांना रात्री ९ वाजता फोन येतात की आता तुम्हाला क्वॉरंटाईन व्हायचे आहे. तुम्हाला क्वॉरंटाईन जर करायचे आहे तर २ तास आधी सांगा किंवा एक दिवसाआधी सांगा की तुम्हाला क्वॉरंटाईन करण्यासाठी न्यायचे आहे. त्यानंतर मला झोनमधुन फोन आला की साहेब तुम्ही नागरिकांना सांगा, तर मी म्हटले आता होत नाही तुम्ही सकाळी सांगा, ते म्हणाले की आम्हाला तर आयुक्त साहेबांचे आदेश आहे. ते जर गेले नाही तर आमची नौकरी जाईल म्हणे, आणि तेवढया रात्री मग मी गेलो, रमेश पुणेकर आला, आणि आम्ही लोकांना समजविण्याचा प्रयत्न केला, आणि १४६ लोक त्या रात्री गेले. दुस-या दिवशी २४६ लोक नेले आणि अशा पध्दतीने २२०० च्या वर नागरिक बंगलादेश आणि नाईक तलाव या भागातून व्ही.एन.आय.टी. ला क्वॉरंटाईन करण्यासाठी नेण्यात आले. व्ही.एन.आय.टी. ला जेव्हा १४६ लोक नेले त्या दिवशी ३ लोकांची प्रकृती खराब झाली. मला फोन आला तेथुन की छातीतुन दुखत आहे आणि कसेतरी वाटत आहे. मी लगेच राम जोशी साहेबांना फोन केला. आणि त्यांनी तेथे एक डॉक्टर आहे म्हणे त्यांनी नंबर दिला मी त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला पण त्यांचा फोन स्वीच ऑफ होता. राम जोशी साहेबांनी लगेच दुसरी व्यवस्था केली. आता अडीच महिने लॉकडाऊन आणि आता ही परिस्थती नाईक तलाव आणि बंगलादेशचे जे नागरिक आहे जे मजदुर आहे जे भाजीवाल्यांचे धंदे करतात लोक खूप त्रासले आहे. महापौरजी मला ऐवढी विनंती करायचे आहे की ज्याला क्वॉरंटाईन करण्यासाठी नेले आणि तो जर पॉझिटीव्ह निघाला, त्या व्ही.एन.आय.टी. ला १२६ लोक ठेवले होते फक्त ३ बाथरुम आणि ४ नळ होते आणि त्याच्यामुळे तो प्रादुर्भाव वाढला असे मला त्या दिवशी वाटायला लागले आणि मग लोक तेथे जाण्यासाठी टाळाटाळ करायला लागले तरी सुध्दा नागरिकांना सांगितले की हे जरे प्रशासन आणि सरकारची जी बाजु आहे ते आपल्या फायदयासाठी होत आहे मग नागरिकांनी सुध्दा मदत करण्याचा प्रयत्न केला. आणि त्यामध्ये जे पॉझिटीव्ह निघत आहे. माझ्या वॉटसॲप वर आले जेवण कसे आहे तर पाहुन घ्या, जे पॉझिटीव्ह निघत आहे ते ७ते ८ दिवसात घरी येत आहे आणि जे

निगेटीव्ह निघत आहे त्यांना १५ ते २० दिवस लागत आहे. आणि अशा या परिस्थितीमध्ये आपल्या माध्यमातून विनंती आहे की ज्या प्रकारे नाईक तलाव, बंगलादेश, लेंडी तलाव, तांडापेठ या पुर्ण व्यवस्थेमध्ये झोन मार्फेत किंवा कोणत्याही अधिका-यांमार्फेत आम्हाला कोणत्याही प्रकाराची सूचना देण्यात आली नाही. आम्ही पण नगरसेवक या नात्याने जेवढे करता येईल तेवढे करण्याचा प्रयत्न केला. मला महापौरजी आपल्या मार्फेत ऐवढी विनंती आहे की ज्या प्रकारे लेडी तलावाची आता जी परिस्थिती आहे की पहिल्या पावसामध्ये लोकांच्या घरात पाणी गेले, जोशी साहेबांना माहिती आहे जेव्हा मुदगल साहेब आयुक्त होते आम्ही लेंडी तलावाचा दौरा केला होता, नाईक तलावाचा दौरा केला होता. तो लेंडी तलाव २८ ऐकर मध्ये होता. नागरिकांनी तलाव बुजवु बुजवु तेथे घरे बांधली, पाऊस आला की त्या लोकांच्या घरात पाणी येते, कोरोना त्यांच्या घरात आहे. मागच्या वेळेस त्या तलावासाठी पैसे मागितले, फाईल तयार केली, टेन्डरसाठी आली आणि तशीच पडली आहे. नाईक तलावाची सुध्दा तशीच परिस्थिती आहे. नाईक तलावाचा जो मुख्य रस्ता आहे. माझी आपल्या मार्फेत आयुक्त साहेबांना विनंती आहे. की ऐवढा मोठा नागपूर शहरामध्ये हा भाग हॉटस्पॉट आहे. आयुक्तांनी साधी हजेरी किंवा दौरा त्यांनी केला काय? ज्या वेळेस या राज्याचे गृहमंत्री, अनिलजी देशमुख आले, नागपूर शहराचे पोलीस कमीश्नर उपाध्याय साहेब आले, पाचपावलीच्या पी.आय. साहेबांचा फोन आला की मंत्री साहेब येणार आहे, सी.पी. साहेब येणार आहे जेव्हा ते निरोप देऊ शकतात तुम्ही का निरोप घेत नाही. तुम्ही का दौरा करीत नाही. तुम्ही फक्त आपल्या ऑफीस मध्ये ए.सी. मध्ये बसुन फक्त ऑर्डर देऊ नका, जमिनीवर या, नाईक तलाव, लेंडी तलाव, बंगलादेश, आणि ज्या प्रकारे नागरिकांना त्रास होत आहे त्यांची दक्षता घ्या आणि माझी मा.महापौरजी अजून एक विनंती आहे गेल्या साडे तीन चार महिन्यापासून लॉकडाऊन केले आहे व सिल केले आहे. जितक्या लवकर होत असेल तितक्या लवकर नागरिकांना होम क्वॉरंटाईन करण्याचा प्रयत्न करा, होत असेल तर त्या त्या स्पॉटवर येऊन त्यांची तपासणी करण्यात यावी आणि ज्या प्रकारे नाईक तलाव बंगलादेश या भागामध्ये अनेक विकासाच्या कामाच्या फाईल आहे, आता नाईक तलावाचा जो सांडनाला आहे तो सांडनाला पुर्णपणे बुजला आहे. येथे हुमणे साहेब बसले आहे त्यांना तीन तीन दा मोबाईल वर फोटो टाकले, तेथील सॅनिटरी इन्स्पेक्टरला फोटो पाठविले ते सरळ म्हणतात की आमच्याकडे काही ऑर्डर नाही आहे आणि पैसे नाही. भुतकर साहेबांना सांगितले पण कोणीही ऐकायला तयार नाही. जे आमच्या भागातील छोटे मोठे काम असतील ते तुम्ही तुमच्याच माध्यमातून करा, तुम्ही तुमच्या माध्यमातून फाईल तयार करा, तुम्हीच ठेकेदार आणा तुम्हीच काम करा, फक्त आम्हाला सूचना देऊ आम्ही उभे राहु आम्ही नागरिकांची सेवा करण्यासाठी तयार आहोत, आम्ही नागरिकांची सेवा करुच, धन्यवाद.

श्रीमती. परिणिता फुके :- मा.महापौरजी, आज मा.सदस्य श्री.नितीनजी साठवणे यांनी येथे जो स्थगण प्रस्ताव ठेवला होता आणि त्यावर आज १२ वाजता पासून चर्चा सुरु आहे. त्या अनुषंगाने मला काही प्रश्न आपल्याव्दारे मा.आयुक्तांना विचारायचे आहे. कारण ही जी स्थिती मा.सदस्य श्री.नितीनजी साठवणे यांनी त्यांच्यावर जी आपबिती झाली आहे ही जवळपास भरपुर नगरसेवकांनी ती सहन केली आहे. माझ्या प्रभागात सुध्दा कंटेनमेंट झोन झाले होते. माझ्या प्रभागात आयसोलेशन सेंटर बनविण्यात आले आहे. माझ्या प्रभागामध्ये क्वॉरंटाईन सेंटर सुध्दा बनविण्यात आले आहे. तर मला काही असे प्रश्न आहे त्याचे उत्तर त्यांनी दयावे. सर्वात आधी मला विचारायचे आहे की, जेव्हा आपण क्वॉरंटाईन सेंटर तयार केले तेव्हा आय.सी.एम.आर. च्या गाईडलाईन आपण फॉलो केल्या होत्या काय ? आय.सी.एम.आर. अर्थात इंडीयन कॉन्सील मेडीकल रिसर्च यांच्या ज्या गाईडलाईन्स आल्या होत्या, त्या गाईडलाईन्सनुसार काय काय करायचे

होते ते मी अगदी शॉर्ट मध्ये तुम्हाला सांगु इच्छिते, ४ एप्रिल, १७ एप्रिल आणि २२ एप्रिलला या गाईडलाईन्स वारंवार देण्यात आल्या होत्या, की कुठलाही ऐरिया जर कंटेनमेंट झोन करीत आहे किंवा कुठल्याही ऐरियामध्ये आपण जर क्वॉरंटाईन सेंटर किंवा आयसोलेशन सेंटर करीत आहे तर त्याला स्टॅन्डर्ड ऑपरेटींग प्रोसीजर आहे ज्याला की एस.ओ.पी. म्हणतात आणि ते मा.आयुक्तांनी फॉलो केल्या होत्या काय ? माझ्या प्रभागामध्ये व्ही.एन.आय.टी. ला रातोरात कितीतरी लोक आणुन त्यांनी क्वॉरंटाईन केले होते ती लोक कुठुन तुम्ही आणले होती माझ्या प्रभागातील ती लोक नव्हती. ज्या वेळेला माझा प्रभाग सेफ्टी झोनमध्ये होता, ग्रीन झोनमध्ये होता या वेळेला आपण दुस-या झोनचे लोक, कुठल्या प्रभागाचे लोक आमच्या प्रभागात टाकुन दिले आणि क्वॉरंटाईन झोन करीत असतांना एक गाईडलाईन दिलेली होती त्यात एन.सी.डी.सी. अर्थान नॅशनल कंट्रोल ऑफ डिसीस त्यांच्या तर्फे एक बेसिक फॉर्मुला दिलेला आहे. तो  मी तुम्हाला वाचुन दाखविते. (वाचले) अर्थात तुम्ही जेथेही क्वॉरंटाईन सेंटर बनवित आहे तो पब्लीक प्लेसमध्ये नसायला हवा. क्राऊडेड ऐरियामध्ये नको. अर्थात ज्या ऐरियामध्ये माझ्या प्रभागात त्यांनी क्वॉरंटाईन सेंटर केलेले आहे आणि आय.जी.आर. मध्ये जे आयसोलेशन सेंटर त्यांनी केलेले आहे ते अगदी डेन्सली पॉप्युलेटेड ऐरिया आहे. त्याच्या आजुबाजूला जवळपास एक लाख लोकांची जनसंख्या आहे. तिथे गांधीनगर, यशवंतनगर, वर्मा लेआऊट, बजाजनगर असे कितीतरी ऐरिया त्याच्या आजुबाजूला आहे. मग मा.आयुक्तांनी त्याला क्वॉरंटाईन सेंटर कसे केले. आणि ते सुध्दा कोनाला कॉन्फीडन्स मध्ये न घेता. माझा त्यांना दुसरा प्रश्न आहे की एस.ओ.पी जे स्टॅन्डर्ड ऑपरेटींग प्रोसिजर आहे त्यानुसार सर्वात आधी जेव्हाही तुम्हाला कंटोनमेंट झोन करायचे आहे तेव्हा कॉटॅक्ट ट्रेसिंग फॉर कोव्हीड – १९ चे रेगुलेशन दिलेले आहे. त्या रेगुलेशन अनुसार आपण जेवढया लोकांना क्वॉरंटाईन सेंटरमध्ये टाकले आहे त्या लोकांकडुन ते फॉर्म भरुण घेतले होते काय ? त्याचा पहिला फॉर्म होता कॉटॅक्ट लिस्ट फॉरमॅट फॉर्म नं १ त्यातील दुसरा फॉर्म नं २ आहे कॉट्रॅक्ट ट्रेसिंग अॅन्ड फॉलो फॉर्म, तिसरा फॉर्म आहे सर्च फॉर सिमटोमॅटीक केसेस, त्यानंतर आहे डेली रिपोर्टीग फॉरमॅट तो आहे फॉर्म नं ३ आणि लिस्ट ऑफ कॉटॅक्ट तो आहे फॉर्म नं. ४ मला मा.आयुक्तांना आपल्याव्दारे विचारायचे आहे की जेवढया लोकांना तुम्ही क्वॉरंटाईन केलेले होते या लोकांपासून तुम्ही हे चारही फॉर्म भरुन घेतले होते काय ? आणि नागपूर शहरात तुम्ही किती लोकांना क्वॉरंटाईन केले, आणि जर हे फॉर्म तुम्ही भरुन घेतले असेल तर ते या सभागृहासमोर उपस्थित करुन घेतले पाहिजे. अर्थात माझा दुसरा प्रश्न त्यांना असा आहे की जेव्हा केंद्रीय सरकार कडुन जेव्हा ही कोव्हिड सिच्युऐशन झाली होती तेव्हा रॅपीड टेस्टच्या किट आल्या होत्या आणि केंद्रीय सरकारनी ६४ लाख कीट ऑर्डर केल्या होत्या आणि जेव्हा ही सिच्युऐशन नुकतीच आली होती तेव्हा आपल्याकडे कमीत कमी साडेसात लाख किट प्रोव्हाईड झाल्या होत्या आणि त्यातुन ७१ हजार किट या महाराष्ट्रासाठी प्रोव्हाईड झाल्या होत्या, मला मा.महापौरजी आपल्याव्दारे मा.आयुक्तांना विचारायचे आहे की या ७१ हजार किट मधल्या किती किट आपल्या नागपूर शहराकरीता आल्या होत्या, आणि स्टॅन्डर्ड ऑपरेटींग प्रोसिजर नुसार  आपल्याला जी कॉटॅक्ट लिस्ट किंवा कॉटॅक्टमध्ये असलेल्या लोकांना क्वॉरंटाईन करायचे आहे त्याच्या पहिले आपल्याला रॅपिड टेस्ट करणे आवश्यक आहे. आपल्या नागपूर मध्ये आपण रॅपिड टेस्ट केल्या होत्या काय ? रॅपिड टेस्ट नव्हत्या केल्या तर आपण कुठल्या अनुषंगाने यांना क्वॉरंटाईन केले होते. म्हणजे तुम्हाला जर कोठेही कोव्हीडचा पेशंट मिळाला तर तेथील हजार-हजार लोक उचलुन कुठेही क्वॉरंटाईन करुन टाकले, अर्थात तुम्ही माझ्याच ऐरियामध्ये दुस-या ऐरियातील लोकांना डम्प केले, मी येथे डम्प म्हणत आहे कारण ज्या फॅसिलीटी गव्हर्नमेंट कडुन क्वॉरंटाईन सेंटरला पाहिजे होत्या त्या फॅसिलीटी केल्या होत्या काय ? जर नसेल केल्या तर अशरक्ष: तुम्ही तेथे लोकांना डम्प केले होते. तुम्ही सांगितले की मी

नागपूरला सेफ करतो, या झोनला सेफ करतो. त्याच्यामध्ये दुसरा पॉइंट येथे आहे जेव्हा आपण अशा कॉटॅक्ट लिस्ट मधील लोकांना ट्रेस करीत असतो तेव्हा मिनीस्ट्री ऑफ हेल्थच्या गाईडलाईन नुसार दोन प्रकारचे पेशंट असतात, हाय रिस्क पेशंट आणि लो रिस्क पेशंट, हाय रिस्क पेशंटला क्वॉरंटाईन करण्याची गाईडलाईन वेगळया आहेत आणि लो रिस्क पेशंटला क्वॉरंटाईन करण्याच्या गाईडलाईन वेगळया आहे. आपण याच्यात माहिती काढली होती काय की ज्या लोकांना तुम्ही उचलत आहे, तुम्ही घेऊन जात आहे ते हाय रिस्क होते की लो रिस्क होते. हाय रिस्क वाल्यांना वेगळया जागी ठेवायचे होते आणि लो रिस्क वाल्यांना वेगळया जागी ठेवायचे होते असे कुठेही तुम्ही वर्कआऊट केले होते काय ? माझा तिसरा प्रश्न आहे. जेव्हा तुम्हाला एन.सी.डी.सी. ने प्रॉपर गाईड लाईन्स आणि क्लीअर गाईडलाईन्स दिल्या आहे की क्वॉरंटाईन सेंटर हे सिटीच्या आऊटसाईडला असले पाहिजे, पण तुम्ही जेवढेही क्वॉरंटाईन सेंटर नागपूरसाठी तयार केले होते ते सगळे सेंटर तुम्ही नागपूर सिटीच्या आतमध्ये केले आहे. डेन्सीटी पॉप्युलेटेड ऐरियामध्ये केलेले आहे. यामुळे जर आजुबाजुच्या लोकांना त्रास झाला असेल तर त्याची जबाबदारी कोणाची असणार आहे. महानगरपालिकेची ही जबाबदारी असणार आहे की तुम्ही स्वत: ही जबाबदारी घेणार आहे. कारण हे सर्व करीत असतांना ऐवढे सर्व नगरसेवक सांगत आहे की तुम्ही कोणालाही कॉन्फीडन्स मध्ये घेतले नाही. त्यामुळे ही जबाबदारी तुम्ही स्वत:हुन स्वीकारली पाहिजे. माझा शेवटचा प्रश्न आहे  तुम्ही हे सर्व करीत असतांना एस.ओ.पी. फॉलो केली नाही. केली असेल तर कुठल्या प्रकारची तुम्ही एस.ओ.पी. फॉलो केली आहे. आणि फोलो केली असे तर निश्चितच जेवढेही फॉर्म नंबर मी वाचुन दाखविले तेवढे सगळे फॉर्म तुमच्याकडे उपलब्ध असायला पाहिजे. आणि हे फॉर्म मेडीकल ऑफीसर कडुन साईन असले पाहिजे. कारण ही साईन अथॉरिटी हे मेडीकल ऑफीसर होते. जेवढेही क्वॉरंटाईन सेंटर आहे त्यांच्याकडे हे मेडीकल सर्टीफिकेट असायला पाहिजे. मा.महापौरजी आपण सर्व ऐरियाची परिस्थिती आपण जाणुन घेतली आहे सर्वच नगरसेवकांना एक मानसिक त्रास झालेला आहे. कारण मा.आयुक्तांनी खुप चांगली कामगिरी केलेली आहे. अभिनंदन आहे त्यांचे मात्र त्यांनी जर हेच कार्य सगळयांना कॉन्फीडन्स मध्ये घेऊन केले असते तर आमच्या सारख्या नगरसेवकांना सुध्दा त्रास झाला नसता. आज त्यांच्या अशा कार्यामुळे त्यांनी खरचं चांगले कार्य केले, कोव्हीड पासून नागपूरला सेफ करण्याचा त्यांनी भरपुर प्रयत्न केला आणि त्यांनी एस.ओ.पी. या चालविल्या की नाही. ते मला उत्तर देऊ शकतात की नाही. कारण मला इमरजन्सी मुळे मला हे हे डिसीजन घ्यावे लागले, तुम्ही डिसीजन घ्या, नक्कीच घ्या, आम्ही काही नागपूरच्या विरोधी नाही. आम्हालाही नागपूरच्या सपोर्टसाठीच काम करायचे आहे. आम्ही नगरसेवक आहोत, आम्ही जनप्रतिनिधी आहोत, आम्हालाही लोकांना सांगायचे असते की आम्ही काय काम याच्यासाठी केले आहे. जर हे सांगुन केले असते तर आम्हाला आनंद झाला असता. आज तुमचे कार्य खुप चांगले होते, खुप चांगले तुम्ही सेकुअर्ड करण्याचा प्रयत्न केला मात्र जी पध्दत तुमच्या कामाची होती ती बरोबर नव्हती येथे आपल्याला सांगायचे आहे. आणि आपल्या या पध्दतीमुळे आज प्रत्येक जनतेच्या मनात एक वेगळीच भावना निर्माण झालेली आहे. ते म्हणतात ना करोना से डर नही लगता साहब मुझे क्वॉरंटाईन से डर लगता है। अशी ही स्थिती आज नागपूरात झालेली आहे. करोना मला झाला तर चालेल पण माझ्या घरच्या लोकांना क्वॉरंटाईन करावे नाही लागणार म्हणुन भिती लोकांच्या मनात निर्माण झाली आहे. तुम्ही गठयांनी लोकांना उचलुन क्वॉरंटाईन करण्यासाठी नेले आणि फिसीलीटी दिल्या नाही त्यामुळे आज लोकांच्या मनात अवेअरनेस कमी आणि भिती जास्त निर्माण झाली आहे. ते सर्व तुमच्या कार्य करण्याच्या पध्दतीमुळे झाले आहे. तुम्ही अतिशय चांगले कार्य केले आहे. जर पध्दत तुमची बरोबर असती, सर्वांना घेऊन चालले असते तर ही भिती नसती आणि एक अवेअरनेस

असते. एस.ओ.पी. तुम्ही फॉलो केली असती तर लोकांना कळले असते की क्वॉरंटाईन जर व्हायचे आहे तर हे हे फॉर्म भरायचे असते आणि या पध्दतीने आम्हाला क्वॉरंटाईन करण्यासाठी नेणार आहे. कोरोना होण्याची भिती त्यांच्यामध्ये जी निर्माण झाली आहे ही या प्रकारच्या पध्दतीचे काम केल्यामुळे झाली आहे. आणि आता ही भिती आपल्याला लोकांच्या मनातुन काढायची आहे. आणि शेवट मला ऐवढचे बोलायचे आहे की एक इंग्लीशमध्ये एक फार सुंदर म्हण आहे. " If u want to go fast go alone, and If u want to go far go together " आयुक्त साहेबांना मला येथे सांगायचे आहे की मा.आयुक्त साहेब चॉईस तुमची आहे तुम्हाला जर फास्ट जायचे असेल तर तुम्ही ऐकटे चालु शकता पण आमची खुप इच्छा आहे तुम्ही खरचं एक कॉम्पीटंट अथॉरिटी आहात, तुम्ही खूप चांगले कामे केले आहात, तुम्ही सगळयांना घेऊन चला, Try to go far go together. धन्यवाद.

श्री.अविनाश ठाकरे :- सन्माननिय महापौरजी, सन्माननिय सभागृह, उपस्थित सर्व नगरसेवक बंधु भगिणीनों नागपूर शहराच्या व नागपूर महानगरपालिकेच्या इतिहासामध्ये एक अतिशय दुर्देवी असा क्षण आहे की एका नगरसेवकांना किंबहुना दोन सन्माननिय नगरसेवकांना या सभागृहाच्या या महानगरपालिकेच्या प्रशासनाच्या वतीने उच्चस्थ पदाच्या व्यक्तीच्या विरोधात एक स्थगण प्रस्ताव आणावा लागला आणि तो सुध्दा कुठल्या वेळेला की ज्या वेळी ही अपेक्षा होती की सर्व जग एकत्रितपणे या करोनाच्या महामारीचा सामना करीत आहे आणि त्यावेळला नागपूर शहरातील प्रशासन, मग ते महानगरपालिका प्रशासन असो, की पोलीस प्रशासन असो किंबहुना अजुन दुसरे प्रशासन असो, आणि नागपूर शहरातील जनप्रतिनिधी हे एकत्रित मिळुन या महामारीचा सामना करीत आहे असे चित्र तयार व्हायला पाहिजे होते त्यावेळेला प्रशासन विरुध्द जनप्रतिनिधी असे चित्र हे शहर पाहत आहे हे अत्यंत निंदादायक आणि क्लेषदायक या शहराचा नागरिक म्हणुन मला निश्चितपणे वाटते. साठवणे आमचे सहकारी नगरसेवक याने त्यांची दुखद कहाणी सांगितली, मंगलाताई गवरेंच्या प्रस्तावांचे देखील येथे वाचन केले त्यांच्या सुध्दा अडचणी सांगितल्या, सर्व पक्षांच्या नगरसेवकांचे या ठिकाणी वक्तव्य झालेले आहे. आणि सर्वांचे वक्तव्य ऐकल्यावर एक गाणे आठवत आहे. सिने मे जलन आखों मे तुफानोंसा क्यौ है, इस सदन मे हर शख्स परेशान सा क्यौ है l समोर बसलेले परेशान, इकडे बसलेले परेशान असे काय घडले आहे शहरामध्ये की सर्व दुर परेशान असे चेहरे दिसत आहे. प्रथा, परंम्परा, नियम, या प्रमाणे २७ जानेवारी नंतर जे जे नगरसेवक या सभागृहामध्ये जनप्रतिनिधी आहे त्या सर्वांनी गेल्या अनेक वर्षाची जी प्रथा परंम्परा सुरु आहे. गेल्या अनेक वर्षाची जी कामकाजाची जी पध्दती सुरु आहे त्या पध्दतीप्रमाणे आपआपली कामे घेऊन या शहराच्या प्रशासनाच्या प्रमुख व्यक्तीकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. हे मी नाही बोलत आहे या सदनातील सर्व नगरसेवक बोलत आहे. त्या व्यक्तीने कुणालाही एंटरटेन केले नाही. दोष कोणाचा, या ठिकाणी दोष कोणाचा आहे. ही अतिशय क्लेषदायक अशी घटना आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जे संविधान लिहीले आहे त्या संविधानाच्या अनुषंगाने या देशामध्ये थ्री टायर सिस्टम आहे. लोकसभेचे सदन, विधानसभेचे सदन,आणि स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदन, समजा या स्थानिक स्वराज्य संस्थेची आवश्यकताच नसती तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेमध्ये कशाला हे सदन तयार केले असते. कशाला जनप्रतिनिधी निवडुण आणण्याची प्रक्रीया तयार केली असती. कशाला जनतेला या जनप्रतिनिधीला निवडुण आणायचा अधिकार दिला असता. आणि ऐवढे मोठे जे विषय चालवितो आहे ते कशाला केले असते. कारण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची भुमिका होती की सामान्य मानसाला न्याय देणारा त्यांच्या वस्तीतील एक व्यक्ती कुठेतरी त्याला त्या व्यक्तीला बोलायला जागा असली पाहिजे. त्या लोकांचे प्रश्न मांडायला त्या व्यक्तीला संधी मिळाली पाहिजे. आणि याकरीता जनप्रतिनिधीची नेमणुक व्हावी, जो

स्थानिक आहे त्यांनी तर ७४ अमेंडमेंट नंतर तर वार्ड पध्दतीसुध्दा आणली. म्हणजे अजून खालपर्यंत गेले, ग्रामपंचायत सदस्य, सरपंच यापर्यंत गेले आहे. या व्यवस्था कशाला उभ्या झालेल्या आहेत. या व्यवस्था या करीता उभ्या झालेल्या आहेत की स्थानिक मानसांचे प्रश्न या जनप्रतिनिधींने सोडविले पाहिजे. आणि मग हे सोडवितांना हा जनप्रतिनिधी कुठे चुकतो काय, कारण याचे शिक्षण किती आहे. हा कुठल्या व्यवसायात आहे, हा कुठल्या वस्तीमध्ये राहतो, याला कायदयाचे ज्ञान आहे की नाही. हा बेकायदेशीर काम करतो काय ? अत्यावश्यक आहे की नाही, की जाणुन बुजन करतो काय ? या सगळया गोष्टीवर वचक ठेवण्यासाठी एक प्रशासन म्हणुन एक व्यवस्था डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना हवी होती. हे महानगरपालिकेचे पुस्तक आहे. या पुस्तकामध्ये आपल्या महानगरपालिकेची रचना त्यांनी दिलेली आहे. सर्वांना माहिती असेल पण कधी कधी उजळणी करणे आवश्यक असते. कारण उजळणी नाही झाली तर मानुस विसरुन जातो. काय म्हटले आहे महानगरपालिका प्राधिकारी, मी सर्व नगरसेवकांच्या अनुषंगाने या ठिकाणी बोलत आहे. महानगरपालिका प्राधिकारी क्रमांक १ वर आहे महानगरपालिका, क्रमांक २ वर आहे स्थायी समिती, क्रमांक ३ वर आहे प्रभाग समित्या, क्रमांक ४ वर आहे नगरपालिका आयुक्त आणि ज्या शहरामध्ये परिवहन समिती असेल तर ५ नंबर वर आहे परिवहन समिती. आता याचे संरचना, आता महानगरपालिका म्हणजे काय ? जनतेने विश्वासाने निवडुन दिलेल्या प्रतिनिधीचे म्हणजेच जनतेच्या विश्वासाला पात्र असलेले विश्वास्तांचे एक सभागृह, विश्वास्तांची एक समिती म्हणजे महानगरपालिका, समजा हे सभासदच नसेल तर या महानगरपालिकेचे अस्तित्व काय? शुन्य. मग स्थायी समिती म्हणजे काय ? या जनतेच्या प्रतिनिधी मधुन १६ लोक जे या प्रतिनिधींनी पाठविले आहे ते या शहराच्या विकासाच्या दृष्टीकोणातून आर्थिक धोरण ठरवतील, ती समिती म्हणजे कोण तर स्थायी समिती, ती समिती नसेल तर त्याला अर्थ काय ? तिसरे आहे प्रभाग समिती, स्थानिक स्तरावरच्या समस्या सोडविण्याकरीता नगरसेवकांची एक समिती आणि त्या समितीला स्थानिक स्तरावर दिलेल्या अधिकारांच्या माध्यमातून स्थानिक जनतेची समस्या निवारण करण्याकरीता त्यांनी केलेली कार्यपध्दती ठरविण्यासाठी जी समिती आहे ती प्रभाग समिती आणि या सर्वांना उत्तर कोणाला दयायचे आहे. तर या पुस्तकाप्रमाणे सन्माननिय आयुक्त जे प्रशासनाचे प्रमुख आहे किंवा त्यांनी नियुक्त केलेल्या त्यांच्या सहका-यांनी दयायचे आहे. आता या ठिकाणी अनेक नगरसेवकांनी सांगितले ५० हजारांचे सुध्दा फाईल बनत नाही. मग माझा प्रश्न आहे. प्रभाग समित्या बरखास्त केल्या काय ? प्रभाग समिती जर बरखास्त केल्या असतील तर तो अधिकार प्रशासनाला कोणी दिला, तो अधिकार तर महानगरपालिकेचा आहे तो अबाधित असायला पाहिजे. मग मी स्थायी समिती अध्यक्षांकडे अनेकदा चौकशी केली, की काही फाईल्स तुमच्याकडे आहे काय ? त्यांनी सांगितलं की माझ्याकडे फाईल्सच येत नाही, माझी मिटींगच नाही आहे. मग ती स्थायी समिती बरखास्त केली काय ? ती स्थायी समिती बरखास्त करण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला. तुम्ही कोणाची परवानगी घेतली काय ? मा.महापौरांशी अनेक वेळा चर्चा झाली. मा.महापौरांना सुध्दा अनेक गोष्टींची माहिती नाही. अडचण अशी आहे की मला जेव्हा माझ्या प्रभागामध्ये जेव्हा मी जातो तेव्हा माझ्या पण प्रभागातील काही समस्या असतीलच ना, माझ्या प्रभागामध्ये क्वॉरंटाईन सेंटर तयार झाले त्या संदर्भात मी तेथील नागरिकांचे निवेदन घेऊन मी आयुक्तांपर्यंत जाण्याचा प्रयत्न केला, त्यांना फोन केला मी नगरसेवक अविनाश ठाकरे बोलल्याबरोबर त्यांनी फोन काटला, साडे बारा वर्षाच्या इतिहासात असे पहिल्यांदा घडले. या अगोदर अनेक आयुक्त या नागपूर महानगरपालिकेत आले. मिटींगमध्ये जरी बसले असेल तरी नगरसेवकांनी चिठ्ठी पाठविली साहेब आम्हाला तुमच्यासोबत काम आहे तर निरोप देतात की ५ मिनीट थांबा सन्माननिय आयुक्त मिटींगला होल्ड करुन पाहिले नगरसेवकांना भेटायचे. पण येथे असे घडले का ?

आश्चर्याची गोष्ट आहे मायाताई ईवनाते सारख्या, राज्यमंत्री दर्जाच्या एका महिला आयोगाच्या, आदीवासी आयोगाच्या सदस्याला १ तास थांबण्याचे आतमधुन सांगण्यात येते. महापौरांना राज्यमंत्र्यांचा दर्जा आहे. घटनेप्रमाणे महापौरांना राज्यमंत्र्यांचा दर्जा आहे. राज्यमंत्र्यांना तुम्ही टाळता. कशासाठी, आम्ही काय आमच्या घरचे कामे घेऊन येतो काय ? हे मी नाही सांगत हे सर्व नगरसेवकांच्या वतीने मी सांगत आहे. तर मग इतिहास कसा लिहीला गेला, माझ्या प्रभागातील क्वॉरंटाईन सेंटर थांबविण्यासाठी मी आयुक्तांची वेळ मागितली, तेथे नागरिक होते फ्लॅटस्कीम जरी दुस-यांनी बांधली तरी आमचा त्यामध्ये कंन्सर्नच नही की कुठे जबरदस्ती आमच्या फ्लॅटमध्ये ॲक्वीझीशन करुन राहिले आहे. आम्ही चर्चेसाठी वेळ मागितला, चर्चेला वेळ दिला नाही. इतिहास कसा लिहीला जातो पहा, या शहराचा मी नागरिक आहे. या शहराचा काळाकुट्ट इतिहास लिहला जात आहे याचे मला दु:ख आहे. वेदना आहे. इतिहास कसा लिहला जातो पहा शेवटी आम्हाला कोर्टात जावे लागले, कोर्टातुन स्टे घेतला, दोन टॉवर महानगरपालिका मागत होते म्हणुन दोन महिने महानगरपालिकेला वापरायची वेळ दिली बाकीचे टॉवर ॲक्वायर करु नका असे सांगितले, आता ती बिल्डींग क्वॉरंटाईन सेंटर मधुन काढली आहे. काय लिहीला गेला इतिहास, इतिहास हा लिहीला गेला, की या महामारीच्या प्रकोपामध्ये या शहरातील जनतेने विरोध केला, हे कोणामुळे घडले, संवाद साधला असता तर या गोष्टी घडल्या असत्या काय, चर्चा झाली असती तर या गोष्टी घडल्या असत्या काय ? सन्माननिय नगरसेवक श्री.बंटी शेळके एकदा माझ्यासोबत लाईव्ह होते इतकी वाईट परिस्थिती आहे. काल आम्ही एका चॅनलवर लाईव्ह होतो. विषय नागपूर महानगरपालिकेचाच होता. कोरोना संपविण्याकरीता नागपूर महानगरपालिकेच्या विषयावर संपुर्ण नागपूर शहर चर्चा करीत आहे. त्या चॅनलवर लाईव्ह होते आमची चर्चा सुरु होती. चर्चा झाल्यानंतर मी फेसबुकवर ते लाईव्ह पाहत होतो. आय वॉझ शॉक, एकानी तेथे स्टेटमेंट लिहीले होते. प्र फुल्लजी आणि तानाजी तुमच्यासाठी पण महत्वाचे आहे. कमलेशजी तुमच्यासाठी पण महत्वाचे आहे. तेथे लिहले होते की नागपूर महानगरपालिकेचे नगरसेवक क्रीमीनल आणि चोर आहे. काय साध्य केलं आपण, काय साध्य केलं आपण याच्यातून मला सांगा ना. नागपूर महानगरपालिकेच्या नगरसेवकांना चोर सिध्द करीत आहे आपण, अरे मी चांगला आहे म्हणुन सर्व जग वाईट आहे ही कुठली कृती आहे आणि कुणामुळे एका इन्स्टीटयुशनचं नाव खराब होऊन राहिलो हो, एका शहराच्या इन्स्टीटयुशनला दीडशे वर्ष पुर्ण झाले दोन वर्षा अगोदर, जिचा दीडशे वर्षाचा गौरवशाली इतिहास आहे. या दिडशे वर्षाच्या इस्टीटयुशनचे काम एका व्यक्तीच्या हेकेखोरपणामुळे खराब होऊन राहिले, कुणी संवादाची भुमिका नाही घेतली या ठिकाणी, कुठला नगरसेवक लाठयाकाठया घेऊन गेला होता आयुक्तांच्या कॅबिन सोमर, कुठल्या नगरसेवकांनी आयुक्तांना टेलीफोनवर शिव्या दिल्या, कुठल्या नगरसेवकांनी सन्माननिय प्रशासनाच्या प्रमुखांवर मोर्चा नेला, कुठला नगरसेवक टॅंकर मागायला गेला, सर्व कोणासाठी गेले नागरिकांसाठी, पाण्याची पाईप लाईन, पाण्याचा टॅंकर पाहिजे, क्वॉरंटाईन सेंटरमध्ये अव्यवस्था आहे. आणि या सभागृहात हुशार नगरसेवक आहे. या सभागृहाचा आपण संपुर्ण आलेख वाचला गेल्या १५ वर्षाचा तर अनेक योजना या सभागृहाने दिलेल्या केंद्र आणि राज्य शासनाने घेतल्या आहे. बी.ओ.टी. चा पी.पी.पी. चा मॉडेल यशस्वी करुन दाखविणारे हे सभागृह आहे. या नागपूर शहरामध्ये ज्या वेळी टॅक्समध्ये भ्रष्टाचार होता त्यावेळी सॅटेलाईट टॅक्स असेसमेंटची सिस्टम आणुन संपुर्ण रोल मॉडेल तयार करुन देणारे हे सभागृह आहे. सांडपाणी विकुन त्यातुन पैसे कमवून देणारे हे सभागृह आहे ऐवढच नाही तर या सभागृहाने ज्या केबल डक्टच्या पॉलिसी तयार केल्या त्या आज केरळ सारखे राज्य राबवित आहे. डिपार्टमेंट ऑफ टेलीकमुनिकेशनचे अधिकारी डेप्युट करुन ऐवढे मोठे मोठे काम या सभागृहाने केले आहे. आणि ज्या वेळी

सन्माननिय महापौरजी स्थायी समितीचे अध्यक्ष होते त्यावेळी त्यांनी एक योजना आणली होती महिलांकरीता त्या महिलांचा १२ रुपयांचा जर इन्शुरन्स काढला त्यांना नैसर्गिक किंवा अनैसर्गिक मृत्युच्या वेळी ३०,००० हजार रुपयांचे कॉम्पनसेशन मिळेल अशा प्रकारची योजना त्यावेळी २०११-२०१२ मध्ये मा.महापौरजी ज्यावेळी अध्यक्ष होते त्या वेळी आणली होती. आणि मला सांगतांना आनंद होत आहे की २०१४ नंतर मा.पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी यांच्या तर्फे ती योजना राष्ट्रात राबविल्या गेली ऐवढया उच्च दर्जाचे सभागृह आहे. या सभागृहातील लोकांना कळत नाही की हा भ्रम कुठुन निर्माण झाला, कशामुळे निर्माण झाला, प्रिज्युडलाईज माईन्ड ने आपण आला आहात काय, नाही मला कोणाचेच नाही ऐकायचे, कुणाशीच बोलायचे नाही, हे योग्य नाही. हे अतिशय दुर्देवी आहे. परवा तालेवार साहेब थरथर कापत होते. का बर तर के.टी. नगरचा विषय होता. का थरथर कापत होते समजा त्यांचे चुक नव्हते तर, का त्यांना घाम फुटत होता, का त्यांचे ब्लड प्रेशर वाढत होत त्यांचे चुक नव्हतं तर, त्यांना कुठेतरी जाणीव होते की आपण कुठेतरी अडचणीमध्ये आहे. या कोव्हीड संदर्भातील जी चर्चा सुरु आहे. काय आहे शासनाचे निर्देश काय आहे महानगरपालिकेच्या आयुक्तांना, काय आदेश आहे प्रशासनाच्या प्रमुखांना या राज्य शासनाच्या आणि केंद्र शासनाच्या नियमाप्रमाणे, कुठली जबाबदारी आहे, जबाबदारी ही आहे की ज्या ज्या ठिकाणी कोव्हीडचे रुग्ण सापडतात त्या त्या ठिकाणाला प्रतिबंधीत क्षेत्र घोषित करुन तेथील स्वच्छतेची आणि आरोग्याची काळजी घेणे ऐवढेच महानगरपालिकेचे काम आहे. मग मला सांगा की ज्या ठिकणी प्रतिबंधीत उपाययोजना केल्या आहे तेथील नगरसेवक नाखुश आहेत. आणि ज्या ठिकाणी कुठल्याही प्रतिबंधनाच्या व्यवस्था केलेल्य नाहीत तेथलेही नगरसेवक नाखुश आहे. म्हणजे जी जबाबदारी आपल्यावर नाही ते सुध्दा नाखुश आहे. आणि काय म्हटले आहे सरकारनी, अस्तीत्वात असलेल्या दवाखान्याचा वापर करण्याचा अधिकार आपल्याला दिला आहे. नविन हॉस्पीटल निर्माण करण्याचा अधिकार नाही दिला आहे. आणि आपण उद्घाटन करुन सांगतो की हे हॉस्पीटल मी बनवले, सभागृहातील सन्माननिय नगरसेवक सांगतात की गेल्या २ ते ३ वर्षापासून त्या हॉस्पीटलचा पाठपुरावा मी करीत आहे. वेदना होते. अतिशय जास्त वेदना या करीता होत आहे की काळाकुट्ट इतिहास या शहराचा लिहीला जात आहे. पर्वाच्या दिवशीची घटना आहे ती तर खरच निंदणीय आहे. नगरसेवकांचे अधिकार सुध्दा दाबायला निघाले, की माझे ऐकुन घ्या, का तुम्हाला ऐकायची सवय नाही आहे काय ? का तुम्ही नाही ऐकु शकत का कुणाचं, संवाद असला पाहिजे, महानगरपालिका, स्थायी समिती, प्रभाग समिती, आणि आयुक्त हे महानगरपालिकेचे आणि शहराचे व या गाडीचे चार चाके आहेत. तीन चाके आपल्यासोबत चालण्यासाठी गेल्या ४ महिन्यापासून सातत्याने प्रयत्न करीत आहे पण तुम्ही आपली एकचाकी सायकल घेऊनच निघाले आहेत. योग्न नाही हे. तुम्हाला भेटायला काय प्राब्लेम होते. तुम्हाला एक किस्सा सांगतो की ज्यावेळी मी स्थायी समिती अध्यक्ष होतो पृथ्वीराजजी चव्हाण त्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. एका विषयाने प्रफुल्लजी मी त्यांना मेल पाठविला, या ठिकाणी कुठेही पक्ष भेदाभेद नाही आहे. जनतेच्या हिताच्या संदर्भात सर्व राजकीय पक्ष एकत्रित येतात, त्यांचा दुस-या दिवशीच मला मेला आला आणि त्यांनी मला बोलाविले, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्याचा आणि स्थायी समिती अध्यक्षांना बोलावितो आणि आयुक्तांना महापौरांना भेटायला वेळ नाही. पत्रकारांसोबत चर्चा करायला वेळ आहे पण मा.महापौरांना आणि सन्माननिय नगरसेवकांना भेटायला वेळ नाही. ही कुठली परिस्थीती आणुन ठेवली आपण, म्हणुन सर्व नगरसेवकांनी जे म्हटले ते लक्षात घ्या, की सर्वेच्या सर्वे नगरसेवक चोर आहे. सगळेच्या सगळे नगरसेवक मुर्ख आहे. सगळेच्या सगळे नगरसेवक काय क्रीमीनल आहे. सगळेच्या सगळे नगरसेवक काही करप्ट आहे. ही इमेज बिल्टअप करुन तुम्हाला काय मिळते, संविधानाच्या धज्जा उडवायला निघाले आहे तुम्ही, आणि हे

असतांना तुम्ही कोण आहे याची जबाबदारी आणि जाणीव तुम्हाला नाही आहे. तुम्ही त्या इन्स्टीटयुशनच्या प्रशासनाचे हेड आहात. या नगरसेवकांचे म्हणणे ऐकुन घेण्याची तुमची प्राथमिक जबाबदारी आहे. तुम्ही फोन नाही उचलत, मा.महापौरजी प्रश्न विचारायचे नाही आहे यांच्याकडुन एक उत्तर अपेक्षित आहे यांच्याकडुन की गेल्या दोन महिन्यात कुठल्या इमरजन्सीचे काम मंजूर केले ते सांगावे, गड्डे पडलेले आहे, गटरचे टाके खोदुन ठेवलेले आहे. उद्या तेथे पडुन जर अपघात झाला तर त्याची जबाबदारी कोण घेईल, घेणार आहे प्रशासन जबाबदारी, सर्व सहा.आयुक्तांनी त्यांच्या झोनमधील कुठले कुठले इमरजन्सीचे कामे मंजूर झालेले आहे याची माहिती आपण मागवावी आणि सभागृहाच्या पटलावर ठेवावी, पुर्णपणे संवाद बंद करीत आहे. आपण मोबाईल वापरतो, मोबाईल सुध्दा आपण संवादासाठी वापरतो, पण ज्यावेळी हा संवाद बंद होतो तेव्हा आपल्याला वारंवार ऐकायला येते की इस रुट की सभी लाईने व्यस्त है, किंवा असे ऐकायला येते की आप जिसको संपर्क करना चाहते हो वह नॉट रिचेबल है, त्यावेळी अनेक वेळा आपल्या मनामध्ये ऑपरेटर बदलण्याची इच्छा होते. की आपल्या मनामध्ये इच्छा होते की ऑपरेटर बदलला पाहिजे कारण तो नॉट रिचेबल आहे. कारण तो कव्हरेज क्षेत्राच्या बाहेर आहे. कारण त्याची लाईन नेहमी व्यस्त असते. पण परिस्थिती ते आपल्याला कधी कधी ते करु देत नाही. आपल्याला मनातुन वाटते की एक संधी दिली पाहिजे. त्या संधी मध्ये जर समजा ती लाईन दुरुस्त नाही झाली तर तिला बदलण्याचा अधिकार आपल्याला आहे. आणि म्हणुन माझी विनंती आहे की अजुनही वेळ गेलेली नाही. आमचे आणि या सभागृहातील आयुक्तांचे वैर नाही. आम्हीतर त्यांना पाहिले सुध्दा नाही फक्त सभागृहात दोन वेळा पाहिले, ते काळे आहे की गोरे आहे हे सभागृहात आल्यावर कळले, प्र फुल्लजी पर्वाच्या दिवशी म्हणाले की आपण काही त्यांच्या किडण्या चोरल्या काय की आपण वाईट आहे. नाही चोरल्या, ही संवादाची वेळ आहे ही भांडणाची वेळ नाही. आम्ही तयार आहोत, ओपन हार्टली तयार आहोत, मला आश्चर्य वाटते की मा.महापौरजी स्वत: वाढदिवसाच्या दिवशी भेटायला गेले होते, कुठले महापौर जाते हो, संबंध मेनटेन करायचे असतात त्यावेळी या सर्व गोष्टी कराव्या लागतात, तुमचा ट्रॅक रेकॉर्ड कसा आहे याचे आम्हाला काही घेणेदेणे नाही. तुम्ही कसे आहे याच्याशी ही आम्हाला घेणेदेणे नाही. आम्हाला चिंता आहे आमच्या शहराची, आम्हाला चिंता आहे या शहराच्या स्वास्थाची, तुम्ही तर उद्या निघुन जाल, तुमची ट्रान्फर होईल, तुम्ही चालले जाल, पण इतिहासामध्ये नोंद जेव्हा केली जाईल तेव्हा महानगरपालिका या कोव्हीडच्या परिस्थितीमध्ये कशी वागली याची नोंद होणार आहे. तेथे हे नाही लिहीणार आहे की हा आदेश आयुक्तांनी पारीत केला आणि हा आदेश सभागृहानी पारीत केला आहे. तिथे लिहले जाणार आहे की महानगरपालिकेने हे केले आहे. तिथे हे नाही लिहले जाणार आहे की आयुक्तांनी अमुक अमुक गोष्टी केल्या आहे तेथे हे लिहले जाणार आहे की कोव्हीड सारख्या महामारीच्या वेळेला प्रशासन आणि पदाधिकारी यांच्यामध्ये विसंवाद होता, जो आम्ही निर्माण नाही केला, जो आम्ही बिलकुल नाही केला, आम्ही सामज्यस्यांची भुमिका घेतली, मला आठवते साडेबारा वर्ष झाले मी या सभागृहात आहे. ज्या ज्या वेळी नविन आयुक्त येतात त्याच्या दुस-या किंवा तिस-या दिवशी मा.महापौरांना भेटायला जातात संवाद साधण्याकरीता, संवाद प्रस्थापित करण्याकरीता, कारण दोन वेगवेगळे लोक आहे, दोन वेगवेगळी आयडेन्टीटी आहे, दोन वेगवेगळया शहरातील लोक आहे. दोघांनी एकमेकांना ओळखले नाही आहे. जाणले नाही आहे. दोघांचे विचार एकमेकांना माहिती नाही. कार्यपध्दती एकमेकांना माहिती नाही. आपल्याला सोबत काम करायचे आहे म्हणुन दोघांचाही ऐकमेकांशी संवाद झाला पाहिजे. म्हणुन या इन्स्टीटयुशनचे प्रमुख म्हणुन महापौर आहे त्यांना भेटायला आयुक्त जात असतात, आश्चर्याची गोष्ट आहे की मी जेव्हा वाचले पेपरमधुन, आता तर पेपरमधुनच वाचायला मिळते, दुसरे तर काही साधन नाही आपल्याकडे, महिन्या दीड महिन्यानंतर

आयुक्त साहेब हे महापौरांना भेटायला जातात ही कुठली पध्दत आहे. म्हणजे संवाद तुम्हाला साधायचे नाही काय ? तुम्हाला संवाद साधायचा आहे तुम्ही आल्याबरोबर ज्या काही गोष्टी करायच्या आहे त्या करुन टाका ना, भेटुन घ्या, ऐकमेकांना जाणुन घ्या, शहराच्या दृष्टीकोणातून हे आवश्यक आहे. स्मार्ट सिटीची मिटींग नाही झाली अजुन, आश्चर्य आहे. तुम्ही कोव्हीडच्या संदर्भात आम्हाला सांगाल काय ? मा.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी हाऊसिंग स्कीम फॉर पुअर पिपल केली आहे त्यामध्ये महानगरपालिकेने काय प्रगती केली आहे. सेल्फ हेल्थ ग्रुपच्या माध्यमातून नविन रोजगाराची साधने उपलब्ध करुन देण्यासाठी महानगरपालिकेने काय केले. माहितच नाही. कारण तुम्ही संवादच साधत नाही. आणि संवाद साधत नसल्यामुळे सगळीकडे चर्चा आहे. मिडीयाला चर्चेकरीता विषय मिळतात आयुक्त आणि महापौरांचे पटत नाही. अरे का पटत नाही. जो व्यक्ती वाढदिवसाला भेटायला जातो त्याचे पटत नाही. जे नगरसेवक वारंवार आयुक्तांकडे पत्र घेऊन जातात त्यांचे पटत नाही. जे नगरसेवक फोनवर आयुक्तांशी संवाद साधण्याचा प्रयत्न करतात त्यांचे आयुक्तांशी पटत नाही. प्रेस काही छापुन देते. हे परसेप्शन कोणी तयार केले, कशामुळे तयार झाले, आणि यामध्ये बदनामी कोणाची झाली हे सुध्दा महत्वाचे आहे. त्यामुळे माझे निवेदन आहे मा.महापौरजी, आपल्या माध्यमातून मी मा.आयुक्तांना सांगु इच्छितो की, आपण संवादाची संधी सोडु नका, आपण संवाद ठेवा, आपण जनप्रतिनिधींचा मान अबाधित ठेवा, जनप्रतिनिधी हा साधा नाही आहे २-२, ३-३ टर्म निवडुन आलेले नगरसेवक आहे. त्यामुळे ही संवादाची भुमिका आपल्याकडुन थांबली आहे आमच्याकडुन अजुनपर्यत थांबली नाही. आम्ही तर सातत्यानी तुमच्या सोबत संवाद साधण्याचा प्रयत्न करीत आहेत. आणि जे नगरसेवक सभागृहामध्ये बोलले आहे तुम्हाला त्याची माहिती नसेल तर आपण निश्चितपणे त्याची माहिती घ्यावी, वार्डातील कामे का थांबली आहे. गटारीचे कामे का थांबली आहे. ते चालु करण्याची आपली काय प्रक्रीया आहे. ही एक संवाद साधण्याची संधी आहे. हे सभागृह वयक्तीक आरोप करण्यासाठी नाही आहे. हे सभागृह संवाद साधण्यासाठी एक प्रक्रीया करणारे सभागृह आहे. त्या निमित्ताने आपल्याला विनंती आहे की संवाद तुम्ही तुमच्याकडुन करा आम्ही तुमच्या सोबत निश्चितपणे राहु, ही संधी आहे मा.आयुक्तजी या संधीचे आपण सोने करावे, या ज्या नगरसेवकांच्या भावना आहे त्या व्यक्तीगत न घेता, मला आठवते असिम गुप्ता या सभागृहामध्ये होते त्यावेळी मोठया प्रमाणात टॅक्स वाढला होता आणि त्याचवेळला सभागृहात अशीच नोकझोक झाली होती आणि असिम गुप्तांनी तो स्पोर्टीगली घेतला होता आणि स्पोटींगली घेऊन त्याला समोर घेऊन गेले होते. ही स्पोटमॅनशिप आपल्यामध्ये असणार नाही तो पर्यत आपण या शहराचे भले करु शकत नाही. माझे मित्र नितीनजी साठवणे यांच्यावर जो अन्याय झाला, यांच्या विरोधात जी पोलीस तक्रार झाली ही तक्रार या सभागृहातील सर्वांचे मत आहे की ही तक्रार मागे घेण्यात यावी आणि त्यांनी जो स्थगण प्रस्ताव मांडला आहे त्याला मी समर्थन देतो, आणि याच ठिकाणी थांबतो, जय हिंद, धन्यवाद.

महापौर :- येथे जवळपास २५ मा.सदस्यांची भाषणे स्थगण प्रस्तावावर झाली आहे सर्वांच्या विनंतीला मान देऊन आयुक्त देखील या सभागृहात उपस्थित झाले त्याचे सुध्दा अभिनंदन ही सभा उदया सकाळी १२.०० वाजेपर्यत स्थगित करण्यात येते.

हस्ता /– डॉ.रंजना लाडे
**निगम सचिव**
**महानगरपालिका, नागपूर**

हस्ता /– संदीप जोशी
**महापौर**
**महानगरपालिका, नागपूर**